


मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर-देशपांडे
घराण्यांतील छत्रपती शिवाजी कालखंडांतील




ऐतिहासिक कागदपत्रे

संपादकः राजाराम देशपांडे













'दार उघड बया आता दार उघड'









लेखकाचा परिचय



राजाराम शंकर देशपांडे
चार्टर्ड इंजिनिअर
एम्.आय्.ई.सी.ई., एम्.एस्.ई (१)

१९५९ ला कॉलेज् ऑफ इंजिनियरींग पुणे, इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, कोलकत्ता व मिलिटरी इंजिनियरींग कॉलेज्, खडकी येथे पदवी. बाँब डिस्पोजल तंत्रज्ञान. यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी, पुणे व मेरी नाशिक-प्रशिक्षणाधिकारी, ३६ वर्षे सरकारी नोकरी त्यानंतर वडिलोपार्जित शेती व्यवसाय. "वनश्री" पुरस्कारासाठी नामनिर्देशन.

प्रतिनियुक्ती- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान पुणे. पुणे विद्यापीठ, जिल्हा- उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा परिषद- पुणे व सातारा, डिझाईन्स सर्कल- मुंबई.

पत्ता:
आदिती, प्लॉट नं ८,
भरतकुंज वसाहत नं २,
एरंडवणा, गणेश नगर,
पुणे: ४११०३८
दुरध्वनी: २५४४११७८
मोबा: ९४२०६९६४३२

मुद्गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील)
या घराण्याचा ... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील

ऐतिहासिक कागदपत्रे

(इ. स. १६३० ते इ. स. १६८०)

लेखक व प्रकाशक :

श्री. राजाराम शंकर देशपांडे
अेम्. आय्. ई. सी. ई.
अेम्. अेस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर

मूल्य : रु. ८००/-

प्रोफिशन्ट™
पब्लिशिंग हाऊस

लेखक व प्रकाशक : राजाराम शंकर देशपांडे
एम्. आय्. ई. सी. ई., एम्. एस्. ई. (१) चार्टर्ड इंजिनियर
पत्ता : "आदिती," प्लॉट नं. ८,
भरतकुंज वसाहत नं. २, अेरंडवणा (गणेशनगर),
पुणे ४११०३८.
फोन : ०२० - २५४४११७८, ९४२०६९६४३२

प्रथमावृत्ती : दिनांक १४ मार्च २०१०

अक्षर-जुळणी : स्वाती एन्टरप्राईजेस, पुणे - ९
अर्क डिझाईन, पुणे.

मुखपृष्ठ, मलपृष्ठ व आतील चित्रे
शंकर गोजारे, संदीप साळुंके, अमोल क्षीरसागर, शशांक गुप्ते

प्रकाशन सहाय्य व वितरक :
अ. र. नांदुरकर
अनमोल डिस्ट्रिब्यूटर्स
५३५, शनिवार पेठ, शॉप नं. ९, राधाकृष्ण बिल्डिंग ;
प्रभात सिनेमा समोर, पुणे - ४११०३०.
फोन : ०२० - २४४८४५३८.

मुद्रक : अभिषेक क्रियेशन्स
९८७, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

अनुक्रमणिका

प्रस्तुत पुस्तकातील रेखाचित्रे व फोटो यांचे वर्णन व पुस्तकातील पृष्ठ क्रमांक

	इ) महादेव मंदीर व चिमणाजी बापूजी नांदोशीकर - देशपांडे यांची समाधी	८६२
	ई) ग्रामपंचायत नांदोशी	८५९
	ह) रामचंद्रपंत अमात्य व त्यांची पत्नी यांची समाधी - पन्हाळगड (५ चित्रे)	८६९, ८७०, ८७१
	ग) नारो बापूजी नांदोशीकर देशपांडे यांची वडगाव मावळ येथील समाधी (४ चित्रे)	७२
	म) वडजाई मंदिराची गावठाणातील जागा (बखळ)	८४७
११	खेड शिवापूर येथील कसबे खेड मधील खोलेश्वर मंदीर, त्र्यंबकपंत डबीर यांची समाधी, माध्यमिक शाळा, गावठाणाकडील मुजुमदार, खासनीस, जठार, देशपांडे, वगैरेंची घरे १२ चित्रे.	८५७, ८५८, ११७
१२	मौजे नांदोशी ता. हवेली जि. पुणे येथील वडजाई पालखी सोहळा ४ चित्रे, अंबराई ४ चित्रे	८६४, ८६५, ८६६, ८६७
१३	नाशिक - वणी - दिंडोरी लढाई जिंकली. छत्रपती शिवाजी महाराज, मोरोपंत पेशवे व नारायण - नांदोशीकर - देशपांडे पंचहजारी सरदार यांचा मोठी लढाई. त्यात नारायण नांदोशीकर यांचा मृत्यू त्याप्रसंगीचे रेखाचित्र.	११६
१४	दि. ६/११/२००९ रोजी शताब्दी महोत्सवासंबंधी झालेल्या प्रसंगी राजाराम देशपांडे यांचा भा. इ. सं. मंडळ पुणे येथे सत्कार झाला. (२ फोटो)	८७२
१५	मराठेशाहीच्या सीमा - १६३० ते १८०० दर्शविणारा नकाशा	८५२
१६	१६६५ इ. स. ..... पुरंदरचा तह व शिवाजी महाराजाकडे राहिलेले किल्ले दर्शविणारा नकाशा	८४८
१७	इनामी जमिनी देशपांडे यांना दिल्या जाणारे क्षेत्र दाखविणारा नकाशा	८९१
१८	मौजे नांदोशी, ता. हवेली, जि. पुणे येथील नांदोशीकर देशपांडे पाटील यांच्या राहत्या घराचा नकाशा	८६०, ८६२, ८६३
१९	पुणे शहराची इतिहास भौगोलिक परिस्थिती इ.स. १६०० ते १८२०	६

* देशपांड्यांच्या सदरेपुढे *

श्रीमंत नऱ्हेकर देशपांड्यांचे घराणे बारा मावळात तालेवार आहे. हे नऱ्हेकर देशपांडे पुण्याजवळच्या नांदोशी गावात गेली तीनशे वर्षेनांदत आहेत. म्हणून त्यांना नांदोशीकर देशपांडे म्हणूनही ओळखतात. तसा या नांदोशीकर देशपांड्यांचा वंशपरिवार मोठा आहे. आजच्या काळात उद्योग-धंद्यासाठी या घराण्याच्या शाखा विखुरल्या आहेत. एक शाखा मात्र आजही नांदोशीच्या काळी-पांढरीत नांदते आहे. इ.१९४७ पर्यंत नांदोशीत देशपांड्यांचा वाडा सरदारी दिमाखात उभा होता. दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देशपांडे वाड्यावर स्वातंत्र्याचा झेंडा फडकला. पुढे साडेपाच महिने उलटले आणि महात्माजींचा दारुण घात झाला. दिल्लीत गांधीजींची चिता पेटली आणि महाराष्ट्रातील गावोगाव निशपाप घरांच्याहि चिता पेटल्या. नांदोशीच्या देशपांडे वाड्याची त्यावेळी राख-रांगोळी झाली. शिवकालीन वस्तू, वास्तू, शेले-शालू, दागदागिने, कागदपत्रे, घोड्या-उंटांचा साज-सरंजाम, घागरी-हंडे, जुनी हत्यारे पात्यारे शिवकालीन ऐतिहासिक साहित्य पार खलास झाले. शिवकालात ज्या घराण्यातील अनेक पुरुष हिंदवी स्वराज्यासाठी लढले, राबले अन मेले, त्याच घराण्याचा वाडा, देश स्वतंत्र झाल्यावर बेचिराख झाला.

त्याच वाड्याच्या राखेतून आजचा देशपांडे वाडा नांदोशीत पुन्हा उभा राहिला. जुने काहीच उरले नव्हते. वाड्याबाहेर कुठे-कुठे देशपांडे घराण्याची कागदपत्रे शिल्लक होती आणि त्यातल्या मुख्य देशपांड्यांची जिद्द! त्यांच्या इतिहासाचे प्रेम आणि अभिमान टवटवीत, गर्द पिंपळासारखा ताजा होता. त्या देशपांड्यांचे नांव नऱ्हे-नांदोशीकर राजाराम शंकर देशपांडे मुक्काम - नांदोशी, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे, सिंहगड रस्त्यावर! वय ७५. देहाची इमारत भक्कम. छाती आणि गर्दन ताठ!

श्री. राजाराम शंकरराव देशपांडे हे मराठी इतिहासकार आणि विशेषत: शिवकालावर मनापासून भक्ती करणारे डोळस अभ्यासक व संशोधक आहेत. स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांच्या आणि राजमाता जिजाऊ साहेबांच्या क्रांतिकारी अनुष्ठानात अगदी प्रारंभापासून शिलेदारीवे व्रत घेतलेले हे देशपांडे

घराणे आहे. बापूजी मुद्‌गल हा महाराजांचा कर्तबगार सहायक. तो मुत्सद्दी होता तेवढाच शिलेदारही होता. कोंढाणा उर्फ सिंहगड किल्ला याच बापूजीने मोठ्या मुत्सद्दीगिरीने कारस्थाने करून कब्जात आणला. शिवापूर हे गाव व पेठ महाराजांच्या लहानपणीच नव्याने वसविण्यात आली (इ.१६३७ ते १६४६ चे दरम्यान) त्यावेळी या शिवापूरात महाराजांसाठी वाडा बांधण्यात आला. याच वाड्याशेजारी बापूजी मुद्‌गल देशपांडे यांचाही वाडा बांधून तयार करण्यात आला. या बापूजी मुद्‌गल देशपांड्यांना तीन पुत्र होते. नारो बापूजी, बाळाजी बापूजी आणि चिमणाजी बापूजी. हे चौघेही बापलेक स्वराज्याच्या सैन्यात लष्करी कामगिरी शेवटपर्यंत करीत होते. बापूजी मुद्‌गल देशपांडे हे स्वराज्याचे पहिले सरहवालदार होते. म्हणजेच स्वराज्याच्या अंतर्गत संरक्षणाची व सुव्यवस्थेची जबाबदारी शिवाजी महाराजांनी व जिजाऊ साहेबांनी बापूजींवर सोपविली होती. बापूजींचे व्यक्तित्व व व्यक्तिमत्व निश्चितच कर्तृत्वशाली व भारदस्त होते हे त्यांनी केलेल्या कामगिरीवरुन सिध्द होते. किल्ले कोंढाणा हा अदिलशाही होता. गडावर विजापूरकर अदिलशहाचाच, म्हणजेच केंद्रसत्तेचा ताबा होता. कोंढाण्याचा गडकरी होता सिद्दी अंबर वाहब. जोपर्यंत दादाजी कोंडदेव हे हयात होते, तोपर्यंत शिवाजी राजांनी कोंढाण्यावर आपला ताबा बसविण्याचा विचार कृतीत आणला नाही. 'कोंढाणा' हा किल्ला कोंढाणा सुभ्याचा मुख्य कचेरीचा केंद्र होता. तेथूनच सुभ्याचा शाही कारभार चालविला जात असे. शाही सुभेदार होता दादाजी कोंडदेव. त्यामुळेच जुन्या कागदपत्रात दादाजीचा हुद्दा सुभेदार सुभे कोंडाणा असाही येतो. याच दादाजी कोंडदेवांकडे सुभेदारी होती. पण प्रत्यक्ष कोढाणा किल्ला सिद्दी अंबर वाहब या केंद्रिय अदिलशाही अधिकाऱ्याकडे किल्लेदार म्हणून होती. तो किल्ला सिद्दी अंबर वाहब कडून बापूजी मुद्‌गल-नऱ्हेकर-देशपांडे याने कारस्थाने करुन हिंदवी स्वराज्यात आणला. ही बापूजीची अतिशय मोठी कामगिरी. हे राजकारण इ. १६४८ च्या प्रारंभास घडले.

बापूजी नऱ्हेकरास तीन पुत्र होते, हे वर आलेच आहे. नारोजी, बाळाजी व चिमणाजी हे तिघेही शूर सैनिक आहेत. या तिघांनीही स्वराज्याकरिता अनेक

युध्दात प्रत्यक्ष भाग घेऊन शौर्य गाजविले आहे. मतळ हातावरी शीर घेवोन लढताती असा यांचा बहादूरीचा वाटा स्वराज्यात आहे. अफजलखानाच्या स्वारीच्यावेळी, म्हणजेच प्रतापगडच्या युध्दात नारो बापूजीकडे महत्वाची कामगिरी सोपविलेली होती. बाळाजी व चिमणाजी यांनीही शाहिस्तेखानावरील छाप्यात महाराजांच्या बरोबर लाल महालात भाग घेतला होता. या मुलांचे वडील केंव्हा वारले, याची नोंद अद्याप मिळालेली नसली तरी वार्धक्याच्या काळातही स्वराज्यातील कामे शेवटपर्यंत करित असावेत असा तर्क आहे.

महाराज सुरतेच्या पहिल्या स्वारीच्या वेळी, (म्हणजेच इ.१६६४ जानेवारी ६ ते १०) नारो बापूजी हे या स्वारीत होते. दि. १० जानेवारी रोजी लूट घेऊन परतले. लोहगडापर्यंत स्वारी व लूट यशस्वीपणे आली. पण लोहगाव ते वडगाव (ता.मावळ जि.पुणे) या भागात पोहोचताच महाराजांस बातमी समजली की, पुण्यातील मोघलांची फौज आपल्या रोखाने चाल करुन येत आहे. तेंव्हा महाराजांनी सांगातच लूट लोहगडावरच नेताजी पालकरांबरोबर पाठविली व स्वत: कोळवण, मुठे खोरे, खामगाव या मार्गाने राजगडाकडे जाण्यासाठी निघाले. येणाऱ्या मोघली हल्ल्याला आडविण्यासाठी वडगाव जवळ काही मराठी सैन्य त्यांनी ठेविले. त्यात प्रमुख होते नारो बापूजी नऱ्हेकर देशपांडे. हा प्रसंग दि. ४ किंवा ५ फेब्रुवारी १६६४ या दिवशी घडला. आलेल्या मोघली हल्ल्याबरोबर नारो बापूजी व मराठी सैन्य झुंझले. मोघली हल्ला त्यांनी उधळून लावला. पण या युध्दात नारो बापूजी रणांगणी पडले. गळ्याजवळ बाण लागून ते घोड्यावरुन कोसळले व मृत्यू पावले.

या नारो बापूजींना 'केशव' नावाचा पुत्र होता. आगऱ्यास जाण्याच्यापूर्वी मिर्झाराजे व दिलेरखान या मोघली सरदांशी शिवाजी राजांनी पुरंदर गडाखाली जो तह केला, त्यात पुरंदरगडासह २३ किल्ले मोंगलाना द्यावे लागले. पुरंदरावर मोगली निशाण लागले. व पुरंदरगड पुन्हा जिंकून घेण्यासाठी चार वर्षांनी, दि. ८ मार्च १६७० रोजी निळो सोनदेव बावडेकर यांस महाराजांनी पाठविले. गडावर शेख रजिउद्दीन नावाचा मोगली किल्लेदार होता. या अचानक छाप्यात मराठी सैन्याचा जय झाला. गड घेतला. पण या युध्दात केशव नारायण नऱ्हेकर देशपांडे ठार झाला.

पुढे साल्हेरच्या युध्दातही बाळाजी व चिमणाजी नऱ्हेकरांनी पराक्रम गाजविला. असा हा शिवकालीन नऱ्हेकर देशपांड्यांचा इतिहास आहे. अशा या घराण्यास खेड-शिवापूर व सिंहगड खोऱ्यातील काही भागाचे देशपांडे - वतन महाराजांनी दिलेले होते किंवा ते आधीपासूनच होते, तेच पुढे स्वराज्यात चालू ठेवले.

नऱ्हेकर देशपांडे घराण्याची कागदपत्रे, विपूल प्रमाणात श्रीमंत राजाराम शंकरराव देशपांडे यांनी अतिशय कष्टपूर्वक संशोधन करुन एकत्र जमा केली आहेत. त्याचप्रमाणे पुण्याच्या पेशवे दप्तरात याच घराण्याबद्दलची जी दप्तरे पाहणे आवश्यक आहे, ती पाहून श्रीमंत देशपांडे यांनी फार मोठ्या प्रमाणावर पत्र संग्रह केला. या पत्रात शिवकालिन, स्वातंत्र्ययुध्दकालिन (इ.१६८३ ते १७०७),पेशवेकालिन व ब्रिटिशकालिनही कागदपत्रे आहेत. मुगल बादशाहांच्या सनदांचा संग्रहही त्यात आहे. अभ्यासकांना या कागदपत्रांचा मोठाच उपयोग होणार आहे. नऱ्हेकर देशपांडे घराण्याच्या इतिहासाबरोबरच इतर घराण्यांची माहिती यात सापडणार आहे. अजूनही प्रकाशात न आलेले नऱ्हेकरांचे दप्तर ठिकठिकाणी नऱ्हेकरांच्या कुटुंबशाखात विखुरलेले आहे. या सर्वच प्रसिध्द आणि अप्रसिध्द कागदपत्रांचा डॉटरेटच्या प्रबंधासाठी उपयोग होणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे एक प्रज्ञावंत इतिहासाभ्यासक तरुण संशोधक डॉटरेटसाठी आत्तापासूनच कामाला लागले आहेत. अशा प्रज्ञावंत अभ्यासकांना श्री.रा.शं.देशपांडे-नऱ्हेकर यांचे मोलाचे सहाय्य लाभणार आहे. प्रस्तुत देशपांडे घराण्याची 'ऐतिहासिक कागदपत्रे' या ग्रंथाचा लाभ अशा प्रकारे संशोधन कार्यास होणार आहे.

देशपांडे घराण्यातील प्रस्तुत ऐतिहासिक कागदपत्रांतून अनेक महत्वाचे धागे-दोरे जुळत आहेत. पंतप्रधान मोरोपंत पिंगळे, रामचंद्रपंत आमात्य, रघूनाथ बल्लाळ कोरडे, सोनोपंत डबिर, चिंचवडकर देव इत्यादी घराण्यांची नाती-गोती यातून लक्षात येत आहेत. विशेष म्हणजे या घराण्यातील कर्तबगार पुरुषांच्या समाध्यांचा शोध लागत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी बांधलेली मंदिरे आणि अन्य बांधकामे लक्षात येत आहेत. शिवकालिन एका प्रख्यात घराण्याचा इतिहास सुसंगत तारिखवार जुळविण्यास या 'ऐतिहासिक कागदपत्रे' या ग्रंथाचा

संशोधकांस उपयोग होणार आहे. ही कथा-कादंबरी नव्हे. सर्वसामान्य माणसास या ग्रंथातून मिळणारे शोध व निष्कर्ष समजतील.

श्री रा. शं. देशपांडे यांनी घेतलेले कष्ट आणि चिकाटीने केलेले हे ग्रंथ लेखन व संपादन पाहून मन थक्क होते. नव्या पिढीला यातून प्रेरणाच मिळेल. श्रीमंत देशपांडे यांचे अभिनंदन करताना त्यांना सादर दंडवत घालावे असेच त्यांचे कार्य आहे.

बहुत काय लिहीणे? राजते लेखनाविधी!

पुरंदरे वाडा, पुणे ९. **- बाबासाहेब पुरंदरे**

।। श्री ।।

खेडेबाऱ्याच्या देशपांडे घराण्यातील पुरुषांनी शिवकालात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्या घराण्यातील बापूनी मुद्‌गल यांनी १६४७ मध्ये शिवाजी महाराजांकरिता कोंढाणा किल्ला काबीज केला अशा आशयाची नोंद जेधे शकावलीत आहे. त्यांचे पुत्र बाळाजी व चिमणाजी हे शाइस्तेखानावरील छाप्यात आघाडीवर होते.

बालपणी खेडला असताना शिवाजी महाराज काही काळ याच घराण्याच्या वाड्यात रहात होते.

अशा या घराण्याचा इतिहास श्री. राजाराम शंकर देशपांडे यांनी मोठ्या कष्टाने लिहिला आहे. ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

– गजानन भास्कर मेहेंदळे

श्री
शिवचरणी
निरंतर गंगाधर
सुत निनाद
बेडेकर

माघ कृष्ण चतुर्दशी
शिवराज्याभिषेक शके ३३६
०१० फेब्रुवारी १२

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

०॥६

अखंडितलक्ष्मीआलंकृत सकलगुणालंकरण राजमान्य राजश्री आर. एस देशपांडे प्रति निनाद बेडेकर दण्डवत. विशेष तरी आपण नऱ्हेकर- नांदोशीकर देशपांडे (पाटील) यांची काही कागदपत्रे माझ्याकडे दिली होती. ती मी वाचली. आपल्या घराण्याबद्दल अभिमान असणे ही गोष्ट आवश्यक आहेच परंतु घराण्याच्या इतिहासासंबंधी कागदपत्रे जमवून त्यांचा एक ग्रंथ करण्याचे फार मोलाचे काम आपण केले आहे. आपल्या उतारवयात मोठ्या जोमाने हा उपक्रम केला आहे. ऐन कागदपत्रेच छापल्याने ग्रंथाचे मोल वाढले आहे. मी आपल्याला शुभेच्छा देतो आणि ग्रंथ लवकरात लवकर प्रसिध्द व्हावा असा जोगवा तुळजाभवानीकडे मागतो रेखावधि

।। श्री ।।

आपण हाती घेतलेल्या स्तुत्य उपक्रमाबद्दल मन:पुर्वक धन्यवाद ! आपण प्रकाशित करीत असलेल्या मुद्गल – नऱ्हेकर – नांदोशीकर – देशपांडे (पाटील) या घराण्याचा ..... छत्रपति शिवाजी महाराजांच्या कालखंडातील (इ.स. १६३० ते १६८०) ऐतिहासिक कागदपत्रे या अत्यंत उद्बोधक आणि माहिती प्रधान अशा पुस्तकाबद्दलचा अहवाल देणाऱ्यांपैकी मी एक असावा याचा एक वेगळाच आनंद पुरेपुर मिळाला आहे.

आपण अत्यंत परिश्रमपूर्वक असा हा ग्रंथ / पुस्तक तयार केलेला आहे. आपल्या अनेक वर्षाच्या परिश्रमांना आज अत्यंत स्पृहणीय यश प्राप्त झालेले आहे. असे सांगण्यास नक्कीच अभिमान वाटतो.

अनेक ठिकाणाहून स्वत: मेहनतीने वणवण भटकून आपण मौलीक माहिती गोळा केलीत. तसेच त्याचे यथायोग्य संकलन करुन एका अप्रतिम अशा ग्रथांची निर्मिती अगदी यशस्वीरित्या केली आहे. नुसतीच माहिती मिळूवन भागत नसते, कारण ऐतिहासीक माहिती ही अनेक वेगवेगळ्या स्वरुपात प्राप्त होत असते. कधी अनेक भाषांमध्ये विखुरलेली असते, कधी गद्यात, कधी पद्यातही लिहीलेली असते. त्याचप्रमाणे विविध लेखकांच्या मातब्बरीप्रमाणे माहिती नोंदविलेली असते. तेंव्हा त्या लेखकाचा पक्ष, परिस्थिती, ज्ञान आणि अभिनिवेश याचाही विचार करावा लागतो. बाजारी माहिती, दरबारी माहिती, खाजगी माहिती असेही बरेच प्रकार असतात. शिवाय या वेगवेगळ्या उपलब्ध लिखाणामधील संगती, विसंगती शोधावी लागते. काळस्थळासंबंधीच्या चुका शोधून काढाव्या लागतात. अशा प्रकारे परिश्रमपुर्वक घटनानिश्चिती करावी लागते. मग त्या निश्चित केलेल्या घटनांची संगतवार घालून / लावून त्यावरुन प्रकरणांची निर्मिती करून हाती घेतलेल विषय पूर्ण करावा लागतो.

हा अशा प्रकारे या सर्वांची सांगड घालत आपण देशपांडे घराण्याचा अतिशय दैदिप्यमान आणि खराखुरा इतिहास वृत्तांतरुपाने अगदी सहज सोप्या अशा शैलीमध्ये मांडलेला आहे.

आज लोकांना इतिहास म्हटलं की, छत्रपति शिवाजी महाराज आठवतात. पण त्याच छत्रपति शिवाजी महाराजांचे स्वराज्य वाढविण्यासाठी, आणि घडविण्यासाठी देशपांडे कुटुंबियांची पिढ्यानपिढ्याची मौलीक साथ त्यांना लाभली होती. परंतु आपल्या या पुस्तकामुळे ही आजपर्यंत अप्रकाशित असलेली माहिती आज सर्वांसमोर प्रगट झालेली आहे. आज अनेक किल्ले ऐतिहासिक स्थळे लोक अनेकांना दाखवितात. पण त्याबाबतची खरीखुरी ऐतिहासिक माहिती मात्र त्यांना नसते. छत्रपति शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाने बळकाविलेल्या लालमहालावर छापा घालून त्यास पिटाळून लावले हे तर सर्वश्रुतच आहे. पण त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांना जीवाची बाजी लावत देशपांडे कुटुंबियांनी अत्यंत मौलीक अशा साथ केली होती हे कित्येकांना माहित नव्हते.

शिवरायांच्या स्वराज्याच्या अनेक मोहिमांमध्ये देशपांडे कुटुंबियांचा सहभाग होता व त्यांनी वेळोवेळी शिवरायांना मोठे मौलीक सहकार्य केले होते. देशपांडे कुटुंबियांनी कायमच तन मन धन सर्वस्वी अर्पण करून स्वराज्याची सेवा केली होती. त्यांनी शिवरायांना वेळोवेळी केलेली मदत किती लहान किती मोठी याला महत्व नाही, पण त्यामागे असलेल्या तुळशीपत्राच्या त्यांच्या भावनेचे मोल कधीच करता येणार नाही.

आपल्या गुणांचा उपयोग देशकारणी व्हावा हे बोलणे जितके सोपे त्याच्या अनंतपट तसे घडविणे अवघड. परंतु तसे घडविण्यासाठी तहान भूक विसरुन स्वराज्याच्या कारभारात देशपांडे कुटुंबियांनी दिलेले योगदान थक्क करणारे आहे. इतिहासाच्या पानांमध्ये प्रत्यक्ष नावांनीच नव्हे तर आपल्या अलौकिक कर्तुत्वगुणांनी ज्यांची नोंद प्रकर्षाने द्यावीच लागेल अशा लोकांमध्ये आज देशपांडे कुटुंबियांचे नाव झळकत आहे.

तसेच मराठी स्वराज्याच्या इतिहासातील देशपांडे कुटुंबियांच्या कर्तृत्वाचा सिंहाचा वाटा अमान्य करण्यासारखा नाही. आपल्या बऱ्याच वर्षाच्या तपश्चर्येला आज मधूर, गोड, रसाळ फळे आली आहेत हे पाहून आनंद वाटला.

अगदी सुयोग्य पद्धतीने मांडणी करून आपण या पुस्तकाचे लेखन केले नाही. इतकी माहिती, इतका तपशिलवार वृत्तांत देऊन एखादे पुस्तक लिहिणे हे सोपे तर निश्चितच नाही. अत्यंत उच्च दर्जाची मानसिकता अशासाठी आवश्यक असते तेव्हांच हे जमते. मानसिक आध्यात्माची बैठक अशी प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी असावी असते मनाचे मोठेपण टिकवावे लागते आणि बुद्धीचा समतोलही राखावा लागतो. आपण या सर्वाचा योग्य मेळ साधत तयार केलेल्या या पुस्तकाबद्दल कितीही लिहिले तरी ते कमीच ठरेल यात शंका नाही. पण एका अनमोल पुस्तकाची/ग्रंथाची निर्मिती करून आपण आज देशपांडे कुटुंबियांचा इतिहास अगदी समर्पकपणे व समतोलपणे मांडलेला आहे. त्यामुळे वस्तुनिष्ठ इतिहासाचे ज्ञान सर्वांना मिळणार आहे.

या पुस्तकाच्या/ग्रंथाच्या निर्मितीसाठी आपण आपल सर्वस्व झोकून देवून काम केलेत ही गोष्ट मोठी विलक्षण आहे. देशपांडे कुटुंबियांचा उज्वल इतिहास सांगणारे एक विश्वासार्ह आणि अधिकृत असे ऐतिहासिक साधन आपण तयार केले आहे.

कर्तृत्व संपन्न, व्यवहारीक चातुर्य, भविष्याचा अचूक वेध घेऊन धाडसाने उद्योग व्यवसाय करणे आणि परमेश्वर कृपेने त्यात यश मिळविणे हे अनेकांना जमते आणि एवढे सर्व करूनही पुन्हा कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, अशी जाण असून सुद्धा ती कृतीत अणणारी माणसे फारच थोडी आहेत, अशा अत्यल्प माणसापैकी आपण एक महान गृहस्थ आहात असे अभिमानाने सांगतो आणि माझा अहवाल संपवितो.

– ॲड. संजय चितळे,

हायकोर्ट

एका सार्थ इतिहासाची ओळख

प्रथम शहाजी राजांच्या पदरी असलेल्या व नंतर शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सहभागी होऊन मोलाचे योगदान देणाऱ्या जेधे, पासलकर, बांदल, मालुसरे या घराण्यांप्रमाणेच शिवापूरकर नऱ्हेकर – नांदोशीकर घराण्याचाही समावेश होतो.

शहाजी राजांच्या पदरी असलेल्या बापूजी मुद्‌गल देशपांडे यांनी १४ मार्च १६४७ रोजी कोंढाणा उर्फ सिंहगड स्वराज्यात आणून शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मोलाचा वाटा उचलला. तर लालमहालातील शाहिस्तेखानावरिल छाप्याच्या प्रसंगी बापूजी पंतांच्या बाळाजी व चिमणाजी या दोन्ही पुत्रांनी मोठा पराक्रम गाजविला व तिसरा पुत्र नारो बापूजी याने १० जाने १६६४ रोजी वडगाव मावळ येथे मुघल सरदार मुकुंदसिंग रजपुत याच्या बरोबर झालेल्या संघर्षात बलिदान दिले. याच घराण्यातील नारायण देशपांडे यांनी वणी दिंडोरीच्या युद्धप्रसंगी वीर मरण पत्करले. राघो मोरेश्वर, महादजी रघुनाथ, खंडो मोरेश्वर, या व्यक्तींनी पेशवाईत मराठी राज्याचा कारभारातही म्हणजेच मुलकी सेवेतही मोठी कामबिरी बजावली आहे. देशपांडेपणाचे काम असो जे जे कार्य आपल्या पदरी आले ते ते प्रामाणिकपणाने करणे हीच त्यांची ध्येय निष्ठा होती. ती पार पाडत असतांना या घराण्यातील अनेक व्यक्तिंनी दाखविलेले धाडस, शौर्य, प्रसंगावधान, व्यवहार चातुर्य वगैरे गुणांचे आपणास दर्शन होते. या घराण्याने मराठ्यांच्या इतिहासांत दिलेले योगदान पहातां प्रत्येक मराठी माणसाच्या मनात या घराण्याविषयी आपलेपणाची भावना निश्चित निर्माण होईल.

राजाराम शंकरराव देशपांडे यांना आपल्या घराण्याचा सार्थ अभिमान आहे. परंतु ते तेवढ्यावरच न थांबता त्यांनी आपल्या पुर्वजांच्या या तेजस्वी इतिहासाला ग्रंथ रुपात साकार करण्याचा निर्धार केला व त्या साठी उतार वयातही अत्यंत परिश्रम घेऊन विविध प्रसिद्ध व अप्रसिद्ध साधनांचा अभ्यास करून हा ग्रंथ साकार केला आहे.

मुळचे देशपांडे घराणे कुठले, त्यांच्या उपशाखा कशा झाल्या, त्यांचा विस्तार कोठे कोठे कसा होत गेला. त्यांच्या इनाम जमिनी, इनाम गावे, वतनाच्या

जागा, रहाते वाडे, देशपांडे.कुलकर्णी व पाटील वतना विषयीची माहिती प्रस्तुत ग्रंथात सविस्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी अनेक इतिहासाची पुस्तके, बखरी, ऐतिहासिक पत्र संग्रहांचा अभ्यास केला आहे व त्याच बरोबर भारत इतिहास संशोधक मंडळ आणि पेशवे दप्तरांतील शेकडो मोडी कागदपत्रांचा अभ्यास केला आहे.

वंशवेल, नकाशे, मोडी पत्रांची छायाचित्रे, तसेच लिप्यंतर केलेली पत्रे परिशिष्टा सोबत जोडली आहेत. त्यामुळे या ग्रंथाचे महत्व आणखीच वाढले आहे. या ग्रंथाच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या ग्रंथाची यादीच त्यांच्या श्रमाची साक्ष देते.

आपल्या पूर्वजांनी स्वराज्याशी एकनिष्ट राहून देशासाठी केलेले बहुमोल कार्य लोकांसमोर आणण्याचा राजारामपंतांचा ध्यास व त्यासाठी घेतलेले अपार कष्ट हे या ग्रंथरूपाने साकार झाले आहेत. म्हणूनच ते अभिनंदनास पात्र आहेत.

– पांडुरंग बलकवडे

(इतिहास संशोधक)

नांदोशीकर देशपांडे घराण्याची शिवकालीन कागदपत्रे

श्रीमान राजाराम शंकर देशपांडे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी राहणार मौजे नांदोशी, ता. हवेली, जि. पुणे, हे श्री शिवकालीन ऐतिहासिक देशपांडे घराण्याचे कर्तृत्ववान असे वारसदार आहेत. आपल्या घराण्याचे शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाशी फार मोठा संबंध असल्याचा व महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात आपल्या पूर्वजनांनी जे अपूर्व, अद्भुत आणि जीवाची पर्वा न करता जे योगदान दिले त्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. त्यांनी आपल्या घराण्यातील आगीच्या आणि कसरीच्या तावडीतून जगल्यावाचल्या कागदपत्रांचे संकलन करून जतन केले आहे. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यावर या कागदपत्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. पर्वतप्राय प्रयत्नांनी आणखी शेकडो मोडी कागदपत्रे त्यांनी पुणे पुराभिलेखागारातून प्राप्त केली, त्याचे लिप्यंतर केले. पर्शियन कागदपत्रांचे अनुवाद केले. हे सर्व झाल्यावर यापूर्वी प्रसिद्ध झालेली नऱ्हेकर देशपांडे, खेडेबारे - शिवापूरकर देशपांडे यांच्या कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला. अनेक इतिहास संशोधकांशी संवाद केला. नांदोशीकर देशपांडे घराण्याची कागदपत्रे आजपर्यंत प्रसिद्ध झाली नव्हती. ते अत्यंत खडतर काम श्री देशपांडे यांनी बहुप्रयत्नाने आज प्रसिद्ध केली आहे. ही गोष्ट अतिशय मोलाची आहे.आपल्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमांच्या स्थळांचे नकाशे तयार केले. अद्यावत वंशावळी तयार केल्या. आपल्या घराण्यातील पराक्रमी पुरषांच्या समाध्यांचा शोध घेतला. त्यांची छायाचित्रे घेतली. पराक्रमांच्या प्रसंगांचे दर्शन वाचकांना घडविण्यासाठी त्यांनी रेखाचित्रे तयार करून घेतली.

आपल्या सध्याच्या तीन जळीताच्या दिव्यातून पुन्हा उभ्या असलेल्या वास्तूचा त्यांना अभिमान आहे. जुन्या वाड्याच्या तटबंदीच्या भिंतींचे अवशेष आजही त्यांच्या घराण्याच्या ऐतिहासिकतेची आठवण करून देतात. अजूनपर्यंत गावचे वतनदार पाटील म्हणून गावात ते ताठ मानेने वावरतात. वडजाई देवी हे त्यांचे कुलदैवत. तिच्या मंदीराच्या जीर्णोद्धार त्यांनी केला. तिच्या यात्रेतील आपले मानाचे स्थान त्यांनी आजही जपले आहे. त्यांची शेती, आमराई आजही त्यांच्या

ऐतिहासिकतेची साक्ष देतात. वाघजाई मंदीराकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम आणि गावात बसविलेले सौरदिवे यातून त्यांचे आपल्या जन्मभूमीवरील उदंड प्रेम व्यक्त होते.

श्रीमान राजाभाऊ देशपांडे हे आपला घराण्याचा वारसा अत्यंत मनोभावे जपत आहेत. यांनी आपल्या घराण्याच्या कागदपत्रातून अनेक मौलिक गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. ऐतिहासिक कागदपत्रांच्या दुर्मिळतेच्या काळात देशपांडे यांनी ही कागदपत्रे ज्या आस्थेने, आपुलकिने आणि दुर्दम्य आशावादाने जपली आहेत त्याचे मोल अपार आहे. देशपांडे यांनी हा ग्रंथ लिहून एक महाकृत्य केले आहे.

बहुतीं शोधुन पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।

तरी मग जाणावें साधिलें । महाकृत्य ।। – समर्थ

राजाभाऊ देशपांडे यांनी हा ग्रंथ लिहून महाराष्ट्रावर फार मोठे उपकार केले आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच अदिशक्ती चंडमुंडभंडासुरखंडिनी रामवरदिनी तुळजाभवानीच्या चरणी प्रार्थना.

– डॉ. सदाशिव म. शिवदे, पुणे.

मराठेशाहीच्या सीमा युद्धनीतीवर अवलंबून असतात काय ?

......स्वत:च्या घराण्याचा इतिहास, लेखक जितक्या आत्मियतेने साकार करतो तितका इतरांकडून सुसंगतपणे होत नाही. लेखकाने इतिहास लिहिताना फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचाच कार्यकाल निवडला त्याला निश्चित कारणे होती. असे प्रकाशित व अप्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रांवरून स्पष्ट होते. भरपूर रेखाचित्रे देऊन प्रसंग पुढे ठेवल्याने इतिहास योग्य तऱ्हेने समजून येतो. शिवाय लेखकांनी वतनाची जागा, नांदोशी व खेड शिवापूर येथील तत्कालीन काम करणाऱ्या व्यक्ति व त्यांचे कार्य व सरकारकूनांसंबंधीचे संबंधांनीही सुराज्य स्थापनेसाठी युद्धात देखील उल्लेखनीय विजय संपादून स्वराज्याच्या मर्यादा अडीचशे पटींनी वृद्धिंगत झाल्या याचे नकाशासह रेखाटन करून वाचकांसमोर नेमकी व वास्तव परिस्थिती मांडण्याचे काम झालेले आहे.

शेती, शस्त्र व शास्त्र या विषयात प्रत्येक ठिकाणी देशपांडे कुटुंबाचा उल्लेखनीय सहभाग असल्याबद्दल खात्री पटते. स्वत: लेखकांचे पूर्वजांनी म्हणजे **नारो बापूजी, केसो नारायण व नारायण – नांदोशीकर** यांनी सर्व महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या लढायात भाग घेतल्याचे दिसून येते. तसेच पंचहजारी घोडदळाने केलेला अपूर्व पराक्रम कायम पहिल्या दर्जाच्या सेनापतीने वाढविलेला दिसतो. **आजोबा, मुलगा व नातू हे एकाच कुटुंबातील व्यक्ति** घोड्यावरून पडून लढायांत मृत्यू पावल्याने देशातील हे उदाहरण क्वचित एकमेव असल्याचे दिसून येते.

त्यामुळेच शिवाजीच्या समकालीन व मोगल राजवटीतील इतिहास लिहिणारांनी इंग्लिश, पोर्तुगिज, डच, फ्रेंच व मोगल (फारसी) लेखकांनी देशपांडे कुटुंब हे "**प्रितीपात्र**" व छत्रपती शिवाजी महाराजांचे "**उजवा हात**" म्हणून समजले जाई व "**बॉडी गार्ड**" या नावांनी संबोधले आहे. रघुनाथ पंडीत शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून संस्कृतमधून "**राज्यव्यवहारकोश**" लिहावयास सांगतात. या कुटुंबाची पिढ्यान् पिढ्या मौलिक साथ राजांना लाभली असल्याने व सर्व अप्रकाशित कागदपत्रे प्रथमच वाचकांसमोर आल्याने, यामुळे शिवाजी राजांनी **बाळाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, बापूजी मुद्गल** त्यांचे आप्त मोरोपंत पेशवे, रामचंद्रपंत अमात्य, त्र्यंबकपंत डबीर, रघुनाथपंत कोरडे यांना राजांच्या तोलामोलाचे स्थान दिले होते.

शिवाजी राजांच्या राज्यात वतनाचे धोरण आवश्यक नव्हते. मोगल राजवटीत औरंगजेबाने ज्याप्रमाणे मातब्बर लोकास वतने देऊन वळविले तोच प्रकार राजारामांनासुद्धा अवलंबावा लागला की ज्यामुळे औरंगजेबाशी लढणे सोपे गेले.

शिवाजी महाराजांच्या वेळी पगार रोखीने होत असे. परंतु पैशाअभावी राजारामांच्या वेळची परिस्थिती वेगळी असल्याने २१ वर्षे स्वातंत्र्याचा लढा लढावा लागला. वतने / जहागिरी देण्याचा मार्ग चोखाळावा लागला. रामचंद्रपंत अमात्य हे पाच छत्रपतिंचे अमात्य होते. मुत्सद्देगिरी, राजनिष्ठा आणि प्रसंगी तलवार गाजवूनही सुराज्य राखावे लागले.

रामचंद्रपंत बाबडेकरांच्या (अमात्य) उत्साही कामगिरीमुळे राजाराम महाराजांच्या सात वर्षाच्या गैरहजेरीतसुद्धा दक्षिणेत मोगलांना फारसे काही करता आले नाही. शिवाजी महाराजांकडे जेवढे सैन्य होते त्यापेक्षा कितीतरी पटींनी ते आकाराने वाढले होते.

शिवाजी महाराज व मराठे केवळ गनिमी काव्याने लढले, हे काही इतिहासकारांचे मते, ही धारणा उभयतांचे अवमूल्यन करणारी आहे. शौर्यात युद्धतंत्राचीही सुयोग्य जोड असल्यास बलाढ्य शत्रूंनाही नामोहरम करता येते. उदा. वणी - दिंडोरीची लढाई पहा. मोगलांचे प्रचंड सैन्य व अजब तोफखाना पुढे असूनही मराठ्यांनी डाव्या-उजव्या बाजूंनी सैन्याचे आक्रमण केले व त्यामुळ प्रकाश - युद्धात मोगल हरले - मराठे जिंकले. सेनापती नारायण नांदोशीकर देशपांडे यांनी मोगल सैन्यावर हल्ला करून शत्रूचा तोफखाना थंड ठेवला. एकच गोष्ट वाईट झाली की नारायण देशपांडे कामास आले (१७ ऑक्टोबर १६७०) - राजे शोकाकुल झाले.

लेखकाने पुस्तकात नमूद केलेले उपरोक्त मुद्दे युद्धनीतीबद्दल विशेष प्रकाश टाकतात.

- मेजर मु. ना. जोशी

(इतिहास संशोधक)

।। श्री ।।

पश्चिम भारतातील सर्व शहरात पुणे या शहराची एक वेगळी शान आहे आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. मावळ आणि देश यांच्या सरहद्दीवर वसलेला पुणे हा एक फार प्राचीन प्रांत आहे. 'सिलीकॉन व्हॅली' म्हणून माहिति तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर पुण्याचें नाव पुढे येत असतानाच पुण्याजवळील दक्षिणेस असलेल्या सिंहगडच्या पायथ्याशी असलेला नांदोशी या गावातील सर्वांनाच ज्ञात असलेले गावचे पाटील श्री. राजाराम शंकर देशपांडे ह्यांनी संग्रहीत/संकलित केलेली 'मुद्गल - नऱ्हेकर - नांदोशीकर - देशपांडे शिवछत्रपतींच्या कालखंडातील ऐतिहासिक कागदपत्रे' हे पुस्तक खरोखरीच वाचनीय आहे.

ह्या कागदपत्रातून देशपांडे यांचा ओघानेच पुण्याच्या इतिहासाचा आढावा घेणाऱ्या ह्या पुस्तकाचे काम साकारताना बघायची संधी मिळाली. 'इतिहास' शब्दाचा अर्थच खूप व्यापक आणि बोधक आहे. प्रत्येक वेळ, वस्तू, वास्तू आणि व्यक्ती ह्यांच्यामागे एक इतिहास असतो.

तो अभ्यासपूर्वक जाणून घेऊन पुस्तकरुपात एकत्रित करण्याचे अवघड काम श्री. राजाराम शंकर देशपांडे ह्यांनी करून दाखविले आहे.

पेशवेकालीन पुण्याचे ऐश्वर्य व वैभवाची लोकांना आठवण करून देत तत्कालीन पुणे शहराची, परिसराच्या माहितीला इतिहासाची जोड देऊन नांदोशी गावाच्या निर्मितीपासून श्री वडजाई/ वज्रादेवी देवस्थानापर्यंत विविध स्थळे, घटना, घडामोडी आणि वास्तू यांच्या तपशीलवार वर्णनांसह प्रस्तुत पुस्तकात निवेदन केले आहे.

या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे इतिहासातील संशोधनात्मक लेखन असूनही ते अत्यंत सहजसुलभ घाटणीचे आणि ओघवत्या प्रसन्न शैलीतले आहे. इतिहासातील दाखले देत वास्तव परिस्थितीची माहिति देणारे हे पुस्तक इतिहासाच्या अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य वाचकालाही रमविण्याचे सामर्थ्य ह्यात भरून राहिलेले आहे.

सध्या इतिहास संशोधन व अध्ययन दुर्मिळ होत चाललेले असताना वयाच्या ७४ व्या वर्षी इतिहास जाणून घेत अनेक वर्षे विस्मृतीत गेलेला हा दुर्मिळ खजिना पुन्हा नव्याने वाचकांपुढे, जाणकारांपुढे मांडण्याचे अत्यंत अवघड पण त्याचबरोबर तरुणांना नव्याने संजीवनी देण्याचे काम श्री. देशपांडे ह्यांच्या लेखनातून झाले आहे.

इथे शिवपूर्वकालापासून चालू वर्तमानकालापर्यंत एका विशाल प्रदेशात वाचक फिरून येतो.

हे लेखन केवळ अभ्यासकांपर्यंत मर्यादित न राहता ते सर्व स्तरांवरच्या जिज्ञासूंपर्यंत पोहचावे हाच एकमेव उद्देश ठेवून झालेले हे लेखन वैविध्यपूर्ण व अभ्यासपूर्वक सादरीकरणामुळे व्यासंगी वाचकांना उपयुक्त माहिती देणारे ठरणारे आहे.

वाचकांनी जिज्ञासा जागृत करून इतिहासातील संस्मरणीय प्रसंग व व्यक्ती ह्यांच्याविषयी नवी माहिती व नवे ज्ञान देणारा हा मराठी इतिहासातील आतापर्यंत अप्रकाशित असलेला दुर्मिळ खजिना खुला करण्याचे काम ह्या पुस्तकामुळे झाले आहे.

विपुल इतिहास साधने, संदर्भासाठी ऐतिहासीक कागदपत्रे मिळवून ती जुळवून इतिहास संशोधनाबरोबरच नवीन साधनांच्या माध्यमातून काम लवकर पण उत्कृष्ट व्हावे ह्याकरिता सतत प्रयत्नशील राहून चिकाटीने व जिद्दीने हे काम श्री. देशपांडे ह्यांनी पूर्ण केले.

पुस्तक वाचण्यावर भूतकाळ अभ्यासताना, इतिहासात खोलवर डोकावून रस घेणाऱ्या जिज्ञासूंना इतिहासातील संस्मरणीय प्रसंग व व्यक्ती ह्यांबद्दल जे परिचित नाहीत त्यांची माहिती मिळेल अशी खात्री वाटते.

सर्वच वाचकांची ह्या ऐतिहासिक वर्णनात्मक पुस्तकामुळे इतिहासाची गोडी निश्चितपणे वाढेल असा विश्वास वाटतो.

– सौ. किमया किशोर देशपांडे

।। श्री ।।

मुद्गल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांच्या ऐतिहासिक घराण्यासंबंधी संपादकांची बहीण कुसुम दंडवते यांनी नांदोशीकर देशपांडे या सरदार घराण्यातील एकत्र कुटुंबातील व्यक्तींबद्दल व्यक्त केलेले विचार प्रस्तुत पुस्तकात मुद्दाम समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यावरून पाटील घराण्यासंबंधी व्यक्ती विशेष प्रामुख्याने उद्धृत करणे आवश्यक आहे. ते विचार खालील प्रमाणे -

माझी १ जानेवारी १९२९ जन्मतारीख तर संस्मरणीय आहेच. नांदोशी हे माझे माहेरचे गाव. सिंहगडच्या पायथ्याशी डोंगराच्या कुशीत (पूर्वी हा भाग खेडेबारे म्हणून ओळखला जायचा) वसलेले छोटेसे गाव. पण गावाला तसा फार मोठा इतिहास आहे. आमचा वाडा **छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळेपासून असून राजे व त्यांची आई जिजाऊ बरेच दिवस येथे मुक्कामाला होते**, असे वडिलांनी आम्हास सांगितले. दगडी चिरेबंदी वाडा व ऐसपैस गढी असल्यासारखी वाड्याची रचना. चौसोपी वाडा. रस्त्याच्या एका टोकापासून त्याचे मागे असलेल्या रस्त्यापर्यंत विस्तृत रचना असलेला. समोर आड, आडापासून आमचे घराच्या तळघरापर्यंत जाणारा बंदिस्त मार्ग, आडाची चिरेबंद दगडी बांधणी, त्यावर घडीव दगडांची धांव, त्यावर बसविलेला रहाट, पुण्यापासून सुमारे १२ किलोमिटर अंतरावर असलेला हा गाव. त्यात पूर्वीप्रमाणे मोठे स्वयंपाकघर, माजघर, देवघर, ऐसपैस ओसरी, त्यापुढे दोन्ही बाजूंना गुरांचे प्रचंड गोठे, त्यालगतच्या बखळीत, घोड्यांचे तबेले, मागे पुढे प्रचंड अंगण, परस इतका भव्य वाडा व त्यात राबती माणसे, गड्यांकरिता स्वतंत्र सोय. खरोखरच वैभवाची साक्ष देणारा असा आमचा वाडा होता. जवळच मोगलपूर्वकालीन व छत्रपती शिवाजी राजांकडून इनाम वतनाची जमीन, आंब्याच्या प्रचंड बागा, शेतमळा, सहा बारमाही पाण्याच्या विहिरी, जांभूळ, फणस, काजूची झाडे, वडजाई (वज्रदेवी) मंदिर इत्यादी वर्णन करावे तेवढे थोडेच. नांदोशी हे गावच इनाम मिळाले असलेल्या वंशपरंपरागत **पोलीस व मुलकी पाटीलकी** आजतागायत आमच्या घराण्याने केले असल्याने **खानदानी पाटीलकी** (जो गाव वसाहतीला योग्य करतो त्यालाच पाटील असे संबोधले जाते) गाजविली. गावातील तीन चतुर्थांश जमीन देशपांडे घराण्याकडे असून, माझे वडील पोलीस व मुलकी पाटील असल्यामुळे मान मरातब, वतनदार, जमीनदार, इनामदार इ. उपाधी त्यापाठोपाठ आलीच.

घरात ४५ माणसांचे एकत्र कुटुंब, गोठ्यात साठ जनावरे (गाई, म्हशी, जातिवंत खिलारी बैल, वासरे), फारच सुस्थितीत असलेले आमचे घर, माझे वडील त्यांचे तिघे सख्खे बंधू, दोन आत्या घरी आलेल्या, एवढ्या कुटुंबाचा विस्तार. त्यामुळे बाकीच्यां आमच्या कुटुंबाबद्दल फारच आकर्षण असायचे. मला शाळेत घालायची वेळ आली त्यामुळे मी फॉर्म घेऊन आले. मी पुण्यास काकांकडे असायची. कारण माझे आई-वडील नांदोशीस असायचे व शिक्षणाची मुले पुण्यातल्या घरी अशी पद्धत होती. पुण्यात आमचे लक्ष्मीरोडवर होलसेल सायकल विक्रीचे दुकान होते. तेथे माझे धाकडे दोन काका बसायचे. दुसरे काका यांचे सासवडला सायकलचे दुकान होते. आम्ही १७ बहिणी व आठ भाऊ एकत्रच वाढलो. हे प्रेम मला एकत्र कुटुंबात अनुभवाला मिळाले. माझ्या माहेरातील फॅमिली मेंबर्सची यादी दिली व ती पाहिली की हल्लीची पिढी निःसंशय आश्चर्यचकित झाल्याशिवाय रहाणार नाही.

१) ... चौघांच्या एकत्र कुटुंबातील बंधूपैकी माझे वडील सर्वात मोठे ... शंकर रामचंद्र देशपांडे, माझी आई पार्वतीबाई. आईला सहा मुले ... पाच मुली व एक मुलगा (राजाराम), असा परिवार. माझी थोरली बहिण **शांता शिंदगीकर**. शांत स्वभावी, लग्नात १३ वर्षाची होती. तीला तीन मुले व एक मुलगी. दुसरी मी, **कुसुम दण्डवते**. मला दोन मुल, दोन मुली. तिसरी बहिण **तारा सोनटक्के** ... तिला एक मुलगी, एक मुलगा चौथी **विमल पिंगळे**. पाचवी बहिण **कमला सहस्त्रबुद्धे** ... तिला दोन मुली, भाऊ राजाराम (वडीलांचे पणजोबांचे नाव) ... अशी आमच्या आईची २१ नातवंडे आहेत.

२) ... थोरले काका **मार्तंड त्यांचे नाव, पत्नी – लक्ष्मीबाई**. तिला ४ मुली ३ मुलगे असा काकूचा परिवार. मोठी मुलगी प्रभावती सोलापूरकर, दुसरी मालती देव – (चिंचवडचे), कमल पानसे (सरदार पानसे घराण्यातील), शरयू किराणे. तीन मुलगे – थोरला रंगनाथ, मधला अरुण व धाकटा – नारायण. काकूला एकूण २० नातवंडे आहेत.

३) ... मधले काका, **दत्तात्रय रामचंद्र देशपांडे, काकू आनंदी**. तिला ४ मुलगे व ४ मुली. मधुकर, रामचंद्र, वसंत व दिगंबर हे चार मुलगे. पुष्पा पारखी, रजनी थिटे, सरोज याकुंडी व कुंदा खळदकर अशा चार मुली ... अशी आनंदी काकूची २० नातवंडे आहेत.

४) ... धाकटे काका, **विनायक रामचंद्र देशपांडे, पत्नी सरस्वतीबाई,** मुली अंबू गंधे, मंगल कुलकर्णी, प्रमोद काळे, उषा इनामदार - या चार मुली. लक्ष्मण, कृष्णा ही दोन मुले ... या काकूंनासुद्धा २० नातवंडे.

मौजे नांदोशी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे आमच्या मालकीचे वडजाई (वज्रादेवी) देवीचे देऊळ आहे. तेथे दसरा व माघी पौर्णिमेस वर्षातून दोन वेळी पालखी निघते. हा मान आठशे वर्षापासून आमच्या घराण्याचा असून आमचे घरातून पालखीची मिरवणूक निघते व आमचे घरातच ती ठेवली जाते. पालखीला लग्नकार्याप्रमाणे घरातील मंडळी जमा होतात. पाटीलकीचा मान असल्यामुळे देवीची पालखी, देवीच्या उत्सवाची सर्व तयारी याची धामधूम असायची. पुण्यातून आमची बैलगाडी पाठवून सामानसुमान यायचे. माझे वडील मी सहावीत असताना गेले. पण काकांनी आम्हाला कधी जाणवू दिले नाही. बैलगाडीत बसून आम्ही नांदोशीला जात असू. माझे वडिलांना जनावरांची फार हौस होती. तीस वर्षे दुग्ध व्यवसाय जोरांत होता. गिऱ्हाइके पुण्यातील असत. जाता येता व कार्याच्या प्रसंगी बैलगाडीने प्रवास होत असे. बैलपोळ्याच्या दिवशी पाटलाच्या घरचे १२ ते १५ रंगविलेले बाशिंगाने नटविलेले बैल गावच्या चावडीवर **प्रथम मानांकन** घेत असत. वडिल / काका बंदुकांच्या फैरी काढत असत. रुबाबदार बैल हे कुटुंबाचे भूषण होते. त्यावेळी तिन्ही बाजूस डोंगर, दाट झाडी असल्याने वाघ, डुकरे, ससे, मोर, हरणे, विषारी साप हे दिवसा ढवळ्या शेतामधून फिरत असत. वाघ तर वारंवार गावातील वस्तीत येऊन जनावरे मारीत असत. एकदा तर आम्ही सुट्टीला नांदोशीस असता फौजदार नावाच्या बैलाने धावून आलेल्या वाघाला जायबंदी करून मारुन टाकलेले आम्ही प्रत्यक्ष पाहिले. आमच्या घराच्या समोरचे बाजूस सिंहगड उर्फ कोंढाणा असल्याने रानटी जनावरे शेतात / गावात नेहमी येत.

... माझी आई, पार्वतीबाई एका सुसंस्कृत घराण्यातील (डॉ. जेजुरीकर) होती.तिचे हुजुरपागेत इ. ४ थी (इ.स. १९०४) शिक्षण झाले होते. इंग्लीश बोलायला येत होते. तिचे वडिल व तिचे काका हे सर्व डॉक्टर होते. व एक पुण्याचे महापौर झालेले होते व कॉसमॉस को ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे संस्थापक होते. अशा या घराण्यातील आमची आई अशा या घराण्यातील आमची आई एका शेतकरी कुटुंबात (चौघा भावांच्या) एका कुटुंबात आली व नांदोशीस राहिली. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे तिला पहाटेपासून कामला लागावे लागत होते. नांदोशीला गिरणी नव्हती. घरी १३ / १४ दळण्याची लहान मोठी जाती होती. त्यावर दळणकाम चाले. शेणगोठा पण करावा लागे. त्यावेळेस गावाला स्वतंत्र पाण्याची

व्यवस्था नव्हती. डोक्यावरून ३ / ४ हांडे आमच्या मळ्यातील / इनामांतील विहिरीतून दररोज पाणी आणावे लागे. घरासमोर आड होता. तेथून इतर कामासाठी पाणी रहाटाने काढावे लागे. हे दृष्य आतां फक्त सिनेमातच कधीतरी दिसू शकते. पण मन मारून माझी आई हे सर्व करीत असे. त्यावेळी माझे तिघे काका, दोन आत्या व आजी असायची. तरीसुद्धा त्या सर्वांचे करताना कुठलेच स्वातंत्र्य नसायचे. घरात जुन्या पोथ्या असायच्या त्यांचे वाचन वेळ मिळेल त्यावेळी करीत होती. त्यात शेतात पण जायला लागायचे. घरचे धान्य (गहू, भात, हरभरा, डाळी इ.) डाळी घरीच सडायच्च्या तांदूळ सडण्यासाठी उभ्या आणि बैठ्या उखळी असायच्या १५ / २० मुसळे असायची. त्यांनी तांदूळ सडले जायचे.

घरी रोज एक किलोचा तांदूळ पाच किलोच्या भाकरी करायला लागायच्या त्यात भाजीसुद्धा स्वयंपाक असायचा. त्यावेळी रस्ता व वाहने यांची सोय नव्हती. बैलगाडीने किंवा चालत् पुण्याला यायचे. कारण बस ही एकच असून, ती सुद्धा नियमित नसायची. पावसाळ्यात चिखल, दगड गोटे तुडवतच प्रवास असायचा. वडिल काका व आई पुष्कळदा घोड्यावरूनच पुण्यात यायची मला आता आश्चर्य वाटते की एका स्त्रीत अशी अनेक रूपे पहायला मिळाली. कधी आई म्हशीची धार करताना आठवते, तर कधी शेणाच्या गवऱ्या थापताना आठवते, कधी डोक्यावरून हंडा व कमरेला कळशी असणारी आठवते, धुणे धुण्यासाठी गांवाच्या ओढ्यावर जाणारी, स्वयपाक घरात भाकरीच्या थाप्या थापणारी, कधी गडी माणसांना प्रेमाने जेवण वाढणारी, वासरांना / कालवडींना पाणी पाजणारी तर कधीशेतात मिरच्या तोडायला जाणारी आमची आई अशी विविध स्वरूपातील एक कर्तृत्ववान प्रेमळ अशी आमची आई पण माझे वडील गेल्यावर एक मूक अभिनय करणारी व स्वत:ला मन नसणारी अशी आमची आई पार खचून गेली. माहेरचे म्हणजे माझे आजोबा आईला पढवायचे तूं स्वत:चा निर्णय घे. पण आई कधी कुणाला न दुखवता राहिली प्रेमाने व कष्टाने घरातील सर्वांना जिंकले.

आमचे काकापण आईला कधी दुखवायचे नाहीत. अवघ्या ४० / ५० माणसांच्या कुटुंबाची ती आईच राहिली. माझी चुलत भावंड आमच्या आईला आईच म्हणत व त्यांच्या आईला काकू म्हणत माहेरी (डॉ. जेजुरीकांकडे) आईला शाळेत पोचवण्यासाठी बरोबर शिपाई असायचा डबा दप्तर घ्यायला पण सासरी ती शेतकरी कुटुंबातील कुटुंब प्रमुख होती. वडिलांच्या पश्चात सर्व मुलींचे लग्ने काकांनीच केली.आईचे माहेर एक ध्येयवादी कुटूंब होते. सावरकरवादी, हिंदुत्वनिष्ठ तिच्या माहेरी सावरकर, भोपटकर यायचे.

आमची आत्या.......... लग्न होऊन सासरी पंढरपूरात गेली त्यावेळी प्लेगच्या साथीत तिचा नवरा गेला. माहेरी आली ती जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत माहेरी येताना बिंदी पट्ट्यासह दागिने घेऊन आली. शिक्षणाची आवड असून पुरी करता आली नाही शिक्षण चौथीपर्यंत झाले. आमच्या थोरल्या काकांनी तिने सासवडला सायकल दुकान काढून तिचे दागिने खर्च केले. धाकट्या दोन काकांनी लक्ष्मीरोडवर होलसेल सायकल विक्रीचे दुकान काढले पुण्यातले पहिल्या पांच दुकानापैकी होते. परदेशी माल यायचा तो पुण्यातील व पुण्याबाहेरील किरकोळ दुकानदारांकडे विकला जायचा. त्यामुळे दुकानाची भरभराट झाली. त्यांतच युद्ध सुरू झाले व पैसा भरपूर यायचा. नंतर काकांनी ३५९ शनिवार पेठ येथे जुने घर रु १६०००/- घेतले. व थोरल्या काकांनी मंडईजवळ नवीन सायकल दुकान स्वतःच्या खर्चाने काढून दिले. त्यामुळे आत्याला घरात मान व दरारा मिळत होता. सर्व काकू सासूबाईप्रमाणे त्यांच्या आज्ञेत वागत. शनिवार पेठेतील घरात २५ भाडेकरू होते. त्याचे भाडे गोळा करण्याचे काम माझ्याकडे असे. दुधाच्या रतिबाची बिले, शेतातील गहू, तांदूळ, भाजीपाला याचे हिशेब बधावे लागत होते. त्यामुळे मलाही घरात प्रतिष्ठा होती. सर्व जावयांवर तिचा लोभ असायचा. माहेरी गेलो की जेवणामध्ये भजी ही केली जायची. आत्या सर्व काका जावयांची खूप बडदास्त ठेवायचे. शेतावर गडी कांही कामानिमित्त शेऊ शकला नाही तर ती स्वतः शेतावर कामे राखणीसह करायची. अशा तऱ्हेने स्वतःचे जीवन समर्पण करणारी आमची आत्या .... तिची वारंवार आठवण न होऊन कसे चालेल ?

मार्तंड रामचंद्र देशपांडे - माझे थोरले काका सोशिक व कष्टाळू, काकू लक्ष्मीबाई तिचे माहेर जेजूरीचे काकांनी आम्हाला पोहायला शिकविले होते. मी व त्यांची मुलगी प्रभावती नांदोशीकर (महारकी) विहीरीत पोहायला शिकलो. अनेक वर्षे सायकल धंदा असल्याने जेव्हा जेव्हा सायकलीच्या पेट्या दुकानात येत तेव्हा तेव्हा आम्ही सर्व भावंडे सायकली दिवस रात्र करून जोडत असू शिवाय सुट्टीमध्ये आम्ही सर्व बहिणी व भाऊ नांदोशीकस शेतामध्ये भाजीपाला लावायला जायचो. बैलगाडीने रोज माल पुण्यात आल्यावर मंडईमध्ये पोहोचता करून लिलाव झाल्यानंतर त्याचे पैसे घेऊन यायचे अशी कामे होत असत. मोठी आंबराई व मोसंबी/पेरूच्या बागा असल्यामुळे एकदाच तोड झाली की त्या पैशावर एक एक लग्न किंवा मुंज पार पडावयाची. मुंबईला सुद्धा आंब्याचे हारे व करंड्या पाठविल्या जायच्या. त्यामुळे शेतकरी कुटुंब, व्यापारी धंदा - त्या वातावरणाचह आम्हां सर्वांना आपेआप सवय लागली.

१९४८ साली गांधी खून खटल्यात आमचे घर जळाले. धायरीतील माणसांचा त्यांत समावेश होता. कमिशनवर बर्वे असताना त्यांची चौकशी व शिक्षापण झाली. परंतु माझ्या काकांना भर दिवसा कुऱ्हाडीने वार लावून मस्तकावरचा नऊ इंचाचा भाग चिरला गेला होता. सहा महिने ते शनिवार पेठेतील डॉ. धारप यांच्या दावाखान्यात होते. चांगले पावनेतीन महिने आमचे घर जळत होते व त्यांत गांवच्या धान्याची पोती जळून गेली. सर्व चीज वस्तू जळाल्या भांड्याकुंड्यांच्या व शेती औजारांच्या तांबा / पितळ लोखंडाचा रस हाऊ न गेला. आर्म्स व ॲम्यूनेशन जळतेसमयी वाड्याच्या मागील विहिरीत टाकल्यामुळे वाचले. प्रतिकार करताना गावातील मंडळींनासुद्धा त्रास झाला.

घोड्याच्या पागेमागच्या बखळीत पुन्हा घर बांधले तळमजला १८ खण व पहिला मजला ९ खण अशी २७ खण जागा बांधून जिद्दीने सर्व व्यवहार सुरूझाले. काका काकू तिथेच राहिले. मुलींची लग्ने कार्ये होत राहिली. कधी सुखाचे व विश्रांतीचे आयुष्य उपभोगावयास मिळाले नाही. आम्ही मुली सुट्टी संपतेक्षणी त्यांना वाईट वाटायचे. त्यादिवशी ते खडकवासल्याहून किराणा माल मागवित व पुरणपोळीचा बेत केल्याशिवाय जाऊ देत नसत. सख्खी - चुलत भावंडांचा विचार त्यांच्या मनाला कधी शिवलाच नाही. निघते वेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू जमा होत. आम्हालाही गलबलल्यासारखे व्हायचे. पुढील भेटींच्या वेळी ''अश्रुंची झाली फुले'' होऊन वातावरण परत सुरळीत व्हायचे.

दत्तात्रय रामचंद्र देशपांडे - मधले काका त्यांना ''आप्पा'' नावाने सर्व संबोधीत व्यायाम व कुस्त्या खेळून शरीर तयार झालेले अनेक बक्षिसे मिळवीली. रेखीव चित्रे काढण्यात पटाईत शांत व भोळ्या स्वभावाचे, व्यवहार कुशल, वधु-वर सूचक मंडळासारखे लग्ने ठरविण्यात पटाईत.

सायकल दुकानात गिऱ्हाईक आल्यावर त्यांची इत्थंभूत माहिती गोळा करून नोंद ठेवणार. आमच्या आत्याने व काकांनी आम्हा बहीण भावंडाना अशी शिस्त लावली की दिवाळी दसऱ्यास भावांनी चुलत बहिणीकडे भाऊबीजेसाठी जेवायला जायचे व बहिणींनी चुलत भावांना बोलावयचे असा प्रघात होता. त्यामुळे शेवटपर्यंत बहिण - भावंडांत आपपरभाव कधीच निर्माण झाला नाही. चांगल्या अगर वाईट प्रसंगी हे सख्खे व हे चुलत असा भेद कधीही नव्हता. एकमेकांकडे वारंवार जाणेयेणे असायचे. **आनंदीबाई** - ही माझी काकू. अतिशय भोळी भाबडी. पण प्रेमळ व आप्पांची दुसरी बायको. मधुकर पहिल्या बायकोचा. पण हा फरक कोणासही जाणवला नाही. तिचे माहेर हिवऱ्याचे. सरदार घराण्यातील

बोकील, त्यांचे सुद्धा थोरले कुटुंब होते. घरी गाई म्हशी असल्यामुळे बारा महिने खरवस व्हायचा. तो सर्व लग्न झालेल्या मुलींकडे पोहोचता व्हायचा. सासवडला त्यांचा मोठा वाडा आहे.

आप्पा व आण्णा (धाकटे काका) हे सायकल डीलर असोसिएशनचे पदाधिकारी होते. सर्व परदेशी मोटार सायकलींचे पण विक्री व्हायची. परदेशी सायकली, रॅले, रजू, रॉबिनहूड, स्टेगर, बीएसए, हंबर. विक्रीपण मोठ्या प्रमाणावर व्हायची.

विनायक रामचंद्र देशपांडे ... धाकटे काका. त्यांना सर्वजण ''अण्णा'' म्हणायचे. काकू सरस्वतीबाई. देशपांडे घराण्यातील एक आधारस्तंभ. दुकान भरभराटीला आणण्यात मुख्य वाटा. कुटुंबाचा डोलारा सांभाळण्याचे काम त्यांचेच. सायकल डिलर्स असोसिएशनचे मुख्य. आमचे दुकान पुण्यातील पहिल्या नंबरचे. १९४३ साली शनवार पेठेत घर बांधल्यानंतर

वाड्यात मागील बाजूस दोन मजली चाळ बांधली काकू-सरस्वतीबाई दिसायला चांगली दागदागिने घालून लग्नाला कुणाकडे निघाली की नकळत बायकांनासुद्धा मागे वळून पहावेसे वाटे तिला ४ मुलगे ४ मुली असूनसुद्धा तिचा फॉर्म काही बदलला नाही घरात नकळत तिचा वरचष्मा असे पण आत्याच्या धाकात असे आणा मात्र सर्वांना सांभाळून घेऊन वागत असत. आमच्या घरात आले - गेलेल्यांचे अतिशय स्वागत व्हायचे नातेपरिवार फारच मोठा. प्रत्येक लग्न कार्यात एक हजाराहून जास्त नातेवाईक यायचे डायबटिसने आजारी पडले नांदोशी येथे प्रत्येक कुटुंबात अडचणीतील लग्न कार्ये देशपांडे कुटुंबाने पार पाडलेली आहेत. माझ्या भावाची मुंज व लग्न कार्ये देशपांडे कुटुंबाने पारपाडलेली आहेत. माझ्या भावाची मुंज व लग्नकार्य पुण्यातच झाले. त्यात खूपच मोठी वरात काढली होती पुढे ७०-८० जणांचे ढोल लेझिम व त्यामागे प्रभात ब्रासबँडची पथके रस्त्यावर सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. गावकरी मंडळींना दोन्ही दिवस दोन वेळा मेजवानी मिळाली. ३५९ शनिवारपेठेतील जुने बांधकाम पाडून सिंमेंट काँक्रीटची सहा मजली प्रचंड वास्तू मिलिंदच्या पुढाकाराने देशपांडे वाड्याला नवलाई मिळाली. मिलिंदचे सर्व चुलत बंधू त्या नव्या वास्तूत प्रवेश करते झाले.

प्रसंगवशात वरीन परिस्थितीत बदल घडत गेले परंतु हे विचार येथेच संपविते.

- कुसुम भालचंद्र दंडवते.

संपादकीय

आजपर्यंत खेड शिवापूर देशपांडे करिना दोन खंडांत प्रसिद्ध झाला. ते कृष्णाजी वासुदेव पुरंदरे (इ. स. १९२६) यांनी छापून प्रसिद्ध केले आहेत. शिरवळ व शिवापूरचे देशपांडे ही वेगवेगळी घराणी आहेत. तसेच १२ मावळांमधील देशपांडे; व कर्यात मावळ येथील देशपांडे घराणी ही वेगवेगळी असून त्यांच्या वंशावळीही अलग अलग आहेत. यामध्ये नऱ्हेकर देशपांडे व मुदगल नांदोशीकर देशपांडे असे दोन भाग आहेत सिंहगड किल्ल्या सभोवतालचा परिसर शिवाजी महाराजांचे वेळेस खेडेबारे म्हणून गणला जात असे. खेडेबारे हा भाग छत्तीस गावं मिळून बनला आहे. त्यांतच मौजे नांदोशी तालुका हवेली; जिल्हा पुणे व खेड शिवापूर हा भाग आहे.

पुणे सिंहगड रस्त्यावर मौजे धायरीला लागून नांदोशीची शीव येते. पुण्यापासून बारा किलो मीटर अंतरावर नांदोशी असून ते सिंहगडाच्या पायथ्याशी येते. घरांतून सिंहगड किल्ला दिसतो. नांदोशी गाव छोटेखानी, वस्ती अंदाजे २५०० डोंगरांनी वेढलेले (तीन बाजूंनी); दाट झाडी व निसर्ग सुंदर शांत वातावरणाने समृद्ध त्यांत ऐतिहासिक महत्त्व लाभलेले व शिवरायांच्या वास्तव्याने पावन झालेले गाव असून त्याचा इतिहास लिहिण्याचे काम हाती घेतले. प्रकाशित व अप्रकाशित अशा सर्व अस्सल कागदपत्रांचा समावेश करण्यांत आला आहे. तसेच इतरही माहिती नमूद करणे आवश्यक आहे असे वाटते.

शिरवळकर देशपांडे करिना खेड १ व २ श्री पुरंदरे यांनी व अनेक समकालीन लेखकांनी देशपांडे घराण्याबद्दल त्रोटक माहिती, सनदापत्रे, बखरीं मधून, प्रकाशित साधनांमधून नमूद करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये शिरवळकर देशपांडे; खेडेबारेकर मुदगल् नऱ्हेकर देशपांडे व कसबे खेड येथील शिवापूर देशपांडे यांच्या संदर्भात संपूर्ण इतिहास अंतर्भूत केलेला कोठेही पाहिला नाही. तसाच तो दुसऱ्या कोणी

लेखकाने तो अंतिम टप्प्यावर नेलेला ही पहाण्यांत नाही. मात्र त्या त्या घराण्यांत कोणा कोणाला इनाम, वतने, जहागिरी, हवालदारी दिली; कोणी कोणाकडे नोकरी (शिवाजी/ आदिलशाही/ कुतुबशाही/ मोगल) केली; स्वराज्यासाठी कोण उपयोगी पडले, लढायांत कोणी कोणी भाग घेतला त्याचा लहान मोठ्या प्रमाणांत आढावा घेतलेला दिसून आला. खेडेबारेतील कसबे खेड व नांदोशी येथील घराण्याची हकिकत किंवा करिना पूर्णपणे घेतलेला, एकत्रित केलेला इतिहास आढळला नाही. देशपांडे वतन कोठेही जरी असले तरी त्यांचे इतिहासाविषयी अनेक बाबी नजरेसमोर येतात. म्हणजे त्या व्यक्तिने "वतनदार" सरंजामदार म्हणून केलेले काम व स्वराज्यासाठी गड, कोट राज्ये जिंकण्याचे काम त्यांत छत्रपति शिवरायांनी स्वराज्य स्थापनेच्या कामी ज्या ज्या व्यक्तिंनी कार्य केले त्यांचे ते कार्य काही विशिष्ट घराणी करीत असत व अशा घराण्याची माहिती अैतिहासिक लेख, पुस्तके, बखरी यांतून त्रोटकपणे जशी उपलब्ध झाली त्यांतूनच मुदगल नांदोशीकर देशपांडे किंवा न्हेकर देशपांडे या घराण्याबद्दल आहे. ही दोन्ही घराणी एकच असून त्यांचे कार्यक्षेत्र तर्फखेडेबारे अंतर्गत मौजे नांदोशी, तालुका हवेली, (पूर्वीचे कर्यात् मावळ) जिल्हा पुणे व तर्फखेडेबारे अंतर्गत **कसबे खेड व खेड शिवापूर** येथील देशपांडे हे वतनदार, सरदार, हवालदार इ.

नांदोशी येथील देशपांडे घराणे हे मुसलमान अंमलाचा पूर्वीपासून ते शिवकालांता, पेशवे व ब्रिटीश अंमदानी अखेर असे अस्तित्वांत होते. त्यांचे कागदपत्र लेखकास १९९५ ते २००४ या अवधित "**भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे**" व "**पेशवे दप्तर" यांजकडून सही शिक्यानिशी उपलब्ध झाले.** लेखकाचे वडील, चुलते पोलीस व मुलकी पाटील असल्यामुळे त्यांना फक्त वतनाबद्दलचीच माहिती होती. आमच्या घराण्यांत मूळ पुरूषापासून शिवशाहीच्या अखेरीपर्यत मुदगल देशपांडे न्हेकर नांदोशीकर घराण्यांतील व्यक्ति व त्यांचे आप्त फारच शूर व लढवय्ये होते व त्यांनी स्वराज्य स्थापनेपासून शिवशाहीच्या अखेरीपर्यंन्त व त्या नंतरही शेकडो लढायांत भाग घेतला कित्येक जणांस वीरगतीही प्राप्त झाली.

इतकेच काय, **देशपांडे घराण्यांतील व्यक्तींची आप्तेष्ट मंडळीही श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत मोठमोठ्या हुद्यावर होती. अष्टप्रधान मंडलांतील तिघे जण मुख्य प्रधान श्री (१) मोरेश्वर त्र्यंबक पिंगळे उर्फ**

पेशवे (२) रामचंद्र पंत (सुमंत) (३) नारो नीलकंठ व निलकंठ मुजुमदार अमात्य (४) रघुनाथ नारायण कोरडे, (५) प्रभाकर भट्ट (६) नारायण भट्ट (७) श्रीदेव चिंचवडकर, (८) बाळंभट उपाध्ये व (९) कसबे खेडे बारे येथील जोशी ठकार अशी मंडळी होती. मोरोपंत पेशवे (मुख्य प्रधान) यांनी जवळ जवळ १४० पेक्षा अधिक लढायांत भाग ही सर्व लष्करी इतिहासाच्या दृष्टीने विशेषत: प्रतापगडाचे युद्ध, अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानावर हल्ला, व सुरतेचीमोहीम ही गनिमी काव्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. शिवाय मराठेशाहीच्या सीमा पेशवाई अखेरपर्यंत २५० पटीने वाढल्या आहेत.

अप्रकाशित इनाम वतने, देशपांडे यांची वंशपरांगत पाटीलकी व सेनानायकत्त्व व लढायांत घेतलेला भाग यासंबंधांत संपादक राजाराम देशपांडे यांनी बारामती, औरंगाबाद, मुंबई, सिल्लोड, कन्नड, श्रीगोंदा व बृहन्ममहाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद-रत्नागिरी या ठिकाणी शोध निबंध सादर केले असून त्यांची त्यांच्या घराण्याविषयी हजारोंचे वर अप्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रे प्रथमच वाचकांसमोर वाचलेली आहेत. विशेषत: इ.स. १६३० ते १६८० पर्यन्तची कागदपत्रे प्रकाशांत आणली असून **छत्रपति शिवाजी महाराज, राजाराम व शाहू महाराज, पेशवे** व मराठेशाहीशी संबंधित असलेली दिल्लीचे मुघल बादशहाचे नववे अंमलदार बादशहा आलम (दुसरा राज्यकाल १७५९ ते १८०६ यांनी घराण्यास इनाम वतने, सरदारकी, सेनानायकत्त्व; जहागिरी; हवालदार-सुभेदारी दिली व त्यामध्ये चौदा पिढ्यांच्या समावेश आहे. या घराण्याचे कार्यक्षेत्र नांदोशी व कसबे खेडेबार (खेड शिवापूर) येथे आजपर्यंत अस्तित्त्वांत असून आजतागायत नांदोशी येथे शेती व्यवसाय स्वत: करीत आहेत. आताही प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

देशपांडे घराण्यातील व्यक्ति व त्यांचे जवळचे शेकडो आप्त शिवाजी महाराजांच्या वेळी शस्त्र व शास्त्र व शेती व्यवसाय निष्ठेने करीत होते व अजूनही करीत असून शिव स्वराज्याच्या मांडणी पासून अखेरपर्यंत स्वराज्याची सेवा करीत आले आहेत. छत्रपति शिवरायांच्या समवेत जे जे युद्ध प्रसंग घडलेले आहेत त्या त्या प्रत्येक बाबतीत देशपांडे व त्यांच्या आप्तांनी मोलाची कामगिरी केल्याचे इतिहास सांगतो. उदा. सिंहगड ताब्यांत घेणे, (बापूजी मुदगल) शाईस्तेखानावर हल्ला, (चिमणाजी

व बाळाजी बापूजी) प्रतापगडचे युद्ध-अफजलखानाचा वध (नारायण नांदोशीकर सेनापती) आग्राभेटीच्या वेळी घडलेले चित्तथरारक प्रसंग (रघुनाथ कोरडे व त्र्यंबपंत डबीर), सुरतेवरील पहिली लढाई (नारोबापूजी देशपांडे), वणी-दिंडोरीची व पुरंदरची लढाई (केसोनारायण देशपांडे व नारायण देशपांडे) या प्रत्येक प्रसंगी मुदगल्-नऱ्हेकर-नांदुसकर-देशपांडे व त्यांचे आप्त यांचा प्रमुख सहभाग होता. ज्यांत तीन नांदोशीकर-देशपांडे यांना लढाईमध्ये वीरगती प्राप्त झाली.

कृष्णाजी अनंत सभासद, ज्याने बखरीत छ. शिवाजी महाराजांचे "प्रीतिपात्र" म्हणून उल्लेख केला तेच हे देशपांडे कुटूंब जे केवळ पुण्यापासून १२ किमीवर अद्यापही कार्यरत आहेत.


शिवचरित्राचे पैलू या पुस्तकांत द. वा. पोतदार म्हणतात की जहागिरीच्या आसपासची ठिकाणे व्यापण्यात येत होती. सैन्य नाममात्रपणे सुलतानाच्या सत्तेखाली हे काम करीत होते. **बापूजी नऱ्हेकर, चिमणाजी/नऱ्हेकर नांदोशीकर, देशपांडे, मुदगल,** यांच्यामार्फत हे भाग शिवाजीने जिंकले होते. जदुनाथ सरकार त्यांच्या पुस्तकांत **बाळाजी/चिमणाजी बापूजी मुदगल् (देशपांडे)** हे छत्रपति शिवाजी राजांचे **"बॉडी गार्ड"** होते व ते छत्रपति शिवाजी राजांचे **उजवे हात समजले जात होते.**


इनाम वतनांचे व इतर अप्रकाशित साहित्य पेशवे दप्तरांतून (पुणे पुरालेखागार) सरकारी सही शिक्यांनिशी असून त्यामध्ये संस्कृत, पर्शियन, मोडी, इंग्लिश व मराठी इतिहास प्रसिद्ध साधनांचा समावेश आहे. त्याचा उपयोग विद्या वाचस्पतींना नव्याने करण्यास विद्यापीठाने मुभा दिली आहे.

इ. स. १६६५ च्या पुरंदरच्या तहांत छत्रपति शिवाजीराजांना जे २३ किल्ले मिर्झा जयसिंगामार्फत औरंगजेबास देण्यात आलेले होते. शिवाजी राजे आग्र्यास गेले त्यांचे पश्चात मोरोपंत पेशव्यांना (देशपांडे यांचे आप्त) सर्वच्या सर्व किल्ले लगोलग ताब्यात घेऊन स्वराज्याच्या सीमा पूर्ववत ठेवण्यांत यश मिळविले व सर्व मोगल अधिकाऱ्यांस काढून टाकले ही काही साधी गोष्ट नव्हे. कारण ज्या समाजाला व सुराज्याचा घास मुघल राजवटीत नष्ट होती किंवा कसे ही गंभीर बाबच होती.

मौजे-नांदोशी (कर्यात मावळ, खेडेबारे)
तालुका - हवेली जिल्हा - पुणे
येथील....
देशपांडे-पाटील-इनामदार यांची घरे व जमीनी
दाखविणारा कारणापुरता उतारा....

स्केल नाही
पुणे ते नांदोशी
अंतर =१२ किमी





पुणे शहराचा इतिहास व भौगोलिक परिस्थिती इ. स. १६०० ते १८२०

गेली चारशे वर्षे (इ. स. १६३६ ते १७७५ पर्यंत) पाटील पद व वतनांची वहिवाट देशपांडे घराण्याने (चौतीस व्यक्तिंनी) अव्याहतपणे सांभाळली आहे. हे उदाहरण इतिहासांत अपवादात्मक स्वरुपात असावे. तसेच स्वराज्यांत चार वेळी घर दग्ध होऊनही निष्ठेने ते संभाळणारे एकमेव देशपांडे घराणे. छत्रपति शिवरांयां अखरेच्या क्षणी सर्व राज्याची जबाबदारी देशपांडेच्या आप्तांवर सोपविली होती इतका विश्वास कुटुंबाने जपला होता.

खेडेबारे मधील कसबे खेडे याठिकाणी छ. शिवाजी महाराज व जिजाऊ देशपांडे कुटुंबाच्या वाड्यांत रहात होते. त्यांचा ठोबळमानाने वसतिक्रम असा होता.

(अ) १-२-१६३७ ते १७-२-१६४१ - १५२० दिवस
... बापूजी मुदगल् नऱ्हेकर यांच्या वाड्यात

(ब)१-३-१६४२ ते ३१-३ १६४७ ... १८५७ दिवस
(दादोजींच्या मृत्युपर्यंत)
... पुणे ते खेडेबारे, आलटून पालटून

(क) १-४-१६४७ ते ३१-५-१६४९ ... ७९२ दिवस
(शहाजींच्या सुटकेपर्यंत)
... खेडेबारे, कोंडाणा, पुणे

कसबे खेड येथे बापूजी मुदगल् - नऱ्हेकर व शिवाजी महाराज यांची घरे एकमेकां शेजारी होती शिवाजी महाराजांचा वाडा बांधून पूर्ण होईपर्यंत शिवाजी महाराज व जिजाऊ हे उभयतां बापूजी मुदगल् यांच्या वाड्यात वर निर्देश केल्याप्रमाणे वसतीस होते.

शिवाजीचा युद्धखोर (?) असून तो सतत युद्धात गुंतलेला असा समज सर्वत्र प्रचलित असला तरी त्याच्या आयुष्याचा १/७ भाग युद्धांत गेला व बाकीचा स्वाऱ्यांमध्ये मिळविलेले यश त्याच्या सरदारांनी मिळविल्याचे ठरते. स्वतः युद्धांत गेला नसतांही तसे शिवाजी शत्रूस भासवी. त्यांतच त्याच्या बुद्धीची चमक व कार्यकुशलता दिसून येते.

शिवाजीचा कालपट पाहिल्यास त्याच्या आयुष्याचे अधिक दिवस देशावर गेले. अर्थात कालपटांत पुणे, सुपे, बारा मावळे, वगैरे भाग हल्ली जरी देशांत मोडतो असे दर्शवले असले तरी त्याकाळी तो भाग कोकणांत मोडत असे.

मुदगल् - नऱ्हेकर - नांदोशीकर देशपांडे व आप्त संबंधातील व्यक्ति : देशपांडे घराण्यातील कागदपत्रांचा शोध व त्यांचे पराक्रमाबद्दल इतिहास लिहितांना त्यांचे आप्तांचीही माहिती या पुस्तकांत देणे वावगे होणार नाही. कारण त्यांनीही स्वराज्यासाठी अमोल निष्ठावानपूर्वक सहकार्य छत्रपतींना अखेरपर्यंत दिले आहे. म्हणनूच छत्रपतींना सर्व राज्य त्यांचे ताब्यांत सुरक्षित राहील म्हणून त्यांना राज्यांचे अधिकासुद्धा त्याप्रमाणे सोपविले होते.

नांदोशीकर व त्यांचे नातेसंबंध - श्यामराव पेशवे (मुख्यप्रधान) त्यांच्या मुलास नारो बापूजी यांची लेक दिली.

मोरोपंत पेशवे व नारोबापूजी - मुदगल् - नांदोशीकर व्याही व्याही.

निळोपंत सोनदेव बहुतकर यांचे मातुल कसबे खेडेबारेचे जोशी ठकार निळापंतांचे बाळपण मामाचे घरी गेले. शिवबा खेडेबाऱ्यांत लहानाचे मोठे होते असल्यामुळे व ते भोसल्यांचे कुलोपाध्य, त्यामुळे शिवबा निळोपंतास बाळपणापासून ओळखीत.

रघुनाथ बल्लाळ उर्फ नारायण कोरडे यास बापूजींची लेक दिली.

सोनाजीपंत डबीर यांची लेक बाळाजी बापूजीस दिली.

सोनाजीपंत डबीर यांचा मेव्हणा रघुनाथपंत कोरडे हे कान्हो डबीरांचे जावई.

चिंचवडचे देव यांचेकडे बापूजी पंतांजी लेक दिली.

बाबाजी नाईक पुंडे यांचे लेक नारायण यांसी रघुनाथ नारायण यांची लेक दिली.

प्रभाकर भट्ट व नारायणभट्ट हे बापूजी पंतांचे व्याही प्रभाकर भट्ट हे छ. शिवाजीराजांचे कुलोपाध्याय तसेच प्रभाकर भट्ट्याचे पुत्र बाळभट्ट उपाध्ये हे रायगडावर राज्यभिषेकप्रसंगी उपस्थित होते.

मोरोपंत पेशवे व निळो सोनदेव हे सोयरे-सोयरे मोरोपंत यांची लेक, (जानकीबाई) रामचंद्रपंत निळो सोनदेव (अमात्य) यांना दिली. खेड शिवापूर वाडा बांधून होईपर्यंत छ. शिवाजी महाराज व त्यांच्या मातोश्री (आऊसाहेब) देशपांडे कुटुंबाच्या वाड्यात रहात होत्या.

याप्रमाणे नांदोशी येथील देशपांडे घराण्याने आपली वतनदारी संभाळून संबंध गांवचा महसूल सरकारी खजिन्यांत जमा करून (लेखकाचा सुद्धां यांत समावेश

आहे.) स्वराज्यासाठी योगदान दिले हे इतिहास दप्तरी नमूद असून सुद्धा असा इतिहास अद्याप बऱ्याच अप्रकाशित गोष्टी नव्याने नजरेसमोर येत असल्याने पेशवे दप्तर व भारत इतिहास संशोधक मंडळांतील बरेच रेकॉर्ड उजेडांत आल्यानंतर आणखी बऱ्याच गोष्टी नमूद करण्यांत येतील.

जेवढी जेवढी इनाम वतने देशपांडे पाटील घराण्यांत आहेत ती ती घराणी स्वतंत्रपणे गांवीगांवी वतने संभाळीत आहेत. इतिहासांत आजपर्यंन्त प्रत्येक इतिहास लेखकाने देशपांडे घराण्याबद्दल कमी अधिक माहिती अैतिहासिक बखरीत विविध ठिकाणी नमूद केलेली आहेत. उदारणार्थ होनप देशपांडे (पुणे परगणा); शिरवळकर देशपांडे; खेड शिवापूरचे देशपांडे, डोणजेकर (लांडे) देशपांडे, मुदगल् ऱ्हेकर नांदोशीकर देशपांडे; सुपेकर देशपांडे. बाजीप्रभू देशपांडे, नरसी प्रभू देशपांडे वगैरे... परंतु त्या सर्व घराण्यांचा जहागिरी, वतनदारी संभाळून शेती व्यवसाय करणे व लढायांत भाग घेऊन स्वराज्याची सेवा करणे हे एकत्रितपणे घडले अशी थोडीच घराणी कार्यरत होती. सेवा कोठे करावी याचे बंधन कोणावरही नव्हते. नव्हे सामाजिक परिस्थितीच त्याला कारणीभूत होती. प्रत्येक देशपांडे घराण्याचा इतिहास वेगवेगळा आहे. वरील देशपांडे घराण्यापैकी खेडे शिवापूर व नांदोशी ही एकाच घराण्यांतील (मुद्‌गल ऱ्हेकर देशपांडे) परंतु स्वतंत्र अस्तित्व असलेली अशी होती व त्यांचा **मूळ पुरूष गोत्र व वंशावली** वेगवेगळ्या अस्तित्वांत होत्या व आहेत असे इतिहासांतील घटनांवरून दिसते. कारण मुद्‌गल ऱ्हेकर देशपांडे मंडळी दोन्ही ठिकाणांहून वतनदारीचे काम निभावीत होती. कारण नांदोशीकर देशपांडे यांचे मूळ पुरूष, **बापूजी मुदगल देशपांडे** यांचे रहाते घर खेड शिवापूर येथे कसबे खेड येथे होते. (पहा सभासद बखर; पुरंदरे दप्तर भाग १ ते ३)

शिवाजी महाराज व जिजाबाई हे **बापूजी मुदगल** यांच्याच वाड्यांत सुरवातीस रहात होते. दादोजी कोडदेव यांनी कोंडे देशमुख यांचे कडून जागा विकत घेऊन **बापूजी मुदगल** यांचे घराशेजारीच नवीन वाडा बांधवयास हुकुम केला. कारण शहाजी राजे यांचे पुण्यातील जागा व राहाते वाडे जळून खाक झाले होते. त्यामुळे कसबे खेड येथे वाडा बांधण्याचा निर्णय घ्यावा लागला. खेड गावांतील कसबे खेड भागाच्या दक्षिणेत १ किमी अंतरावर "शिवापूर" वसविण्यात आले. संभाजी महाराजासाठी "संभापूर" बसविण्यात आले. मातोश्री जिजाई यांचेसाठी पाषाण

येथे सहा किलोमीटरवर "जिजापूर" बसविण्यात आले व शिवापूरच्या शिवगंगा खोऱ्या नजिक कामथडीस जिजाईची खाजगी जमीन, ज्याला शेरी म्हणत ह्या सर्व गोष्टींचे रेकॉर्ड आज रोजी मला कोठेहि आढळून आले नाही. तसेच शिवाजी महाराज व जिजाई ज्या कसबे खेडमध्ये नवीन वाडा बांधून राहत होते ती जागा व मुदगल न्हेकर देशपांडे यांची त्या जागेशेजारील जागा शिवापूर ग्रामपंचायत रेकॉर्डला कोठेही आढळत नाही. छत्रपती भोसले घराण्याची मालकी असलेले रेकॉर्ड वरील ठिकाणी पहावयास मिळाले नाहीत. "संभापूर" हा भाग मात्र शाहूच्या वेळचा पुंड दमाजी थोरात याने संपूर्णपणे बेचिराख करून टाकला होता. (मध्ययुगीन चरित्र बोरा - सिद्धेश्वरशास्त्री चित्राव (भाईसंत - पुस्तक क्र. ५४९७ पान ४४५, दमाजी थोरात सन १७१०-१८ शाहू वेळेस एक बंडखोर होता.)

बापूजी मुदगल न्हेकर देशपांडे यांचे मुलगे चिमणाजी बापूजी मुदगल व बाळाजी बापूजी मुदगल यांचेही कार्यक्षेत्र शिवापूर, आर्वी नायगांव, कुसगांव, रांजे, डोणजे, शिरवळ, नांदोशी असा होता. त्यावरून या घराण्याचे कारभार सुरवातीस एकत्र व नंतर अलग अलगपणे कार्यवाहीत आले. शिवाय खेड शिवापूर येथील देशपांडे घराण्यांतील व्यक्तिंनी कोठेही लढायांत भाग घेतल्याचे इतिहासाचा मागोवा घेतला असतांना आढळून आले नाही. मुदगल नांदोशीकर न्हेकर देशपांडे या घराण्यांतील व्यक्ति व त्यांचे नजिकचे आप्त (म्हणजे **मोरोपंत पेशवे, निळो सोनदेव रामचंद्र निळो सोनदेव अमात्य, रघुनाथ कोरडे त्र्यंबकपंत डबीर,** इत्यादी यांनी मात्र शूर व लढवय्ये व राजकारणी म्हणून त्यांची प्रतिभा ठेवून अलौकिक दिव्य केले, प्रसंगी अनेक जणांना वीरगती प्राप्त होऊन प्रसिद्धीस पावले अैतिहासिक बखरी, दप्तरे, शकावली, करिना यांत विपुल माहिती उपलब्ध आहे.

खेड शिवापूर येथील दादोजी कोंडदेव यांनी आवाहन केल्यानुसार शहाबाग येथील "आंबा लागवड", त्यावर एवढा पैसा खर्च झाला आहे की पेशवे दप्तर, पुणे, जमाव, रुमाल नंबर ४५ ते ६५ (प्रत्येक रुमाल किमान ८०० ते १२०० पानांचा आहे.) पाहिल्यास व त्यांतील हिशेब मजकूर प्रसिद्ध केल्यास छत्रपति शिवाजी महाराजां पर्यावरण शास्त्रांत किती प्रगति करता येऊ शकते याची खात्री पटू शकते.

राजा शिवछत्रपतिंनी रघुनाथ पंडित यांना राज्य व्यवहाराकोश लिहावयास सांगितला. दक्षिण दिग्विजयाची हकिकत समकालीन लेखणीतून म्हणजे रघुनाथ नारायणाने लिहिल्याने शिवचरित्राचे मोजक्या शब्दांत कथन केले आहे. ते पुढील दोन श्लोकांत समर्पक रीतीने मांडले आहे.

क्रान्त्वा मंत्रबलेन यस्य निखिलामाशामवाचीं क्रमात्
कर्नाटक्षितीपांश्च भागनगराधीशं च कृत्वा वशे!
आसेतुप्रसृतांश्च यावनगणान्नुछिद्य तत्रावनी
पातारं व्यदधाद्यमेव तु शिवःसम्राडमात्यं निजम् ।।७८।।

ज्याच्या सल्ला मसलतीने (किंवा मंत्रबलामुळे) शिवराजाने कर्नाटकातीलराजे, हैद्राबादचा (भागानगराचा) राजा (कुतुबशाहीचा अखेरचा बादशाहा तानाशाह) जिंकून क्रमाक्रमाने सर्व पूर्व दिशा जिंकली, आसेतु पसरलेले यवनांध नष्ट करून टाकले **त्यालाच (रघुनाथालाच) त्या शिवसम्राटाने तेथे राज्यरक्षणकर्ता, "अमात्य" म्हणून नेमले.**

दक्षिण भारतातील देवालये उद्ध्वस्त तरी झाली असावीत किंवा त्यांचे पूजादि उत्सव बंद पडले असावेत. पण शिवाजी महाराजांच्या आज्ञेने हे उत्सव पुन्हां सुरू झाले. रघुनाथ नारायण म्हणतो.....

उत्सादितां चिरतरं यवनैः प्रतिष्ठाम्
शोणचलेशित्तुरयं विधिवद्विधाय!
श्री मुष्णवृद्ध गिरीरूक्मसभाधिपानाम्
पूजोत्सवान् प्रथयति स्म सहात्मकीर्त्या ।।८०।।

(राजकोश, मराठे, पृष्ठ २०, प्रस्तावना, सेतू माधराव पगडी)

रघुनाथ पंडित यांचे नाव "रघुनाथ नारायण हणमंते" **"नारोपंत दीक्षीत"** किंवा **"नारो त्रिंबक हणमंते"** हे रघुनाथ पंडितांचे वडिल यांनी यज्ञयाग केल्यामुळे त्यांना "दिक्षीत" ही पदवी प्राप्त झाली होती. त्यांचे वडील त्रिंबक किंवा त्रिमल्ल (राजवाड्यांचे मते त्र्यंबक) हे फार पराकमी योद्धे होते. हनुमंताप्रमाणे ते रणांगणांत

सदैव आघाडीवर असत. त्यामुळे त्यांना हनुमंते हे नांव मिळाले. हें हणमंते मुद्गल गोत्री ब्राम्हण असून ते मूळचे गंगाप्रांतीय नगर, औरंगाबाद इकडील होते असे राजवाडे म्हणतात.

नारायणपंत हणमंते हे लुकजी जाधवांकडून जिजाईचे पाठराखणे म्हणून शहाजीकडे आले. व त्यांच्या कर्नाटकांतील जहागिरीत कारभारी म्हणून राहिले. त्यांच्याकडे मुजुमदारी होती. ते शहाजीचे **धीसचीव** म्हणजे **निकटवर्ती** होते. ते व्यंकोजी एकोजीशी एकनिष्ठ होते. नंतर ते शिवाजीला येऊन मिळाले रघुनाथ पंडित ४ मे १६८३ साली वळणा (कर्नाटक) गांवी मरण पावला.

ह्याच रघुनाथ पंडिताने श्लोक नं ६७ राजकोश, मराठे; पृष्ठ १२ वर मुद्गल वंशातील व्यक्तींचे किती महत्त्व होते याबद्दल लिहिले आहे तो श्लोक असा...

आसंस्तस्य कुलामात्याः शिववर्म महीभृतः।
केचिन्मौदगल्यवंशाब्धि पूर्णचंद्रा महीसुराः ।।६७।।

त्याचा अर्थ...

मुदगल वंशसागरातून चंद्राप्रमाणे जन्मलेले काही ब्राम्हण त्या शिवराजांचे कुलपरंपरेने ''**अमात्य**'' होते.

तसेंच त्या छत्रपती श्री शिवाजीने यवनांच्या भाषेनं लोपून गेलेल्या राज्यव्यवहार पद्धतीचा संस्कृत भाषेतून प्रसार करणे साठी रघुनाथ पंडितांची नियुक्ती केली.

सोड्यं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निशाय मूर्ध्नि।
अमात्यवर्यो रघुनाथनामा करोति राज्यव्यवहारकोशम् ।।६२।।

अशा रीतीने मूर्धाभिषिक्त छत्रपति श्री शिवाजीने दिलेली आज्ञा मस्तकी धारण करून श्रेष्ठ अमात्य रघुनाथ हा राज्यवहारकोश रचित आहे.

छत्रपति शिवाजी राजांचा पहिला अमात्य ''**बाळकृष्णपंत हणमंते**'' हा ''नारोपंत दिक्षीत'' तथा ''नारो त्रिंबक हणमंते'' यांचा चुलत भाऊ. **इंदापूर परगणा** व **इंदापूर कसबा** यांचा भोसले घराण्याशी फार जुना संबंध. मालोजी राजे इंदापूरच्या लढाईत पडले. त्यांची समाधी इंदापूरात आहे. इंदापूर **कसबा व परगणा** या दोन्हींची पाटीलकी व देशमुखी भोसले यांची. त्यामुळे त्यांना इंदापूरचे घरन् घर

माहीत हणमंते हे इंदापूरचे वतनदार जोशी ''नारोपंत हणमंते'' हा शहाजीच्या पदरचा तोलदार माणूस बाळकृष्णपंतांनी श १५५९ ते श १५८२ (इ.स १६३७ ते इ.स १६६०) पर्यन्त "मुजुमदारी" केली. राज्याचा सर्व हिशोब कारभार करणे व सोडविलेल्या प्रदेशाची मुलकी व्यवस्था लावणे हे मुजुमदाराचे काम नंतर मुजुमदार पदावर मोरोपंत पिंगळे यांची योजना झाली (शिवचरित्र साहित्य खंड ७, प्रस्तावना, कृ वा पुरंदरे पान २६)

तेषु विख्यात कर्माभूत त्रिमल्लाख्यो युधाग्रणी:
दधते हनुमन्नाम यद्वंश्या: विक्रमार्जितम् ।।६८।।

अर्थ : त्यांच्यामध्ये त्रिमल्ल नांवाचा आपल्या रणकर्मा विषयी प्रसिद्ध असलेला होता. त्याचे वंशज, त्याने आपल्या पराक्रमाने मिळविलेले हनुमत् (हणमंते) हे नाव धारण करतात,

आऊजी गोविंद हणमंते - पेशवे हे मालोजी राजे यांचे दिवाण होते. हा **निर्देश वेरूळ येथील घृष्णेश्वर देवालयांतील शिलालेखांतही आहे. हा प्राचीन दाखला फार महत्त्वाचा आहे.** (शिव छत्रपतींची बखर व भोसले घराण्याची पृष्ठ ७)

इनाम वतनांत प्रत्येक गांवाच्या खानदानी पाटलास (आडनावाने पाटील नव्हे) झाडे लावण्याबद्दल त्यांच्या खर्चात झाडांच्या लागवडीबद्दल व संगोपनाबद्दल रोख मुशाहिरा लावण्याची तरतूद ठेवलेली असे. नांदोशी गावाचा हिशेब जमा वसूल (पुस्तकांत जोडला आहे.) पाहिल्यास राजांच्या, शेती विषयक, वतन विषयक गांवाचा वसूल जमा करण्याबद्दल किती कार्यक्षम व्यवस्था होती की शिवकालपश्चात् तीच पद्धत पेशवे, इंग्रजांनी व आतां स्वराज्यांतील कृषी धोरणावरून नजर टाकल्यास दिसून येते.

(१) मुद्गल, नऱ्हेकर, नांदोशीकर घराण्याचा इतिहास विचारात घेऊन पुस्तक लिहित असल्यामुळे नांदोशी येथील घराण्याचे अधिकृत सही शिक्क्याचे अप्रकाशित कागद मुद्दाम सर्वच्या सर्व समाविष्ट करण्यात आल्यामुळे व असा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न यापुढे कोणीही करणार नाही अशी संभावना असल्यामुळे सर्वसामान्य वाचकास काही माहिति अप्रस्तुत वाटण्याची शक्यता आहे. तसेच

प्रकाशित साहित्य निरनिराळ्या ग्रंथात तुटकपणे असल्याने ह्या पुस्तकात प्रकाशित व अप्रकाशित साहित्य एकत्रित केल्याने देशपांडे घराण्यातील व्यक्तिंना नातेसंबंध व त्यांनी शेकडो लढायात प्रत्यक्ष भाग घेऊन मर्दुमकी व शौर्य दाखविले हे व्यवस्थित लक्षात येण्यास मदत होईल. शिवाय देशपांडे घराण्यातील व्यक्ति व त्यांचे शेकडो आप्त छत्रपतींच्या कारकिर्दीत बहुमानाच्या व अत्युच्च पदावर काम करून स्वराज्याशी एकनिष्ठ राहिले. त्यांची आठवण सदैव त्यांना राहावी हा उद्देश आहे.

(२) संदर्भ सूची देताना लेखक निरनिराळ्या ग्रंथाचा उल्लेख करून पृष्ठक्रमांक देतो. पण प्रस्तुत पुस्तकांत सूची व प्रत्यक्ष बखरी व अस्सल उताऱ्यासह देलेली आहे. माझे पुस्तक प्रथम माझ्या मुद्‌गल, नऱ्हेकर, नांदोशीकर, देशपांडे घराण्याबद्दल लिहिले असून त्यांनी ह्या बखरी किंवा अस्सल उतारे शोधण्यास अवसर मिळणार नाही. अशी खात्री असल्याने त्या नोंदी मुद्दाम दिल्या आहेत.

(३) इतिहास संशोधक, तज्ज्ञ, लेखक यांस अस्सल कागदपत्रे पर्शियन, मोडी, मराठीतून लगेच उपलब्ध व्हावी हा उद्देश आहे. मोडी शिकवणाऱ्यांसाठी व विद्या-वाचस्पती करणाऱ्यांसाठीही त्याचा उपयोग करता येईल. कारण अजून बरेच कागद अभ्यासिले गेले नाहीत.

(४) माझ्या घराण्यातील ३४ व्यक्तींना मुलकी व पोलिसपाटील यांचे कार्य कशातऱ्हेने चालत असे हे प्रत्यक्ष इतिहासाच्या चारशे वर्षाच्या अस्सल कागदपत्रावरून ज्ञात होईल. (कृपया कोष्टक व वंशावळ पहावी)

(५) देशपांडे व त्यांचे आप्त (मुख्य प्रधान ते सरदार पदापर्यंत असलेले) हे श्री शिवछत्रपतींच्या कारकिर्दीत त्यांना शेवटपर्यंत सेनानायकत्वाच्या भूमिकेतून सतत साह्यकारी असल्यामुळे त्या सर्वांनी असेच सर्व मोठेमोठे युद्धप्रसंग घडविलेले आहेत. याची कायम आठवण येत रहावी. छत्रपतींनी मोरोपंत पेशवे, त्र्यंबकपंत डबीर, नारोबापूजी, बाळाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, केसोनारायण देशपांडे, नारोपंत देशपांडे पंचहजारी सेनापती यांच्यावरून "प्रीतीपात्र" असा उल्लेख करून (सभासद बखर) गौरवलेले आहे. कठीण प्रसंग येता मोरोपंताना कुलमुखत्यार नेमून सर्व राज्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती. संभाजीराजास आग्र्याहून सुटकेच्या वेळी मोरोपंतांच्या मेव्हण्यां मथुरेला साडेसात महिने संभाळण्यास सांगून नंतर रायगडावर त्यांना शिवाजीराजांकडे सोपविले होते.

पुरंदरच्या तहात औरंगजेबास दिलेले सत्तावीस किल्ले, छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यास गेले. त्यानंतर १६७० चे पुढे मोरोपंत पेशवे यांनी ते पुन्हा यथावकाश काबीज करून टाकले. स्वराज्याबद्दल झालेली फार मोठी हानी टळली. राजांना त्यांच्या शौर्याबद्दल कृतकृत्य वाटले.

(६) मोरोपंत पेशवे, शामराज निळकंठ रांझेकर पेशवे, व रामचंद्रपंत अमात्य (बावडेकर) हे देशपांडे घराण्याशी त्यांचा नातेसंबंध आहे. त्याबद्दल मध्ययुगीन चरित्रकोश (पृष्ठ ५२९), पुरंदरे दफ्तर भाग ३, पृष्ठ १३३, ९१ कलमी बखर, छत्रपती शिवराय (उत्तरार्ध) विजय देशमुख पृष्ठ १००९, हुकमतपन्हा, (मलपृष्ठ मध्ये उल्लेख आलेला आहे.) ह्या घराण्याशी समक्ष भेट घेऊनही वंशावळीवगैरे माहिती मिळविलेली असून ती पुस्तकात नमूद केली आहे.

(७) लढायात मृत्यू पावलेल्या देशपांडे घराण्यातील व त्यांचे आप्त व्यक्तिंची यादी जोडली आहे.

(८) मी स्वतः नांदोशी येथील इनाम वतनाची व इतर अप्रकाशित कागदपत्र याबद्दल शोध निबंध बारामती, रत्नागिरी, औरंगाबाद, कन्नड, वगैरे ठिकाणी वाचण्यात आलेले आहेत.

(९) मारूती मंदिर, महादेव मंदिर, ही दोन्ही देवादाय म्हणून असून वडजाई मंदिर देशपांडे कुटुंबाच्या मालकीचे असून त्यावर देशपांडे कुटुंबिय (राजाराम, नारायण वगैरे) व गावकरी म्हणून ऐच्छिक वर्गणी काढून रु. १५ लाख खर्च करून नव्याने बांधलेले आहे. त्याचे सहीशिक्याचे मूळ महजर (निवाडे) पुस्तकात जोडले आहे.

(१०) शिवकालात खेडशिवापूरला छत्रपती शिवाजी महाराजांसाठी कोंडे, देशमुखांनी कसबा खेड येथील जागा खरेदी करून तेथे वाडा बांधला होता. त्या मिळकतीवर भोसले घराण्याची मालकी असल्याबद्दल सांप्रत ग्रामपंचायत रेकॉर्ड वरून आढळून आलेले नाही. शिवगंगेच्या काठी खेड येथे संभापूर गाव वसवले होते. पुण्यास जिजाईंसाठी पाषाण येथे जिजापूर गाव वसाविण्यात आले होते. ह्या सर्व इमारतीही भोसले घराण्याच्या नावे रेकॉर्डवर आढळून येत नाहीत. तसेच बापूजी मुद्‌गल नऱ्हेकर देशपांडे यांचा कसबे खेड येथे वाडा होता. जेथे राजे शिवाजी व जिजाऊ त्यांच्या वाड्यात दि. १-२-१६३७ ते ३१- ५-१६४९ पर्यंत बराच काळ रहात होती असे इतिहासातील प्रत्येक पुस्तकात नमूद आहे. पण

प्रत्यक्षात तसे ग्रामपंचायत रेकॉर्ड पाहाता आढळून आले नाही. भारत इतिहास संशोधक मंडाळातील तज्ज्ञपण त्याबद्दल काही खुलासा करू शकले नाहीत.

(११) शिवाजीचा युद्धखोर (?) असून तो सतत गुंतलेला असा समज सर्वत्र प्रचलित असला तरी त्याच्या आयुष्याचा १/७ भाग युद्धांत गेला व बाकीचा स्वाऱ्यांमध्ये मिळवलेले यश त्याच्या सरदारांनी मिळविलेले ठरते. स्वत: युद्धांत गेला नसताही तसे शिवाजी शत्रूस भासवी. त्यातच त्याच्या बुद्धिची चमक व कार्यकुशलता दिसून येते.

शिवाजी कालपट पाहिल्यास आयुष्याचे अधिक दिवस देशावर गेले. अर्थात कालपटांत पुणे, सुपे, बारा मावळे वगैरे भाग हल्ली जरी देशात मोडतो असे दर्शविले असले तरी त्याकाळी तो भाग कोकणात मोडत असे.

◆ ◆ ◆

आमच्या वतनाच्या गांवाबाबत

नांदोशी या आपल्या गांवात आमचा चौसीपी मोठा वाडा आहे. वाड्या भोवतालची तटबंदी ४ ते ५ फूट जाडीच्या दगडी चिरेबंदी दगडाची असून बाजूला आमच्या बखळी, आड (विहिर) आहेत. वाड्याअंतर्गत मागे पुढे ओसरी, बखळी सारखी मोकळी जागा व अंगण आहे. विहिर (आड) जेथे आहे त्याच्या आंतमध्ये बांधीव बंदिस्त मार्ग आहे. तो आमच्या घरामध्ये असलेल्या तळघरा मध्ये पोचतो तळघरांस चार कवाडे होतो व तेथून चार लोखंडी शिड्यावरून तळघरांत आम्ही जात-येत होतो. तळघरांत गांवातील सारा वसुलीचे धान्य धुन्य ठेवले जात असे. कोपऱ्यांत जुन्या बंदुका, लहान मोठी लढाईची हत्यारे, फारसी व मोठी कागदपत्रे असलेल्या मोठ्या पेट्या होत्या. (कृपया नांदोशी येथील रहात्या घराच्या नकाशा पहा.)

आमचे नांदोशी येथील घर मुसलमानी अमदानीत, शिवकालांत पेशवाईत व ब्रिटिश कालपश्चात असे चार वेळा जळून खाक झाले. सर्व साहित्य व कागदपत्रे जळाली. सुदैवाने ब्रिटिश अमदानीत अशी कागदपत्रे पेशवे दप्तरांत दाखल करून त्याचा नकला सरकारतर्फे करण्यांत येऊन ती मूळ मालकास परत केली गेली व केवळ त्याचमुळे आम्हांला आमचा इतिहास उघडतां आला. कारण सर्व कागदपत्रे

Register of Alienated Village and lands in the Taluka Haveli District Pune

Sr. No.	Name of Village	Name of the Present Alienee	Class of Alienations	Particulars of Sanad						Duration tenure i.e. whether continuable permanently or hereditanily, for more lives than the one or for life only, or for what period
				Number	Date Month & year	Name & Office of the officer signing it	Name of Holder	Name of Taluka & Dist. in which it is entered	Number of form of the Sanad annexed to the register	
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11
	Nandoshi	Patil (Samast)	Class VI Village Servants useful to Government	.....	......	......	.....	.....	.....	Hereditary (und Act, III of 187

Rs. 19/- (Rs. Ninteen only)
as fee (including search fee)
this certified extract

Pune
Date :

Under Section 53 of the Bombay land Revenue Code (Bombay Act V of 1879) as it stood on 1886-87

Particulars of the Villages or Lands Alienated				Land Revenue Government			Total	Land Revenue Alienated	Remarks
Entire Village	If part only of the village the survey number	Area	Survey Assessment	Amount of old judi or salami	Additional Quit rent, if any payable under the Sanad				
					Rate	Amount			
12	13	14	15	16	17	18	19	20	21

A.	G.	Rs.	a.	p.	Rs.	a.	p.	Rs.	a.	p.	Rs.	a.	p.	Rs.	a. p.	Rs.a.p.
20	14	26	0	0	26	0	0		....		....	26	0	0	....	


Rajaram Deshpande

Aditi Plot No.8, Bharatkunj Vasahat No.2,

Erandwana (Ganeshnagar) Pune 38


Ph. No. : 25441178

कोल्हापूर जिल्हा : रामचंद्रपंत अमात्य व त्यांच्या पत्नी जानकीबाई यांची समाधी.... पन्हाळगड येथे, कोल्हापूरपासून १९ किमी अंतरावर



रामचंद्र निळो सोनदेव - अष्टप्रधान मंडळांतील अमात्य, मृत्यू : १३ मार्च १७१६

मौजे नांदोशी ता. हवेली जि. पुणे येथील
श्री. देशपांडे-पाटील (नऱ्हेकर, नांदोशीकर, बल्लाळ, मुद्रल, खेडेबारे
यांची आदिलशाही, निजामशाही व शिवकालीन व शिवकालोत्तर वंशावळ २०१० इ. स. पर्यंत



लढायांत घेतलेला भाग :

१. चिमणाजी व बाळाजी बापूजी - शाईस्तेखानावर हल्ला इ. स. शके चैत्र १५८५ शुभकृतनाम संवत्सर, रविवार, ५ एप्रिल शुद्ध ८ दि. १६६३ (जे.श.)
२. बापूजी मुद्रल नांदोशीकर - सिंहगड जिंकला - रक्तपाताशिवाय १६/०३/१६४८
३. नारो बापूजी - सुरतेवर १ ली चढाई - येताना - १० जानेवारी १६६४ रोजी वडगांव मावळ येथे घोड्यावरून मृत्यू शके १५४८ शुभकृत नाम संवत्सर, पौष वद्य ४, पुरंदर जिंकतांना खेडेबारेचे केजी नारायण (नांदोशीकर) देशपांडे हे शके १५९१ फाल्गुन वद्य १२ मंगळवार म्हणजेच इ. स. १८/३/ १६७० व नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे च्या वणी-दिंडोरीच्या लढाईतहे दि. १७/१०/१६७० रोजी तो मारला गेला. (शके १५९२ साधारण नामसंवत्सर, कार्तिक शु. १४ (जे.श.)अशी नांदोशीतील देशपांडे घराण्यातील तीन माणसे लढाईत मारली गेली आहेत.
४. चिमणाजी सरदार - साष्टी जिंकली - इ. स. १७४२
५. मोरोपंत पेशवे - आग्रा, जव्हार, कोप्पल, दिंडोरी वगैरे १४० लढायांत भाग (नारो बापूजींचे व्याही)

* टीप : इ.स. १६३६ ते १९७५ पर्यन्त ३३५ वर्षे या मुदतीत ३४ व्यक्ति पोलीस व मुलकी पदावर होत्या.

संदर्भ :
पेशवे दप्तर -रूमाल क्र.६
कागद क्र. ५९७/६
इनाम-कमिशन

इनाम वतने :
१. श्रीमंत शिवाजी महाराज इ. क्र. ४०५७६
२. श्रीमंत शाहू महाराज इ. क्र. ८१२२९
३. श्रीमंत राजाराम महाराज इ. क्र. १२२९
४. श्रीमंत पेशवे सरकार इ. क्र. १८५३
५. बादशहा शाहआलम (दुसरा) औरंगाबाद, २९ मुहर्रम २२/४/१७७३

नक्कल फी भरून (इनाम वंशावल हिशेब जमा वसूल वगैरे) मला परत मिळाली. त्याचमुळे इतिहास लेखन करणे मला शक्य झाले.

मुदगल नऱ्हेकर देशपांडे नांदोशी घराण्याची वंशावल इ. स. २०१० पर्यंन्त अद्यावत् करून पुस्तकांत समाविष्ट केली आहे. तसेच खेड शिवापूर येथील वंशावल पण माहितीकरिता जोडली आहे.

पेशवे दप्तर व भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथून आणखी काही माहिती नजरेसमोर आली आहे. ती पण ह्या पुस्तकात दाखल आहे. या पुस्तकांतील मोडी लिखणाचे देवनागरी रुपांतर लेखकाने स्वतः केले असून फारसी लेखांचे पुणे विद्यापीठांतील इतिहासाचे प्रमुख डॉ जी टी कुलकर्णी यांनी विना मोबदला मला करून दिले आहे.

प्रस्तुत पुस्तकांत नऱ्हेकर देशपांडे नांदोशीकर व त्याचे आप्त याविषयी थोडक्यांत माहिती :

(१) बापूजी मुदगल नऱ्हेकर नांदोशीकर देशपांडे :

नांदोशी तालुका हवेली जिल्हा पुणे येथील पाटील व इनामदार देशपांडे घराण्याचे मूळ पुरूष. कसबा पेठ, पुणे येथे असलेल्या "लाल महालांत" छत्रपति शिवाजी महाराज यांचेकडे त्यांचे लहानपणापासून सेवेत होते. अत्यंत शूर व लढवय्ये. त्यांचे पुत्र "चिमणाजी बापूजी" व बाळाजी नऱ्हेकर देशपांडे हे महाराजांच्या सातव्या वर्षापासून बालमित्र होते. महाराजांचे उजवे हात, सरदार, सेनानायक, अनेक मोठमोठ्या लढायांत भाग, पुण्यापासून बारा किलोमीटर (सिंहगड रस्ता मार्ग) अंतरावर नांदोशी येथे मुसलमान व शिवकालाच्याही अगोदरपासून, जवळ जवळ आठशे वर्ष शेती व्यवसाय.

छत्रपति शिवाजीराजे; शाहू महाराज; राजाराम महाराज, पेशवे व बादशाहा शाह आलम (दुसरा) यांनी वंशपरंपरागत पाटिलकी (पोलीस व मुलकी) जहागिरी (सरंजामदारी) इनाम वतने (मोकासा) व बिनीचे सरदार घराणे. नांदोशी येथे चौसीपी सदृश्य वाडा; शेत जमिनी सांप्रत त्यांचे वंशज आजही शेती व्यवसाय करीत आहेत.

मौजे खेड शिवापूर येथे ही रहाते घर नांदोशी व खेड शिवापूर येथे मुजुमदार, खासनीस ठकार (ज्योतिस व कुलकर्णपण) डबीर, सबनीस, फडणीस, या सर्वा

छत्रपति शिवाजी महाराज कालखंडापासून आजपर्यंत ... इ.स. १६३६ ते इ.स. २०१० पोलीस व मुलकी (नऱ्हेकर, नांदोशीकर, मुद्गल, बल्लाळ, खेडेबारेकर) ... यांचा एकूण कालखंड व व्यक्ति ...

अ. क्र.	पाटीलकीचे वतन धारण करणाऱ्याचे नाव	फारसी सन	फसली सन राज्य शक इ.स.	मोकासा नेमणूक सन
१	२	३	४	५
१	बापूजी मुद्गल खेडेबारेकर	सीत सलासैन व अलफ	सु.१०३७ रजब २० इ.स.१६३६	१२८
२	बाळाजी बापूजी खेडेबारेकर	सु।। समान तिसैन अलफ ९० १६००	११०७ फसली इ.स.१६९८	१२८
३	मोरो बल्लाळ खेडेबारेकर	शके ४८, प्लव संवत्सर आषाढ शु.प्रतिपदा, सौम्य वासरे	राज्य शक ४८ सु. ११३१	१२८
४	राघो मोरेश्वर नांदोशीकर-नऱ्हेकर	सु.।। सबा सला-सीन मया व अलफ	इ.स. १७६३ फसली ११६०	१२८
५	महादाजी रघुनाथ	सु.।। तिसा समान मया व अलफ	इ.स.१७६७	१२८
६	बापूजी रघुनाथ	सु.।। इहिदे सबैन मया व अलफ	इ.स. १७७०	१२८
७	म्हादाजी, मोरो बाळाजी, रघुनाथ	जुलुस १४, ता२९ मुहर्रम	इ.स. १७७३ २२ एप्रिल	१२८
८	बापुजी रघुनाथ व खंडो मोरेश्वर	सु.।। तिस सबैन मया व अलफ	इ.स. १७७८	१२८
९	खंडो मोरेश्वर नांदोशीकर व बापूजी रघुनाथ	सु.।। तिस सबैन मया व अलफ	इ.स.१७७९ ते इ.स. १७८१	१२८
१०	खंडो मोरेश्वर नांदोशीकर	सु.।। सलास समा तीन मया व अलफ	इ.स.१७८२ ते इ.स.१८२६	१२८
११	श्रीपत राजाराम नांदोशीकर	सु.।। सीत अशरीन समान मया व अलफ	इ.स.१८२६ ते १८९१	१२८
१२	रामचंद्र श्रीपत, शंकर व मार्तंड रामचंद्र देशपांडे	सु.।। इहिदे तीसेन समान मया व अलफ	इ.स. १८९१ ते इ.स.१९७५	१२८

सूचना :- वर उद्‌धृत केलेल्या कोष्टकांसाठी कृपया वंशावळ पहावी. (मागील बाजूस)

पाटील या पदावर काम करणाऱ्या, मौजे-नांदोशी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे येथील श्री. देशपांडे-पाटील

इनाम (वतन) कोणीदिले	संदर्भ	
६	७	
छ.शिवाजी महाराज	पे.द.३१, ले.१६ शि.प.सां.सं. खंड-३ पृष्ठ ३१, क्र.२४५४	हस्ते महंमदशा महमद अली-कारकून,हवालदार, अंमल दौलत-मंगळ ....
--"--	इ.क.४०५७६	हस्ते शंकराजी नारायण, सचिव यांजकडून अंमलदार किल्ले सिंहगड यांचे शिक्क्यानिशी सनद
छत्रपति शाहू महाराज	इ.क.८१ २२९ आर्- १४३२	हस्ते पंतप्रधान व पंतप्रतिनिधी व त्यांच्या शिक्क्यासह.
पेशवे	इ.क.१४५३	मामलेदार किल्ले सिंहगड
पेशवे	इ.क.१४५३	मामलेदार किल्ले सिंहगड
पेशवे	इ.क. १४५३	मामलेदार सिंहगड
बादशहा शहा आलम (दुसरा)	पेशवे दफ्तर रुमाल क्र.६,६१५ ते ६१८/६	बादशहा शहा आलम (दुसरा), औरंगाबाद
पेशवे	इ.क. १४५३	मामलेदार किल्ले सिंहगड
पेशवे		
पेशवे		खंडो मोरेश्वर हे श्रावण शु।। शके १७४८, दिनांक ४/८/१८२६ रोजी मृत्यु पावले.
इंग्रज सरकार	-	-
महाराष्ट्र सरकार		शंकर रामचंद्र देशपांडे यांचा मृत्यु इ.स. १७-१०-१९४१ मार्तंड रामचंद्र देशपांडे यांचा मृत्यु इ.स. ५-६-१९७५

सह सर्व कारभार चाले. आजही या सर्व व्यक्तिची घरे जागेवर (खेड शिवापूर) दिसत आहेत. (फोटोग्राफ पहा). बंगलोरहून शिवाजीराजे ज्यावेळेस पुण्यास आले तेव्हा त्यांचेबरोबर शामराव निलकंठ रांझेकर (पेशवे), बाळकृष्णपंत हणमंते (मुजुमदार), सोनोपंत विश्वनाथ (डबीर) व रघुनाथ बल्लाळ अत्रे (सबनीस) करून जणू मंत्रिमंडळच सोबत दिले होते.

बापूजी मुदगल नऱ्हेकर देशपांडे नांदोशीकर यांचा परिवार फार मोठा. रघुनाथ नारायण कोरडे यांस बापूजींची लेक दिली होती. सोनाजीपंत डबीर याची लेक बाळाजी बापूजीस दिली. सोनाजीपंत डबीर यांचा मेव्हणा रघुनाथ कोरडे हे कान्हो डबीरांचे जावई. श्यामराजपंत पेशवे मुख्य प्रधान यांचा लेक चंदोपंत त्यास नारो बापूजींची लेक दिल्ही. श्यामरावपंत व मोरोपंत पेशवे हेही आप्तच होते. (पुरंदर दफ्तर भाग ३, मध्ययुगीन चरित्रकोश पृष्ठ ६५९, शककर्ते शिवराय... उत्तरार्ध विजय देशमुख पृष्ठ १००९) श्रीदेव चिंचवडकर यांसी अेक लेक बापोजीपंती दिल्हे. बाबाजी पुंडे याचे लेक नारायण यांसी रघुनाथ नारायण यांची लेक दिली. प्रभाकरभट्ट व नारायणभट्ट हे बापूजीपंताचे व्याही (प्रभाकर भट्ट हे छत्रपति शिवाजी महाराज यांचे कुलगुरू कुलो / पाध्याय). तसेच प्रभाकर भट्टांचे पुत्र बाळभट्ट उपाध्ये हे सुद्धा रायगडावर (१६७४ साली) राज्यभिषेकाच्या प्रसंगी हजर होते. तसेच मोरापंत पेशवे व निलोपंत सोनदेव हे सोयरे सोयरे. मोरोपंत यांची लेक रामचंद्रपंत निळो सोनदेव (अमात्य) यांना दिली. एवढा प्रचंड नातेसंबंध पाहिल्यास व मुद्‌गल नांदोशीकर यांचे युद्ध कौशल्ये पाहिल्यास जणू एकाद्यास असे वाटेल की मुदगल देशपांडे (नांदोशीकर) किंवा खेडे बारेकर यांना अैतिहासिक वाङ्‌मयांत शिवाजीचे प्रीतिपात्र कां म्हटले आहे? स्वराज्यासाठी सर्वजण धारकरी होऊन त्यांनी सदैव लढाई बाणा पत्कारला. छत्रपति शिवरायांसाठी अखेरपर्यंत सेनानायकत्त्व व राजकारण संभाळले म्हणून.

सरदार बाळाजी बापूजी व चिमणाजी बापूजी नऱ्हेकर नांदुसकर यांच्याजवळ कायम पंचहजारी पायदळ व घोडदळ असे. पावसाळ्यांतील दिवस सोडले की नेहमी लढाईत हजर व्हावे लागत होते. त्यामुळे "नांदोशी" व "खेड शिवापूर" येथे मोठ्या प्रमाणावर तबेल्यांची व्यवस्था त्यांचेकडे होती. बाळाजी व चिमणाजी बापूजी यांचे बंधू यांनी सुरतेवर हल्ला (पहिला) म्हणजे मोंगलांवर केलेले उघड

आक्रमणच होते. सुरतेवर हल्ला करून महाराजांनी दिल्लीच्या तख्ताला उघडपणे आव्हानीत केले होते. संभाव्य परिणामांची जाणीव त्यांना नव्हती असे म्हणता येत नाही. पण कुठल्याही परिणामांची तमा न बाळगता "औरंगजेबाची दाढी" हिसकली ह्यावरून महाराजांच्या मनात नेमके काय आहे ह्याविषयी आता संदेह उरला नाही. सुरतलूट ही घटना म्हणूनच महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला नवा आयाम देणारी ठरली.

शके १५८५ च्या माघ वद्य चर्तुर्थीला म्हणजे शुक्रवार दिनांक ५ फेब्रुवारीला, इस १६६४ महाराज राजगडी पोहोचले. सुरतेची लक्ष्मी महाराजांसोबत आली. येताना नाही म्हणाला थोडे गालबोट लागलेच. राजगडी पोहोचण्यापूर्वी महाराजांचा तळ काही काळ लोहगडावर पडला होता. सरनोबत नेताजी पालकर या तळावर होते. **नारोबापूजी, चिमणाजी बापूजी, परसोजी महाडीक, संताजी बोबडे, व सखोभिकाजी हेही लष्करात होते.**

लोहगडावरून मराठी लष्कर लूटीसह राजगडाकडे जायला निघाले. लोहगड ओलांडून ते वडगाव जवळ आले. तेथे एका वडाखाली मोगली सरदार मुकुंदसिंग राजपूत याने मराठ्यांना गाठले. **चिमणाजी, परसोजी, संतांजी** हे नेताजीसह लूट घेऊन त्वरेने पुढे सरकले. मुकुंदसिंगाला नारोबापूजीने रोखून ठेवले. लूट सुखरूप पुढे गेली. पण मागे झालेल्या धुमश्चक्रीत नारो बापूजी बाण लागून ठार झाला. विशेष म्हणजे लोहगडच्या मुक्कामातच नारो बापुजीचा राहुजी पतकींच्या मुलीशी वाङ्‌निश्चय झाला होता व राजगडावरून परतल्यानंतर लग्न करायचे ठरले होते. नारो बापुजीच्या मृत्युवार्तेने महाराजांचा आनंद क्षणार्धात करपला. महाराज तेव्हा दरबारात बोलले की नारो बापूजीने मुकंदासिंग या मोंगल सरदारास तोंड दिले नसते तर सूरतेची लूट रायगडावर पोहोचली नसती. व राज्याभिषेकसुद्धा होऊ शकला नसता. पण हा आघात् पुढील आघातांची जणू नांदीच होता.

(पुरंदरदफ्तर ३. पृ. १३८); गोपाळ चांदोरकर व ॲड. रविंद्र यादव वडगाव-मावळ यांच्या मदतीने नारो बापूजींच्या समाधीचा शोध लागला.(सं.)

महाराज राजगडी पोहोचतात न पोहोचतात तोच विजेचा लोळ कोसळावा तशी कर्नाटकातून वार्ता येऊन थडकली, 'माघ शुद्ध पंचमीस (शनिवार दि. २३ जाने. १६६४) शहाजी राजे समाप्त झाले. (जेधे शका.)

सुरतेची लढाई (पहिली) उरकून घोड्यावरून परतत असतांना नारो बापूजी देशपांडे चिमणाजीसह व इतर दोन जुमल्यांसह येत होते. पुण्याहून अेकतीस किलोमीटर अंतरावर असलेल्या वडगावं (मावळ) गावठाणांत वडाच्या झाडाखाली तीर थनसरीस लागून घोड्यावरून खाली कोसळले. दि. १०।१।१६६४ सिंहगड जिंकताना तानाजी मालुसरे यांनी जे शौर्य दाखविले त्यावर नारो बापूजी देशपांडे त्यावर कडी केली. माय मरो पण लाखोंचा पोशिंदा न मरो या न्यायाने स्वतःच्या लग्नाचा विषय बाजूला टाकला. स्वतःच्या प्राणांचीही पर्वा केली नाही.

वडगाव त्यांची दगडी बांधकामांतील पक्की समाधि आहे अनेक वर्षे झाल्यामुळे सध्या त्याची दुरवस्था झाली आहे. (सोबत नकाशा पाहा.) नांदोशीकर देशपांडे यांच्या घराण्याचा वंशवेल पुस्तकांत दाखविला आहे दुसरी वंशावळ खेड शिवापूर येथील असून तो इनाम संदर्भात आहे. त्याचीही प्रत जोडली आहे.

(२) चिमणाजी बापूजी व बाळाजी बापूजी न्हेकर देशपांडे नारो : नारो बापूजींचे चिरंजीव

शिवाजी महाराजाचे समवयस्क व बालमित्र, वंशपरांगत पोलीस व मुलकी पाटीलकी. छत्रपति शिवाजी राजे, शाहू महाराज, राजाराम महाराज व बादशहा शहा आलम (दुसरा) यांच्याकडून जमिनी व देवस्थान इनामे. पाटील (मोकादमी) जहागिरी व सरदारकी दिली. सरदार व सेनानायक. पायदळ व घोडदळाचे पंचहजारी मसबदार हवालदार, अत्यंत शूर व लढवय्ये. शिवाजी महाराजांचे प्रतिपात्र व विश्वासू अनेक लढायांत भाग.

(अ) **सिंहगड काबीज-** शके १५६९ इ.स. १४ मार्च १६४८
रक्तपाताशिवाय बापूजीपंत मुदगल नांदोशीकर यांनी गड काबीज केला.

(ब) **लाल महालंत शायिस्तेखानावर हल्ला** (शके १५८५ इ.स. १६६३) व त्यांत शायिस्तेखानावर छापा घालण्यांत बिनीचे सरदार म्हणून शिवाजी राजांसमवेत हल्ल्यात सामील.

(क) **साष्टीचा वेढा-** शके १६६४, इ.स. १७४२ चिमणाजी बापूजी या सरदाराने काबीज केला.

(३) केसो नारायण नऱ्हेकर देशपांडे, नांदोशीकर

शूर व लढवय्या शके १५९१ इ. स. १६७० पुरंदर किल्ला जिंकताना मृत्यू.

(४) मोरोपंत त्र्यंबक (त्रिमल) पिंगळे-पेशवे-मुख्यप्रधान

(१)	२६ जा वारी १६५६	जावळीच्या चंद्रराव मोरे यांचे विरुद्ध लढाई चांभारगड, सोनगड, चंद्रगड, कांगोरी, मकरंद गड जिंकले (जेश २९८)
(२)	३० एप्रिल १६५७	अहमदनगर, जुन्नर, परिंडा, या प्रांतातील ५१ गावे काबीज (सभासद बखर, पृष्ठ २१)
(३)	२४ ऑक्टोबर १६५७	कल्याण, भिवंडी, चांदवड, दण्डा राजपुरी, उझार्डे, चंदन, लोहगड, तुंग, तिकोना, विसापुर राजमाची, प्रबळगड, सरसगड वगैरे ४० किल्ल्यांची मोहीम दि. ८-१-१९५८ माहुली जिंकली (बमोपु - पृष्ठ २४७) चौल, तळे, धोसाळे, खारे पाटणजवळचा विजयदुर्ग जिंकला (जेश २९९, पसास ७२०, ७११)
(४)	२८ नोव्हेंबर १६५९	पन्हाळ्यावर हल्ला नेजाती पालकर व मोरोपंत यांनी चंदन वंदन, दाभोळ, वाई, खटाव, मायणी, वाळवा, आष्टी, कऱ्हाड, पन्हाळा, आडगाव, वेळापूर, औदुंबर, मसून (बमोपु ३३०) घेतले (जेश ३०९)
(५)	२६ एप्रिल १६६१	जावळीचे व शृंगारपूरचे राज्य काबीज (जेश-३०३).
(६)	३ ऑगस्ट १६६१	तळकोकणची मोहीम कुडाळ, वेंगुर्ला, बांदा, महाड काबीज (जेश २२१)

(७)	५ एप्रिल १६६३	शाहिस्तेखानावर लालमहलांत हल्ला. नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे यांनी नेतृत्व केले. (जेश ३०३)
(८)	३० मार्च १६६५	प्रतापगडावर चढाई अफजलखानाचा बंदोबस्त. पारघाटावर पायदळाच्या साह्याने मोठा हल्ला. (बमोपु पृष्ठ ३०३ ते ३०४)
(९)	१२ जून १६६५	आग्र्यावर २३ किल्ले मोंगलास दिलेले १६७० नंतर परत जिंकून घेतले.
(१०)	१६ फेब्रुवारी १६६७	बसनूर काबीज
(११)	४ ऑक्टोबर १६७०	सुरतेवर हल्ला (पहिला) नेताजी व मोरोपंतावर जबाबदारी करोडो रूपयांची लूट व जडजवाहीर सरकारी खजिन्यात जमा. माहुली, कर्नाळा, कोंढाणा, पुरंदर, दिंडोरी, कल्याण, लोहगड, हिंदोळा, रोहिडा हे गड ताब्यात (११/१६७०) कारंजा, त्र्यंबकगड, कुंजरगड, काबीज (जेश ३०६)
(१२)	नोव्हेंबर १६७०	अहिवंत, खळा, जावडा, मार्कंडा, साल्हेर, मुल्हेर जिंकले (जेश ३०६)
(१३)	५ जून १६७२	रामनगर, जवाहर, कोळवण, मालगुंड, लक्ष्मेश्वर, गदग, (जेश ३०७) ३०/७/१६७२ नाशिक (पसास १४८४), कल्याण १३/०७/१६७२ (पसासं १४५३)
(१४)	८ ते २५ मे १६७५	फोंडा, अकोले, कडबादी, शिवेश्वर, काद्रा, कारवार जिंकला (जेश ३०९)
(१५)	३ मार्च १६७९	कोप्पल घेमले खांदेरी, उंदेरी, दमण, चढाई (जेश ३१२)

येणे प्रमाणे मोरोपंत पेशवे यांनी १४० पेक्षा जास्त लढ्यांत भाग घेतल्यांची नोंद आहे.

संक्षेपाने त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास,

शिवाजीचा मदतगार, मुख्य प्रधान. सुरुवातीस शहाजीकडे व नंतर शिवाजीकडे (१६५३). प्रथम पुरंदरचा कारभारी. पुढे त्याने प्रतापगड बांधला. अफझलखानाच्या स्वारीच्या वेळी त्यांनी पार येथील सैन्य पराभूत केले. तसेच नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे हे पंचहजारी सेनापती लढ्यांत होते. सिद्दी जोहरच्या स्वारीच्या वेळी मुलखाचे संरक्षण केले.

आग्र्यास शिवाजी गेला तेव्हा मिर्झावर कारभार सोपविला होता. त्यांत हा मुख्य होता. राज्याची कुलमुखत्यारी त्यांचेकडे सोपविली होती. शिवाजीस पकडले असे कळतांच इकडे याने मोहीम सुरू करून पुरंदरच्या तहांत गेलेले किल्ले काबीज करून वचपा काढला. (१६७० नंतर) व खानदेश जिंकला. शिवाजीच्या मृत्यूनंतर हा सोयराबाईंच्या पक्षास मिळाला म्हणून संभाजीने त्यांना कैद करून पण लगेच बंधमुक्तही केले व पेशवाईवर कायम केले. पण शिवाजीच्या मृत्यूनंतर सहा महिन्याच्या आंतच तो मेला.

श्यामराज निळकंठ रांझेकर व मोरापंत हे एकमेकांचे आप्त होते. यांनी मराठी राज्याची पहिली जमीनधारा पद्धत अंमलांत आणली. कायदे यानेच तयार केले. त्यांचा शिक्का 'श्रीशिवचरणी' "तत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर" व "श्रीशिव राजेंद्र हर्षनिधान त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान" व "श्रीशिवराजेंद्र मुख्यायात्मस्य सत्यधक। मुद्रा मोरेश्वरस्यास्तां रुद्रागदायिनी (भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश, सि. चित्राव, पृष्ठ ५२३)

३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे मृत्यु. तेथे त्यांचे स्मारक बांधले आहे. त्यांच्या मुलास पेशवे पद मिळाले. त्यापुढे वंशावळ व इतर माहिती दिली आहे.

नऱ्हेकर नांदोशीकर देशपांडे घराण्यांतील व त्यांच्या जवळचे आप्त यांच्या समाध्या सोबत पुस्तकांत दर्शविल्या आहेतः-

(अ) नारो बापूजी देशपांडे पुण्यापासून ३१ किलोमीटर अंतरावर वडगाव मावळ गांवठाण (मुंबई पुणे रस्त्यावर ग्रा.पं. वडगाव-मावळ यांच्या हद्दीत व ग्रामपंचायत मालकीची)

(ब) त्र्यंबकपंत डबीर यांची खेड शिवापूर तालुका हवेली जिल्हा पुणे पुण्यापासून २२ किमी अंतरावर.

(क) रामचंद्रपंत निळो सोनदेव (अमात्य) यांची समाधि पन्हाळा येथे जिल्हा कोल्हापूर. तसेच त्यांच्या पत्नी जानकीबाई यांचीही समाधी पन्हाळ्यावरच आहे. मुत्यु इ.स. १७२३.

(ड) चिमणाजी बापूजी नऱ्हेकर नांदुसकर देशपांडे नांदोशी ता. हवेली. जिल्हा पुणे. पुण्यापासून १२ किमी अंतरावर महादेव मंदिराच्या आवारामध्ये

(इ) शके १५९१, फल्गुन वद्य १२ मंगळवार दि. ८।३।१६७० (जेश) केसो नारायण देशपांडे (संभाव्य) पुरंदर किल्ला तालुका पुरंदर जिल्हा पुणे

(क) मोरोपंत त्र्यंबक पिंगळे पेशवे, रायगड येथे (मृत्यू एप्रिल १६८०) मृत्यू रायगडावर स्मारक

(ग) सोनोपंत डबीर २५।१।१६६५ रोजी राजगडावर वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यू (शके १५८६ क्रोधी नाम संवत्सर, माघ वद्य ५, बुधवार)


(ह) नारायण नांदोशीकर देशपांडे वर्णा दिंडोरीच्या लढाईत मृत्यु शके १५९२ कार्तिक शुद्ध १४ साधारण संवत्सर (जेश) दि. १७।१०।१६७०.

(४) मोरापंत पेशवे यांची वंशावळ व इतर माहिती

मोरश्वर त्र्यंबक पेशवे (पिंगळे) दे.ऋ.ब्रा. गोत्र - हरितस्

छत्रपत शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळांतील मुख्य प्रधान पेशवा श्री. मोरेश्वर त्र्यंबक पिंगळे यांची वंशावळ :

श्री. मोरोपंत उर्फ मोरेश्वर यांना कागदोपत्री सामराज त्रिमलाचार्य पिंगळे असेही उल्लेखिले जाते. (पुरंदरे दप्तर भाग ३, पृष्ठ १३३)


त्रिमलाचार्य
मोरोपंत
(मृ. १०/१६८० राजगड)
केसोपंत
१६९०
निळकंठ
(मृ. १७०९)
बहिरोपंत
(१७०८-१७१३)
येसाजीपंत
भगवंतराव
भुवनराव
आप्पाजीराव
गोविंदराव
नारायणराव
नारोपंत
बहिरोपंत (मृ.१८५६)
धोंडोपंत
महादेवराव
दत्तो
आनंद
मोरो
कृष्णराव
रघुनाथराव → नारायणराव
पांडुरंग
माधव
त्र्यंबक
रामचंद्र
विष्णुपंत
गोपाळराव
हरिपंत
रघुनाथ
गोविंदराव
सदाशिव
मुरलीधर
रघुनाथ
शांताराम
मुरलीधर
(द)
(व)
यशवंत
चिंतामण
श्रीराम
वसंत
विष्णु
शरद
गणेश (द)
अनंत
मोहन
जयंत
अरूण
दत्तात्रय
दिगंबर
गंगाधर
नारायण
प्रभाकर
आनंद
बिंदुमाधव
संजीव
सुनील
श्रीधर
महेंद्र
अनिल
निखिल
गौरव
अमित
सचिन
शुभम्
अथर्व
हर्षवर्धन

श्री. त्रिमल आचार्य हे विजापूर व गोवळकोंडा प्रशासनांत शहाजीच्या जहागिरीत होते.

श्री. श्यामराज निळकंठ रांझेकर इ. स. १६५६ ते १६५९ पर्यंत पेशवेपदावर होते. श्यामराव व मोरोपंत पेशवे यांचा नातेसंबंध असल्याबद्दल सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी त्यांच्या मध्य-चरित्रकोश पृ.६९५वर म्हटले आहे. श्री. नरहरि आनंदराव इ.स. १६६१ ऑगस्ट ते एप्रिल १६६२ पर्यंत पेशवे पदावर होते.

मोरोपंत त्र्यंबक उर्फ सामराज त्रिमलाचार्य पिंगळे - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान-पेशवा (पेश्वा) होते. त्यांचा कार्यकाल ३/४/१६६२ ते १६८२ पर्यंत कृष्णाजी अनंत सभासद हा पिंगळे यांच्या हाताखाली उपमंत्री राजाराम महाराजांच्या हाताखाली) होता.

श्री. निळकंठ मोरेश्वर पिंगळे - इ.स. १६८२ ते इ.स.१७०८ पर्यंत पेशवेपद.

श्री. बहिरोपंत मोरेश्वर पिंगळे - इ.स. १७०८ ते इ.स. १७१३ पयंत पेशवेपद.

त्यानंतर पेशवाई भट घराण्यात कायमची गेली. बाळाजी विश्वनाथ भट यांना इ.स. १७१३ च्या सुमारास पेशवाई दिली.

(सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचा मध्ययुगीन चरित्रकोश पृष्ठ ५२३ व ६५९. श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर पृष्ठ ३० (वि. स. वाकसकर) म. इ. सा. खं. ८.६८ खं १५.८२, ३४७ चै. ४ अंक १.४ पृष्ठ १५ इ.वृश १८३४ पृष्ठ २१५ ग्रॅन्ट डर्फ यांचा मराठ्यांचा इतिहास यामध्ये सामराज त्रिमलाचार्य पिंगळे असा उल्लेख आहे.

सर्वदर्शी प्रधानस्तु राज्य चिंता कारभार समून्याहन : सर्व दृष्टिने राज्याची चिंता, योग्य कारभाराची व्यवस्था, चोख राखणारा व बखरीतील एक सर्वोकृष्ट व्यक्तिरेखा. मोरोपंत पेशवे हे देशस्थ ऋग्वेदी, गोत्र -हरितस् प्रथमपासून शिवाजीचा साह्यकारी, गड-किल्ले बांधण्यात प्रवीण, प्रतापगड देवीचे व्यवस्थापक. वार्षिक पगार पंधरा हजार होन, किंवा रुपये, ७ लाख रुपये फौजेचे नेतृत्व, एकशेचाळीसपेक्षा जास्त (शिवकालीन महाराष्ट्र; अराकुलकर्णी, पृष्ठ १५२) लढायांत भाग घेऊन स्वराज्याची सेवा केली. पेशव्यांच्या मुलास **नारो बापूजी मुद्गल नांदोशीकर देशपांडे** यांची मुलगी दिली होती. (पुरंदर, भाग ३, पृष्ठ १३३, शके. शिवराय

उत्तरार्ध विजय देशमुख, पृष्ठ १००९) तसेच मोरोपंत पेशवे यांची लेक जानकीबाई निळोपंत सोनदेव (भादाणेकर-बहुतकर किंवा भिवंडीकर) मुजूमदार यांचा मुलगा रामचंद्रपंत अमात्यपद देऊन अष्टप्रधान मंडळांत नेमणूक केली. (करवीर रियासत; स.मा.गर्गे पृष्ठ ९६) केशव त्रिमल पिंगळे सुद्धा रामचंद्रपंतांच्या पत्नीकडून जवळचे नातेवाईक होते म्हणजे त्यांना (हुकूमतपन्हा मु. गो. गुळवणी, पृष्ठ ७२) रामचंद्रपंतांची एक कन्या दिली. निळो मोरेश्वर पिंगळे हे पंतांचे मेव्हणे व नंतर व्याही झाले त्यांची कन्या व्यंकूबाई यांचा विवाह भगवंतराव अमात्य यांचेशी झाला.

ज्यावेळेस आग्र्याहून छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे सुटले. त्यावेळेस त्यांना रायगडावर पोहोचेपर्यंत अनंत अडचणी होत्या. एकतर आग्रा ते रायगड हा दूरचा प्रवास व दुसरे म्हणजे औरंगजेबाने त्यांना पुन्हा पकडण्याची, शोध घेण्यास तांतडीची व्यवस्था केली होती. म्हणून शिवाजी राजांनी फक्त एकट्याने रायगडावर जावे व संभाजी राजांना दुसरीकडे ठेवावे असे ठरविले. मोरापंत पेशवे यांचे मेव्हणे काशीराव मथुरेस राहत होते. काशीराव, कृष्णाजीपंत व विसाजीपंत हे तिघे सख्खे बंधु मथुरेस राहत होते. त्यांच्यावरच संभाजीस मथुरेस संभाळण्याची जबाबदारी सोपविली होती. त्यांच्यावरच संभाजीस मथुरेस राजास मुलाप्रमाणे संभाळून नंतर रायगडावर काशी त्रिमल व त्यांच्या मातुःश्रीनी सुखरूपपणे पोहोचविले. त्याबद्दल शिवाजी राजांनी पन्नास हजार रूपयांचे बक्षिस त्यांना देऊन गौरविले. दानपत्र, इनाम दिले. ते पुढीलप्रमाणे -

(मराठ्यांच्या इतिहासाची साधने, वि. का. राजवाडे, खंड ८, लेखांक २३, पान १९, पुरालेखागार, कोल्हापूर, छ. संभाजी - डॉ. सदाशिव शिवदे) लेखांक (२३); १६७१/७२

वर्क सनद रक्षरवाना ... राजश्री शिवाजी राजेसाहेब दामदौलतहू सुहूरसन इसन्ने सबैन व अलफसाहेब आग्र्याहून निघाले. याउपरि चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांस राजश्री कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळी केले. मा नइले चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. मा नईलेची मातुश्री आईजी + बंधिली, मा काशी बकसीस द्यावयाचा तह केला. रूपये ५०,०००/- मातुःश्री आईजी २५,०००/- येणेप्रमाणे पाववीत पाठवावे.

मोर्तब सूद

(५) रामचंद्रपंत निळोपंत भादाणेकर (बहुतकर, भिवंडीकर) उर्फ रामचंद्रपंत अमात्य

छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात निष्ठेने साथ देणारे निळो सोनदेव, डबीर यांचे पुत्र रामचंद्र निळकंठ डबीर आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीस सिंधुदुर्गाच्या वतनी सबनिशीवर होते. मोरोपंत त्र्यंबक पिंगळे (पेशवे) यांचे जावई असलेले रामचंद्रपंत निळो सोनदेवच्या मृत्युनंतर मुजुमदार पदावर काम पाहू लागले. राज्याभिषेकासमयी त्यांची अमात्य पदावर शिवरायांनी नेमणूक केली. त्यांना वार्षिक वेतन १२००० होन (रुपये ५.५ लाख) होते.

राज्याचा जमाखर्च पहाणे, मुलकी, अधिकाराच्या कामकाजावर देखरेख ठेवणे आणि गरज पडल्यास युद्धावर जाणे अशी कामे अमात्यपदावर राहून करत असताना त्यांना राजव्यवस्थेचा बहुमोल अनुभव प्राप्त झाला.

छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाविरूद्ध चाललेला मराठ्यांचा संग्राम, छत्रपती संभाजी महाराजांची क्रूर हत्या आणि रायगडावरून राजाराम महाराजांचे जिंजीकडे प्रयाण या घटनांनी वेगळ्या वळणावर आला. एका छत्रपतींची हत्या, दुसरे दूर दक्षिणेत, तर स्वराज्याचे भावी वारस मोगलांच्या कैदेत अशा अतिशय कठीण परिस्थितीत मराठ्यांना पुन्हा जोमाने युद्धास तयार करण्याचे काम रामचंद्रपंतांनी

शंकराजी नारायण, परशुराम त्र्यंबक, धनाजी जाधव व संभाजी घोरपडे यांचे साह्याने केले. महाराष्ट्रातील लढा जिद्दीने चालू ठेवून राज्यव्यवस्था संभाळणाऱ्या रामचंद्रपंतांना छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीहून हुकूमतपन्हा (मु.गो. गुळवणी, सेतू माधवराव पगडी) म्हणजे ज्यांचे हुकूम सर्वांनी पाळावेत, हे पद दिले. महाराणी ताराबाईंनी स्थापन केलेली कोल्हापूर गादी व छत्रपती शाहू महाराजांची सातारा गावी अशा दोन मराठा राजसत्ता अस्तित्त्वांत आल्या. रामचंद्रपंत अखेरपर्यंत संभाजी राजांच्या (राणी राजसबाईंचे पुत्र) पदरी राहिले.

रामचंद्रपंतांचा जन्म इ.स. १६५० व मृत्यू १७२३ (अं) देशस्थ)ऋग्वेदी, गोत्र - भारद्वाज, सूत्र आश्वलायन, पन्हाळ्यावर त्यांची समाधी असून, ती मुद्रांकित आहे. रामचंद्रपंतांच्या समाधी शेजारीच त्यांची पत्नी जानकीबाई यांची पण समाधी पन्हाळ्यावर आहे.

मुद्रा ...

श्री. राम जगद्वंदित संदेशा देशानंद विधायिनी ।
नीळकंठ जनेर्मुद्रा रामचंद्रस्य राजते ।।
ज्यादित्य सदारामा ब्रह्मानंदन विधायनी ।
नीळकंठ सुते मुर्द्रा रामचंद्रस्य राज्यते ।।

... औरंगजेबाने ज्याप्रमाणे मातब्बर लोकांस वतने देऊन वळवून घेतले तेच प्रकार राजारामांनाही अवलंबावा लागला ज्यामुळे औरंगजेबाशी लढणे सोपे गेले. (सेतू माधवराव पगडी) शिवाजी महाराजांच्या वेळेस सैन्यास रोख पगार मिळत होता परंतु पैशाअभावी ह्यावेळेस वतनाची लालूच दाखवून २१ वर्षे स्वातंत्र्याचा लढा लढावा लागला. रामचंद्रपंत पांच छत्रपतींचे अमात्य होते. मुत्सद्देगिरी राजनिष्ठा आणि प्रसंगी तलवार चालवूनही स्वराज्यास सुरक्षित राखण्याचा प्रयत्न केला. मृत्यू १७/२ ते १३/१७९६ पोर्तुगीज इदप्तर खंड ३, पृष्ठ १३ झाला.) मृत्यूपूर्वी त्यांनी आज्ञापत्र हा ग्रंथ लिहीला. ज्यांत राज्यनीतीशास्त्र व राज्यव्यवहाराची सूत्रे सांगणारा मराठी भाषेतील पहिलाच व एकमेव ग्रंथ आहे.

मोरोपंत त्र्यंबक उर्फ सामराज त्रिमलाचार्य पिंगळे - पेशवे यांची जानकीबाई नावाची कन्या रामचंद्रपंतांना दिली होती. मोरोपंत हे पंतांचे सासरे. निळो मोरेश्वर

पिंगळे हे पंतांचे मेव्हणे व नंतर व्याही झाले. त्यांची कन्या व्यंकूबाई यांचा विवाह भगवंतराव अमात्य यांचेशी झाला. पंतांची एक कन्या दिली होती.

अमात्यांनी पन्हाळा येथे मंदिरे बांधली असून ती पहाण्यासारखी असून समर्थ रामदासस्वामी यांनी प्रसादार्थ दिलेल्या मूर्ती असून रामचंद्रपंतांचे नित्य पूजेतील ११ सुवर्णमूर्तींचे पंचायतन पण आहे. समाधी बरोबरच त्यांच्या वापरांतील विविध मुद्राही दिसून येतात.

निळोपंत सोनदेव बहुतकर यांचे मातुल कसबे खेडेबारेचे जोशी–ठकार. निळोपंतांचे बालपण मामाचे घरी गेले. शिवबा खेडेबाऱ्यांत लहानाचे मोठे होत असल्यामुळे व ते भोसल्यांचे कुलोपाध्याय. त्यामुळे शिवबा निळोपंतांस बाळपणापासून ओळखीत. (शि.च.सा. खंड ७, पृष्ठ ७, कृ. वा. पुरंदरे)

पंत अमात्य यांचा वंशवेल पुढीलप्रमाणे :

मूळ पुरुष (भादाणेकर) नाव उपलब्ध नाही.

बाळोपंत — नारोपंत (भादाणे, कुस गावचे वतनी कुलकर्णी, कल्याण)

बाळोपंत
|
सोनाजी
|
मुरारराव (निळोपंतांची घरची १४ माणसे ठार केली.)

नारोपंत (भादाणे, कुस गावचे वतनी कुलकर्णी, कल्याण)
|
निळोपंत (बेदरास खयालनीस)
|
कृष्णराव (मुरारराव हल्ल्यात वाचला)
|
नारोपंत (मालोजी भोसले यांचे आश्रयास)
(१५०० - १६००)
|
सोनोपंत (शहाजी राजांचे आश्रयास, शिवजन्माचे वेळी शिवनेरीस)
|
निळोपंत (शिवाजीचे डबीर)
(मुजुमदार : १६४५ - १६७२)

नारोपंत — रामचंद्रपंत (अमात्य) (१६५० - १७१६) हुकूमतपन्हा

भगवंतराव — शिवराम — मोरेश्वर

भगवंतराव १७१६-१७५०

कृष्णराव (१७५०-१७६१)- सुब्बाराव (द) (१७६१-१८१०)

रामचंद्र (द) (१८११-१८१३) — मोरेश्वर (द) (१८१३-१८२६)

गोविंदराव — शंकरराव

→ (१८२६-१८३४)

रघुनाथराव (द) (१८३५-१८४५) →रामराव (द) (१८४७-१८४०) →मोरेश्वरराव (द) (१८५०-१८६७) → माधवराव उर्फ बाळासाहेब (१८६८-१९२९)

परशुराम उर्फ भाऊसाहेब(१९९७-१९४२)
↓
रामचंद्र उर्फ भैय्यासाहेब(द) (विद्यमान : जन्म १९३३) → माधवराव जन्म (१९६२) → दैवव्रत (जन्म : १८/२/९०)
↓
निळकंठराव जन्म १९६८

रामचंद्रपंतासारखा धुरंधर माणूस मराठेशाहीतून फोडण्याचे कपटकृत्य औरंगजेबाने करून पाहिले होते. पण त्यात त्याला यश आले नाही. औरंगजेबाने परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि रामचंद्रपंत अमात्य या दोघांना जवळजवळ एकाच आशयाची पत्रे लिहून एकाचे पत्र दुसऱ्याचे हाती पडेल अशी युक्ती केली होती. हेतू असा की, त्या दोघांनी एकमेकांकडे संशयाने पहावे आणि ताराबाईंच्या मनात त्यांच्या स्वामिनिष्ठेबद्दल संशय निर्माण व्हावा. औरंगजेबाने पत्रात लिहिले होते. (करवीर रियासत, स. मा. गर्गे, पृष्ठ १०९)

रामचंद्रपंतास औरंगजेब बादशहाने पाठविलेले फर्मान

रामचंद्र याने जाणावे की, सुदैवाने दूरवर विचार करून तुम्ही शुभमुहूर्तावर तरबियतखानास पत्र लिहीले ते आम्ही वाचले. त्यातील सर्व प्रकार आम्हास कबूल आहे. त्यावरून आम्ही असे फर्मावितो की, भरवंशाचा व निष्ठेचा जो सन्मार्ग धरिला आहे तो कायम ठेवावा. लिहील्याप्रमाणे सर्व गोष्टी त्वरेने करून दाखवा आणि त्या दुष्टाचा (राजारामाचा) आश्रय सोडून द्या. त्या दुष्टाच्या नश्वर आयुष्याचे जर अजून काही क्षण बाकी असून आमच्या फौजेस भिऊन पळून जाण्याची त्यास इच्छा होईल, तर तुम्हीच सर्व किल्ले आमच्या हवाली करावे हे योग्य आहे. परमेश्वराने तुम्हांस सुबुद्धि देऊन दोनही गोष्टी केल्या म्हणजे तुमचा उत्कृष्ट सन्मान करून तुम्हांस उत्तमोत्तम बक्षिसे व मन्सब देऊ; परंतु दुदैवाने आपले नफानुकसान काय ? हे जर तुम्हांस कळले नाही आणि तुमचे पत्रातील शब्द सर्व फोल असतील तर मग तुम्ही व तुमचा राजा यांस काय दिसायचे ते दिसेल. मुलामाणसांसुद्धा तुमची सर्वांची डोकी कापली जातील. (मराठी रियासत, खंड - २ गोविंद सखाराम सरदेसाई, उग्र प्रकृती संभाजी व स्थिरबुद्धी राजाराम, पृष्ठ २६४)

खुलासा : वर दिलेल्या फारसी मजकुरांत रामचंद्र अमात्यांचा उल्लेख नाही. तसेच ते "फर्मान" नाही कारण त्यांत फर्मानाची कुठलीही लक्षणे उदा. तुगरा, मोहर चा आढळत नाही. शेवटच्या ओळीत "लिहाजा" अक्षराने संपली असल्याने मजकूर अपूर्ण आहे व तो स. मा. गर्गे यांची "करवीर रियासत" पृष्ठ १०९ पर्यंत मराठी आशयाची जुळत नाही.

औरंगजेबाच्या आमिषाला किंवा धमकीला रामचंद्रपंतासारखी स्वामीनिष्ठ आणि स्वराज्यनिष्ठ व्यक्ती बळी पडणे शक्य नव्हते, पण या पत्रामुळे ताराबाईंच्या मनात

रामचंद्रपंतांविषयी काही काळ गैरसमज निर्माण झाला. पण पंतांनी त्या प्रसंगीही अत्यंत धीमेपणाने राज्यसूत्रे चालवून पुन्हा विश्वास संपादन केला.

(६) श्री. रघुनाथ बल्लाळ कोरडे :

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-अगस्ती, मूळ ठिकाण मोंगलाईतील वैजापूर परगण्यांतील नेऊरगाव; शहाजी व शिवाजीच्या पदरी वकिली व राजकारण करणारे कुटुंब, नेऊरगावचे वतनदार कुलकर्णी त्यांचा पुरुष दातारपंत उर्फ बल्लाळ. जन्म शके १४५५ त्यांचे पुत्र येसाजीपंत (जन्म शके १५८०) येसाजीपंतांचे बंधु रघुनाथपंत. त्यांना आण्णाजीपंत व गबाजीपंत हे पुत्र. अहमदनगर जिल्ह्यांत नेवासा जवळील श्रीक्षेत्र प्रवर संगम येथे शके १५२४ मध्ये गंगास्नानास गेले असता, तेथे त्यांना तेथील जोशी यांनी तीर्थोपाध्येपण दिले. व त्यांचे वहीवर तसा लेख लिहून दिला. त्यांचे कुलोपाध्याय संगमनेर परगण्यांतील मुद्‌गलगोत्री नांदुरकर हे होत.

गबाजीपंतांचा वंश कर्नाटकांत आहे. येसाजींना मल्हारपंत व अंताजीपंत असे दोघे पुत्र होते. पैकी अंताजीपंतांचा पुत्र श्यामजीपंत त्यांना दोन पुत्र. एक सखोपंत व दुसरे नरसिंहपंत. ह्या उभयतांस पुत्रापत्य नाही. ह्यांच्या स्त्रिया शक १६७७ मध्ये हयात होत्या. रघुनाथपंत व येसाजीपंत हे आपल्या दोन पुत्रांसह महाराष्ट्रांत आले आणि ते निजामशाही धर्माचा नवा अवतार म्हणून संबोधलेले सरदार शहाजीराजे यांच्या पदरी नोकरीस राहिले. पुढे शहाजी राजांसमवेत हे आदिलशाहीत म्हणजे तंजावर प्रांती गेले आणि शहाजीराजे यांना शिवाजीराजे यांस जेव्हा महाराष्ट्रात दुसऱ्यांदा पाठविले त्याबरोबरच्या कारकून मंडळीत मल्हारपंत कोरडे यांसही पाठविले. ह्या मल्हारपंत यांना शक १५६० चे सुमारास पुत्र झाला. त्याचे नाव त्यांनी आपल्या वडिलांचे म्हणजे येसाजी हेच ठेविले. येसाजी मल्हारांनी लहानपणापासून शिवाजीराजे यांच्या पदरी राहून बऱ्याच कामगिऱ्या बजाविल्या आहेत. त्यांची चाकरी प्रथम सुरनिशीकडे होती. नंतर त्यांची हुशारी पाहुन शक १५९० मध्ये शिवाजी राजांनी औरंगाबादेस शाहाजाद्याकडे, जिराजी रावजी व प्रतापराव आनंदराव यांना पाठविले. त्याजबरोबर येसाजी मल्हार यास दिले होते. (९१ कलमी बखर, कलम ६२) राज्याभिषेक प्रसंगी हे उपस्थित असल्याचे नमूद आहे. त्यानंतर लौकरच म्हणजे शके १५९८ मध्ये यांना वाई प्रांताचे सुभेदार नेमिले व त्याच अधिकारावर ते अखेरपर्यंत होते.

शिवछत्रपतींचे मृत्यूनंतर संभाजी छत्रपतींचे कारकिर्दीतील यांची माहिती आढळली नाही.

राजाराम महाराजांचे राजवटीत ह्यांचा येसाजी मल्हार यांच्या कामगिरीचा आढळ होतो. शक १६१६ चे कार्तिकांत शंकराजी नारायण, पंतसचीव यांच्या अनुज्ञेतेने संताजी घोरपडे हे जिंजीचा वेढा उठविण्यास गेले होते. ह्यांच्या सेना-समुदायांत हे येसाजीपंत कोरडे होते. त्या वेळेच्या त्यांच्या कामगिरीचे कौतुक करून छत्रपती राजाराम यांनी शके १६१८ मध्ये पौष बहुल १३ (१६९७ जाने. १०) स प्रांत वाईतील संमत निंब पैकी मौजे खडकी हा गाव इनाम करून दिला. ह्यापूर्वी म्हणजे शके १६०८ क्षेत्र संवत्सरी कर्नाटकांत व महाराष्ट्रातही मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी वाई नजीकचे शिरगावचे जोस-कुलकर्णपणाचे वतन ह्या येसाजी मल्हार कोरडे यास ७० होन आणि ५ मण धान्य घेऊन विकत दिले. ह्याचे विक्रीत पत्र शक १६११ शुक्ल संवत्सर, चैत्र वद्य ९ (सन १६८९ मार्च ३१) चे आहे. ह्या वतनास शिरगाव येथील अर्ध चाहूर जमिन व भुईज येथील अर्ध चावर जमीन ह्या गावचे शिवार शिरगावास लागूनच आहे ते देऊन भोगवट्याच्याही सनदा दिल्या. ह्या सुमारास येसाजीने स्वर्गवास केला व त्याचे पश्चात राघो येसाजीस वाई प्रांताचे सुभेदार शके १६२२ मध्ये नेमल्याचे धोम येथे दिसून येते. वरील विवेचन येसाजी मल्हार कोरडे यासंबंधीच आहे. त्यात रघुनाथ बल्लाळ कोरडे असा उल्लेख नाही (भाइ. सं.मं. त्रैमासिक २३.३ शके १८६२ पौष इ.स. १९४१ जानेवारी, पृष्ठ ७६ लेखक : कै. स.ग. जोशी)

रघुनाथ नारायण (बल्लाळ) यांचा कार्यकाल शके १५७९-१६०६ पर्यंत आढळतो. **रघुनाथपंत कोरडे यांना मौजे नांदोशी, ता. हवेली, जि. पुणे येथील बापूजीपंत मुद्गल नऱ्हेकर देशपांडे यांची लेक दिली होती. तसेच रघुनाथपंत कान्होजीपंती डबीरांचे जावई पण होते.** (सभासद बखर; पुरंदरे दप्तर, भाग ३, पृष्ठ १३३)

छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे यांच्या आग्र्याहून सुटकेच्या वेळी रघुनाथपंत कोरडे वकील म्हणून आग्र्यास बादशहाच्या कडे पाठविले होते. परंतु शेवटी साडे आठ महिने कैदेत होते (२०/०८/१६६६ ते ०३/०४/१६६७) महाराजांच्या सुटकेची व्यवस्थापण त्यांनी केली. त्याचबरोबर त्र्यंबकपंत डबीरपण होते. फुलादखानाने दोघांचा अतोनात छळ केला. निरनिराळी अमिषे व अत्याचार घडवून

आणविले परंतु राजांविरूद्ध एक अक्षरही ते त्यांचेसमोर बोलले नाही. मोगल व पोर्तुगीज कैद्यांचा ज्याप्रमाणे छळ करीत त्याहून अधिक त्रास त्यांना देणेत आला. शेवटी त्यांची सुटका झाली.

छत्रपती शिवाजी राजांनी जावळीच्या मोऱ्यांविरूद्ध लढाईला रघुनाथ कोरडे यांना पाठविले होते. त्यांत हनुमंतराव मोरे मारले गेले व प्रतापराव मोरे विजापूरला पळून गेले.

(७) सोनोपंत विश्वनाथ डबीर :

सोनाजी उर्फ सोनोपंत विश्वनाथ उर्फ सुवर्ण पंडित शिवाजीचा पहिला राजकारणी सहाय्यक. विजापूर व औरंगाबाद इत्यादींकडे युक्तिवाद शिष्टाई करणारा. दि. ०६/०९/१६६५ रोजी त्यांची व जिजाबाईची शिवाजीने सुवर्णतुला केली. छत्रपती शिवाजीराजे व संभाजी आग्र्यांत जाणेपूर्वी त्र्यंबकराव डबीर व रघुनाथपंत नारायण (बल्लाळ) कोरडे हे वकिल म्हणून आग्र्यास पाठविले होते. त्यांनी शिवाजीराजे व संभाजीराजे यांच्या सुटकेबद्दल व्यवस्था केली. राजे कैदेतून सुटल्यानंतर त्र्यंबकराव डबीर व रघुनाथराव कोरडे हे २०/०७/१६६६ ते ०३/०४/१६६७ पर्यंत आग्र्यास फुलादखानाच्या कैदेत साडे आठ महिने कैदेत होते सर्व प्रकारची आमिषे व अत्याचार यांना या दोन्ही ब्राह्मणांनी दाद दिली नाही. छत्रपतींवर त्यांची निष्ठा असल्याने यमाच्या दाढेत असतांना त्यांनी त्यांचे विरूद्ध ब्र काढला नाही. मोगल व पोर्तुगीज कैद्यांचे छळ करीत. त्याहूनही अधिक छळ सोसूनसुद्धा सहनशीलतेने सर्व निभावले. नंतर त्यांची सुटका झाली. कायम स्वराज्याशी प्रामाणिक राहिले.

त्र्यंबकपंत डबीर हे बाळाजी बापूजी मुद्गल-नऱ्हेकर-देशपांडे नांदोशीकर यांचे सासरे होत. त्यांना शिवाजीराजांनी अष्टप्रधान मंडळात सुमंतपदावर नेमले. पुण्यापासून बावीस किलोमीटरवर असलेल्या तर्फ खेडेबारे येथे खेड शिवापूर येथे शके १५९९ पिंगळ नाम संवत्सरे, चैत्र वद्य १२ दिनांक १२ एप्रिल १६७७ रोजी मृत्यू झाला. खेड शिवापूर शाळेच्या भिंतीमागे त्यांची १० फूट × १० फूट दगडी चौथऱ्यावर त्यांची समाधी आहे व त्यावर वृंदावन आहे.

सोनोपंत डबीर दि. २५/०१/१६६५ रोजी (ब.मो.पु.५५९ पृष्ठ) रायगडावर मृत्यू पावले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० होते. सोनोपंत यांना २ मुले (१) निळोपंत

(२) आबाजीपंत हे दोघेही वडिलांबरोबर असल्याने शिवाजीच्या तालमीतच तयार झालेले होते. अंगी कर्तबगारी असल्याने वडिलांचे पश्चात, त्यांच्याच जागेवर हे काम करू लागले. प्रतापगडावरील लढाईत महाराजांचे युद्धमंडळांत सोनाजीपंत डबीर होते. सोनाजीपंत डबीर यांचा मेव्हणा, रघुनाथपंत कोरडे हे कान्हो डबीरांचे जावई. मोरापंत पेशवे निळो सोनदेव हे सोयरे. मोरोपंत यांची लेक सौ. जानकीबाई (पहिली पत्नी) रामचंद्रपंत निळो सोनदेव (अमात्य) यांना दिली होती. निळो सोनदेव बहुतकर यांचे मामा कसबे खेडेबारेचे जोशी- ठकार. निळोपंतांचे बाळपण मामाचे घरी गेले. शिवबा खेडेबाऱ्यांत लहानांचे मोठे होत असल्यामुळे व ते भोसल्यांचे कुलोपाध्याय. त्यामुळे शिवबा निळोपंतास बाळपणापासून ओळखीत (पुरंदरे दप्तर, भाग ३, पृष्ठ १३३; शिवचरित्र साहित्य खंड ७ प्रस्तावना, पृष्ठ २७, कृ. वा. पुरंदरे, शि. भा. अ. १६; श्लोक ९७-६३ जेश)

सोनाजीपंत यांचे दोन चिरंजीव, निळोपंत व आबाजी, छ. शिवाजी महाराज यांचे पदरी निळोपंत यांनी डबीर, सचिव, मुजमी वगैरे हुद्यांवर कामगिरी केली. त्यावेळी त्यांनी आपला बंधू आबाजी यास आपले मदतनीस घेतला होता. दोघेही हुद्याचे काम करून लष्करी काम करीत असत.

आपल्याकडील पद्धतीप्रमाणे सर्व हुद्दे व मानमरातब वडील घराण्यांकडे जात असल्याने आबाजीस नेहमीच दुय्यम भूमिकेवर समाधान मानावे लागले असावे. त्यामुळे आबाजी हे एक उपेक्षित व्यक्तिमत्त्व म्हणून गणले गेले आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा काळ सन १६४५ पासून तो भेट १७०४ पर्यंत म्हणजे जवळजवळ ६० वर्षे त्याने महाराष्ट्राची अखंडपणे एकनिष्ठपणे सेवा केलेली दिसते. छत्रपतींच्या चारी राजवटीमध्ये ज्यांनी महाराष्ट्राची सेवा केली त्यामध्ये रामचंद्र निळकंठपंत अमात्य यांना वगळल्यास किंबहुंना त्यांचेपेक्षा जास्तच सेवा यांचेकडून घडलेली आहे. ज्यावेळेस रामचंद्रपंतांचा जन्मही झाला नव्हता त्यावेळेपासून यांचे कर्तृत्वास सुरूवात झाली.

याची प्रथम ठळक कामगिरी म्हणजे कल्याणाच्या मोहिमेवर नेमणूक यामध्ये छ. शिवाजी राजांनी आबाजीपंतांबरोबर त्यांचे सोबतीला आपले खाजगीकडील एक हजार निवडक लोक दिले. इ.स. १६४८ मध्ये त्यांनी कल्याण जिंकून, सुभेदाराची सून व जनानखाना हाती घेतला. शिवाजीने सुनेस इतमानाने परत करून त्यांना

सुभेदारीवर नेमले. इ.स. १६६० कल्याण भिवंडी व संपूर्ण कोकण व इ.स. १६५० कर्नाटकाचे मोहिमेस कित्येक किल्ले, होन व ठाणी ही जिंकून घेतली व त्याचा बंदोबस्त राखला.

इतकेच काय इ.स. १६५६ साली महाराष्ट्र व विजापूरकरांशी चकमकी घडू लागल्यावर, इ.स. १६५७ मध्ये औरंगजेब आपल्या वडिलांचे म्हणणे बादशहांचे आजारपणामुळे दिल्लीत जात असतां त्यांने शिवाजीमहाराजांनी आबाजीपंतास पाठवून त्याला सरदेशमुखी व जहागिरी देऊन, कोकणाचा बंदोबस्त राखण्याची सूचना केली.

इ.स. १६६२-६३ च्या सुमारास महाराजांचे ताब्यात असलेल्या मुलूखापैकी सुमारे १/२ भाग एकट्या आबाजीपंतांनी जिंकलेला होता. रायरी (रायगड) ला राजधानीचे स्वरूप आणण्याकरीता सरकारी कामकाजासाठी आवश्य त्या इमारती वगैरे इ.स. १६७० मध्ये मोरोपंत पिंगळे यांजबरोबर आबाजीने माऊली किल्ला व कल्याण प्रांत सर केला. इ.स. १६८० मध्ये सचिवपद यांचेकडे होते. इ.स. १६८९ राजाराम महाराज जिंजीस जाताना विश्वासू मंडळीत आबाजी सोनदेव होते. बाजारदरवाजा कसबा पाटगांव वतन त्यांना लग्नांत मिळाले होते. राजाराम महाराजांनी १६९२त रायगड हस्तगत करून घ्यावयास सांगितले. काही काळ ते न्यायाधीश पदावर होते. (हुकूमतपन्हा - पान ६९,७०)

श्री वडजाई / वज्रादेवी देवस्थानासंबंधी थोडक्यात माहिती:-

नांदोशीकर देशपांडे (नऱ्हेकर मुदगल बल्लाळ) यांचे इतिहासप्रसिद्ध घराणे मौजे नांदोशी तालुका हवेली जिल्हा पुणे येथील असून त्या घराण्याची वडजाई ही कुलस्वामिनी आहे. हे एक जागृत देवस्थान असून श्री तुळजा भवानी महिषा सुरमर्दिनीचे ठाणे असून वडजाई / वज्रादेवीची मंदिरे खेडेबारे म्हणजे कर्यात मावळ अथवा हवेली तालुक्यांत येथील नांदोशी खेरीज वडगांव धायरी व खेड शिवापूर, कोंढणपूर येथे ही असून दरवर्षी नवरात्रांत दसऱ्याचे दिवशी व माघी पौर्णिमेच्या दिवशी पालखीसह मिरवणूक असते.

हे नांदोशी गांवचेही ग्रामदैवत असून त्याचे भक्तगण मुंबई, कोकण, हैद्राबादपर्यंन्त पसरलेले असून दरवर्षी माघी पौर्णिमेस देवीचा फार मोठा उत्सव व ऊरूस असतो.

देशपांडे घराणे आठशे वर्षापूर्वीपासूनचे असल्याने नांदोशी गांवची वसाहत करण्याचे काम त्यांचे पूर्वजांनी केले आहे त्यामुळे छत्रपति शिवाजी महाराज, शाहू महाराज, व राजाराम महाराज यांनी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनामे दिली. देवस्थान इनामांत श्री वडजाई / वज्रादेवी मंदिराचा कारभार देशपांडे घराण्यांतील व्यक्तिंना असून दरवर्षी पालखी पूजेचा मान त्यांच्याकडेच असून दसरा व माघी पौर्णिमेस पालखी देशपांडे यांचे वाड्यात सजविली जाते व परत देशपांडे यांचे घरांत छबिनासह विसर्जित होते.

पालखीचे प्रस्थान होणेपूर्वी पालखी नीट सजविली जाते गोंडे, छापरी, किनखाप घालून पालखीत देवीचा बिछाना घालून सजावट झाल्यावर देवीचा चांदीचा मुखवटा त्यावर ठेवतात. साडी चोळी व अलंकार घातल्यानंतर पूजा करतात व शेवटी घरांतील मंडळी पालखी भोवती उभी राहून टाळ मृदंगासह भजने म्हणतात. त्याचबरोबर ढोल, वाजंत्री, ताशे, ताल धरून वातावरण भारदस्त होऊन जाते. ते महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचा जगदंबा भवानी मातेचा उदे उदे करून सर्वजण पालखी घेऊन गांव प्रदक्षिणेच्या मागे लागतात. देवीच्या देवळासमोर जाऊन परत आल्यावर पालखी परत देशपांडे यांच्या घरांत प्रवेश करते.

देशपांडे पाटील यांचे मूळ पुरूष बापूजी मुदगल नारो बापूजी चिमणाजी बापूजी, बाळाजी बापूजी, केसोपंत न्हेकर मंडळी व मोरोपंत पेशवे हे प्रत्येक लढाईवर जातांना वज्रादेवी / वडजाई देवीचा अशिर्वाद घेऊनच बाहेर पडत छबिन्यासमोर पोत वाजवून देशासाठी आईचा मी वाजवितो संभळ पाजविला मी पोत जिवाचा" असे भक्तीपूर्वकतेने म्हणतात. वज्राप्रमाणे ढाल-तलवार घेऊन निधड्या छातीने विजय घेऊन परत येत व तिच्यासमोर नतमस्तक होत असत. शिवकाळांतही गावांतील घुले, काळोखे, सणस, कदम, चौधरी, रानवडे ह्यांची सुद्धां छत्रपति शिवाजी राजांना वेळोवेळी मदत होत होती.

देशपांडे घराण्यांतील व्यक्ति इतर विशेष देवी पूजा म्हणजे नवचंडी यज्ञसुद्धा घरी व देवळांत आयोजित करून श्रीगणेशपूजन, पुण्याहवाचन, वरूणपूजा, देवीमहापूजा, श्रीसूक्त अभिषेक, पंचामृत स्नान, उष्णोदक स्थान उरकल्यानंतर नऊ कुमारिकांचेहि पूजन करण्यात येते. कधी कधी सप्तशतीचे पाठही होतात. दरवर्षी देवीचा गोंधळ देवळांत होतो. पालखी चालू असतांना गांवकरी "भंदहि" करून देवीकडे आपले मागणे मागतात.

असंख्य भाविक जागृत दैवत असलेल्या वडजाई उर्फ वज्रादेवीस नवस मागतात. असंख भाविक विविधे प्रसंगी नवस फेडण्यास, देवीची पूजाअर्चा करून स्वयंपाक सिद्ध करून नैवेद्य दाखवतात व नंतर एकत्र मिळून भोजनाचा आस्वाद घेतात. भक्तांना चमकृतिपूर्व अनुभव वारंवार येत असतात. जणू रिद्धि सिद्धीचे अनोखे प्रदान.

पांच वर्षीपूर्वी श्री देशपांडे कुटुंबीय व त्यांचे नातेवाईक व गावांतील प्रतिष्ठित मंडळींनी स्वेच्छेने वर्गणी गोळा करून सुमारे पंधरा लाख रूपये खर्च करून छोटेखानी वडजाईचे मंदिराचे रूपांतर भव्य विस्तीर्ण स्वरूपांत बांधण्यात आले . आता मंदिर एवढे प्रशस्त झाले आहे की गावातील मंडळींनी भांडी कुंडी विकत घेऊन लग्नकार्यादी कार्येसूद्धां तेथे होऊ लागली आहेत.

वडजाई देवळाचे मागे एक मोठी विहिर आहे. देशपांडे घराण्याने ती विहिर गावातील पाणी पुरवठा करण्यासाठी गावाला वापरण्यास दिली आहे. त्या विहिरीतून हजारी वर्षे गांवात कायम पाणीपुरवठा करण्यांत आलेला आहे. दोन सबमर्सिबल मोटारी बसवून त्यातील पाणी उपसून समोरच्या डोंगरावर पाण्याची मोठी टांकी बांधली असून त्यांत पाणी साठविले जाते. तिथूनच पाणी पुरवठा रोज केला जातो. प्रथम ही विहिर १९८० पर्यत लहान होती. पुणे जिल्हा परिषदेने ती मोठी करून ३० फूट व्यास व अंदाजे ७५ फूट खोल अशी पक्की विहिर बांधण्यांत आली. मागील वर्षी शासना मार्फत विहिरीजवळ एक पक्का बंधारा बांधला असून विहिरीची पाण्याची पातळी वाढत पाण्याची सोय झाली.

गावातील मुख्य डांबरी सडकेपासून देवीचे देवळा पर्यंन्त रस्ता नव्हता. राजाराम देशपांडे यांनी स्वत:चे खर्चाने (रू ७५,०००) डबर, रवाळी व खडी व त्यावर मुरूम टाकून रस्ता तयार केला. गेल्या दोन तीन वर्षात या रस्त्यावर कॉंक्रीटचा रस्ता शासकीय खर्चाने करण्यांत आल्यामुळे सर्व भाविकांची सोय झाली. मौजे नांदोशी या गावामध्ये सोळा ठिकाणी (त्यांत वडजाई देवळाचे समोर दोन) असे सोलर लॅम्पस् सुद्धा मिलिंद देशपांडे यांच्या मदतीने बसवून गांवाकडे सूपूर्द करण्यांत आले. (रूपये ३,७५,०००- खर्च) आता देवीच्या देवळाचे बाहेर झाडे लावणे, सुशोभिकरण करणे इत्यादी कामे करण्याची आहेत. स्वेच्छानिधी जमेल तसे काम हाती घेतां येईल.

देवी भागवतांत उल्लेख केल्याप्रमाणे देवीची ऐकूण साडेतीन पीठे आस्ति त्यांत आहे. कोल्हापूरची महालक्ष्मी; तुळजापूरची महासरस्वती, माहूरची महाकाली ही तीन पीठे व नाशिकच्या वणी येथील गडावरील सप्तशृंगी हे अर्धे पीठे वडजाई किंवा वज्रादेवी हे तुळजापूरची महासरस्वतीचे ठाणे असले तरी ती महिषासुर मर्दिनीचे कार्य भक्तांना दाखविते असे इतिहासांतील घटना पाहता दिसून येते. चिमणाजी, बाळाजी बापूजी, मोरापंत यांनीही देवीने त्यांची पाठ राखून त्यांना वेळोवेळी विजय प्राप्त करून दिलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज व जिजाई माता या दोघांनाही या देवीच्या सान्निध्यांत अनेकदां सान्निध प्राप्त झाले आहे. या कारणाने देवीच्या जागेचे इनाम छत्रपतींनी न्हेकर देशपांडे नांदुसकर पाटील यांना देऊन शाहू महाराजांपर्यत सर्वांनी अधिकृत सनद देऊन केले आहे आठशे वर्षाहून अधिक शिवपूर्वकालीन मुदगल देशपांडे घराण्याचा अभिमान वंशजातील प्रत्येक व्यक्तिस तसेच ग्रामदैवत समस्त मानलेल्या गावकरी मंडळी नांदोशी यांना त्याचा सार्थ अभिमान पण आहे.

खेडेबारे येथे 'नांदोशी' हे गाव आहे तसेच खेड शिवापूर येथे ही "खेड शिवापूर" गांव आहे दोन्ही ठिकाजी वज्रादेवी किवा वडजाई मंदिरे आहेत त्याचे कारण "**न्हेकर देशपांडे नांदोशीकर**" व "न्हेकर देशपांडे खेड शिवापूरकर" ही दोन्ही ठिकाणे देशपांडे इनामाची वतनाची असून अत्रिगोत्रोप्तन्न असून दरवर्षी गावात माघी पैर्णिमेस "**ऊरूस**" व "**देवीचा उत्सव**" देशपांडे कुटुंब व गावंकरी मोठ्या उत्साहाने साजरा करतात, व त्यांच्या घरांतील प्रत्येक कुटुंब स्वतचे घरांतील व दूरस्थ आप्तेष्टांसह दसरा दिवाळी सारख्या दिवस साजरा करतात. देशपांडे कुटुंबिय पुरणाच्या पोळीचा नैवेद्य तर गांवकरी "अजबली" देऊन आप्तांना नैवेद्य देतात. कारण देवीचे ठिकाण शक्तिपीठान्तर्गत असल्याने त्याप्रमाणे रूढी पाळतात. "अजबली नैवेद्याची जागा देवीच्या देवळाच्या समोर बेलाच्या झाडाखाली जो चौथरा केला होता तेथे पूर्वी होती व अजबलीचे "**शिर**" हा गावच्या पाटलाचा मान म्हणून देशपांडे यांस तेथेच ठेवला जात असे.

अेवढे प्रशस्त भव्य मंदिरे वज्रादेवीची मूर्ती मात्र अगदी छोटेखानी व साधी परंतु भक्तांच्या हृदयांत मात्र तिचे आगळे वेगळे व प्रचंड महाकाय नाना वस्त्रालंकारांनी

आभूषित असे तिचे रूप मात्र दृष्टीप्रतीस येते. तेथे तिचे अव्यक्त रूपांतील दर्शन भावून जाते. हात त्वरित नतमस्तक होऊ लागतात.

श्रद्धा, भावना, परंपरा, अभिमान, कर्तव्यबुद्धी इत्यादी मुळे नांदोशीकर देशपांडे घराण्यांतील मूळ पुरूषाने स्वीकारलेली ही कुलदेवता आठशे वर्षा हूतहि अधिक काल देशपांडे घराण्याची व नांदोशी ग्रामस्थांची पाठीराखी झालेली आहे. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमी पर्यंन्त होणारे शारदीय नवरात्र हा असाच एक कौटुंबिक कुलधर्म कुलाचार आहे. मंदिरात सुद्धा हे "नवरात्र" नेमाने चालत असते. नवरात्रांत घटस्थापनेच्या दिवशी घटाखाली स्थंडिलावर नऊ धान्यांची पेरणी करतात व दसऱ्याच्या दिवशी त्या घराचे अंकुर उपटून देवाला व देवतेला वाहून सायंकाळी सर्व गांवकरी सोने बरोबर घेऊन शिलांगणास वेशीपर्यन्त जातात. हा रिवाजही पाळला जातो. घरी आल्यानंतर घरामध्ये शिलंगणाची पूजा होऊन रावणस्वरूपी दृष्ट वृत्तिं नाश होऊन बंदिस्त असलेली शस्त्रे बाहेर काढून सुवर्णाचे होन बाहेर काढून पुरूषांनी गाजविलेल्या पराक्रमाची नोंद म्हणून प्रतिनिधि स्वरूपांतील "ओवाळणी" चा कार्यक्रम पार पाडला जातो. छत्रपति शिवरायांबरोबर लढाया जिंकून आलेल्या नांदोशीकर देशपांड्यांनी व त्याच्या वंशजांनी हा प्रसंग दरवर्षी साजरा करीत आहेत.

सर्व मंगल मंगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबके गौरी, वज्रादेवी नमोस्तुते ।।

प्रकरण १

शिवनेरी - शिवजन्म - बापूजी मुदगल वगैरे मावळांनी व सरदारांनी हिंदवी स्वराज्याची शपथ

शिवनेरीजवळ शहाजीराजांचे अश्वपथक घोडेस्वार आंबराईत थांबले. त्यांचेबरोबर घेऊन राजश्री शिवाजी, जिजाऊसाहेब, श्यामराजपंत पेशवे व माणकोजी दहातोंडे सरनोबत व बाळाजी हरी मज्यालसी व कारकून व स्वारांचा जमाव होता. शहाजीराजांचे व्याही विश्वासराव यांनी जिजाऊ व शहाजी यांना आदराने वाड्यावर नेले. थोडेसे औपचारिक बोलणे झाले. आणि शहाजीराजे त्वरित निघाले. जाताना शंभूराजांनापण घेऊन जाण्याचा बेत होता. बाळकृष्ण हनमंते, संक्रोजीपंत, सोनोजीपंत व कोरडे ही मंडळीपण जरूरत्या शिबंदीनिशी निघण्याची तयारी करू लागली. तेवढ्यात लखूजी जाधव लेकीला भेटण्यासाठी आले. विश्वासरावांनी लखूजींना जेवण करून निघण्याबद्दल विनंती केली. जिजाऊंना आग्रह करकरून पित्यास खाऊं घातले.

शिबंदीची व्यवस्था झाल्यावर घोडदळ तयार झाले. बाळकृष्ण हणमंते, श्यामराव नीळकंठ, रघुनाथ बल्लाळ, कोरडे हे शहाजी भोसल्यांचे सरदार वाड्याबाहेर उभे होते. जिजाई गर्भभाराने जडावल्या होत्या. मेण्यांत बसून शिवनेरीवर हत्ती दरवाजावरून मार्गक्रमू लागल्या. जिजाऊं शिवाईचे दर्शन घेऊन गडावर गेल्या.

एक वाईट बातमी त्यावेळी मासाहेबांच्या कानावर आली. की शहाजी राजांनी विजापूरकरांचा मुलूख बळकावून बंडावा केला म्हणून विजापूरकरांनी मुरार जगदेवाला पुण्यावर चाल करून पाठविले. त्याने पुण्याची होळी केली. वाडे भस्मसात केले व दिवसाढवळ्या पुण्यात प्रत्यक्ष गाढवांचे नांगर फिरविले व शहाजीच्या पुण्याच्या मोकाशांत जहागिरीत पहार ठोकली. दैवच फिरले. आणखी दुखाची गोष्ट म्हणजे तिकडे लखूजी जाधव हे मारले गेले. हे सर्व विश्वासरावांकडून कळले. जिजाऊ हताश झाल्या. बेशुद्धच पडल्या.

बरेच दिवसानंतर त्या नेहमीप्रमाणे वागूं लागल्या. त्यांतच त्यांचे दिवस भरले. बाळ जन्माला आला. चाहुलीने वातावरण प्रसन्न होऊं लागले. शास्त्रीबुवा आले. भाकीत केले. ते म्हणजे औंदादिस लई कठीण आहे. दुष्काळ उभा ठाकणार आहे. परंतु जिजाऊ शास्त्रीबुवांना म्हणाल्या, सर्व सविस्तर सांगा. पीराच्या वेळी दिवस गेले आणि सर्व घरादाराचा थारा उडाला. कुणाचा मेळ न रहाता रक्ताच्या नात्यांनी वैर धरले. जहागिरीवर नांगर फिरविला. आजोबांचे छत्र गेले. या मितीला पोराचे वडील शत्रूमागे धांवताहेत. थोरला भाऊ लहान परंतु त्याचीही वणवण सुटली नाही. मुलूख अन्नान दशेत ना माहेर ना सासर! शास्त्रीबुवांना जिजाऊने तिची तळमळ सांगितली.

शास्त्रीबुवांनी मुलाचे कुंडलीत मूळ शुभलक्षणी असून सर्वांचे पांग फेडून सर्व समाजाला धरून नेतृत्व पत्करेल. काळजी करू नका असे सांगितले. शाहाजी राजांना शुभवर्तमान कळविले.

बाहेर गडावर सर्व वातावरण आनंदमय होऊन गेले. सनया, चौघड्यांचा नादात सर्व कुटुंबीय आनंदाच्या सोहळ्यांत मग्न होऊ गेले. दारावर तोरणे बांधली गेली, सुरेख रांगोळ्या काढल्या गेल्या. बारशाची तयारी जोरदारपणे होऊ लागली. नंतर गडावर सर्व आप्त व पाहुणे मंडळी जमा झाली. शिवाईला नवस बोलल्याप्रमाणे बाळाचे नाव "शिवाजी" ठेवण्याचे ठरले. त्याप्रमाणे सर्व सोहळा व्यवस्थित पार पडला.

इतक्यांत शहाजीराजे गडावर आले. विचारपूस केली. आठ दहा दिवस आनंदात गेले. तेवढ्यांत शहाजीराजांना खलिता आला. स्वारीवर निघण्याचा आदेश होता. लगेच निघण्याचे ठरले. त्याप्रमाणे ते लगेच स्वारीवर गेले.

दोन तीन वर्षे निघून गेली. मोगलांकडील नोकरी सोडून त्यांनी निजामशाहीत विजापूरकरांची नोकरी पत्करली. सहा सात वर्षे अशीच निघून गेली. शहाजी राजांना पुण्याची जहागिरी मिळाली. शहाजींनी दादोजी कोंडदेवांना पुण्याला पाठविले. आणि त्याच्याबरोबर शिवाजी व जिजाऊंना ही पुण्याकडे पाठविले. कारण शहाजी महाराजांकडे पुणे सुप्याचीपण जहागिरी होती.

शहाजीराजे कर्नाटकात बंगलोर येथे मानाने वास्तव्य करीत होते. तोपर्यंत इकड जिजाऊंना व राजांना रहाण्यासाठी वास्तव्याचे कामाचे ठिकाण हवे होते. पुण्यात

कसबातल्या जागेत वास्तव्य करायचे ठरले. जागेच्या जवळच विटकऱ्यांच्या ढिगाऱ्याच्या जागी गणपतीची सुंदर मूर्ती सापडली. सर्वांना अतिशय आनंद झाला. जिजाऊनी लगेच त्याजागी देऊळ बांधावयास दादोजी कोंडदेवांना फर्माविले. त्याच्या शेजारीच लाल महालाची निवासाची जागा निश्चित करून स्थानिक रहिवाशांनाही जागा आखून दिल्या. सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या (खेडेबारे) याठिकाणी पुणे परगण्याचे हवालदार बापूजी मुद्गल नऱ्हेकर (नांदोशी) यांच्या कसबे खेड यांच्या घराशेजारीच नवीन वाडा बांधावयाचा हुकूम दिला.

विश्वासाचा माणूस म्हणून बापूजी नऱ्हेकर नांदोशीकर यांचे भोसले घराण्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. पावसाळा तोंडावर होता. बापूजी मुद्गल यांनी शिवाजीराजांना व जिजाऊला त्यांचे नवीन घर बांधून होईपर्यंत त्याच्या स्वतःच्या घरी निवासासाठी जागा दिली. शिवपूर्व काळात मुसलमानी अमदानी पूर्वीपासूनच बापूजी मुदगल देशपांडे पाटील (नऱ्हेकर) यांचा नांदोशी येथे पिढीजात वंशपरंपरागत शेती व्यवसाय होता, त्यामुळे खेडेबाऱ्यांत अनेक ठिकाणी त्यांचे रहाते वाडे होते. व ते आकारानेही प्रशस्त असेच होते. त्यामुळे राजांच्या व जिजाऊंच्या निवासाची व्यवस्था मिटून गेली. घोडदळ असल्यामुळे मोठमोठे तबेले वाड्यालगतच असल्याने फौजफाट्याची सुद्धा काळजी नव्हती.

दादोजी कोंडदेव, (गोचिवडे), मलठणकर हे सुभेदार किल्ले कोंढाणा ऊर्फ सिंहगडावर रहात असल्याने त्यांचा नजीकच्या ठाण्याचा गांव आणि खेडेबाऱ्याचे बाबाजी रायाजी देशमुख, नलवडे, ऊर्फ कोंडे यांचे वसतिस्थान, खेड येथे प्रथमतः त्यांना आणून ठेविले. नंतर सुभेदार कोंडे यांनी शिवगंगेच्या काठची खाजगी जमीन जीस शेरी म्हणत, त्यात आंब्याची झाडे लावली. त्यास "शहाबाग" असे म्हणतात.

नंतर सुभेदार, नलवडे ऊर्फ कोंडे यांनी शिवछत्रपति यांचे नावे "शिवापूर" आणि जिजाऊबाईंचे थोरले पुत्र संभाजीराजे यांचे नावे "संभापूर" ऊर्फ मांडकी पेठ (वि. का. राजवाडे पृष्ठ १०७, खंड १८ यांत छत्रपतीची १चावर जागा संभापूर वसाहती साठी जिरायत ठेवण्याचे नमूद आहे.) अशी दोन गावे वसविली. त्यांपैकी संभापूर हे गाव मात्र शाहू छत्रपति यांचे वेळचा प्रबळ पुंड दमाजी थोरात याने जाळलेमुळे तेथील वस्ती उठून "शिवापूर" व "रांझे" येथे गेली. येथे रहात असताना खेडेबारेचे वतनदार देशपांडे बापूजी मुद्गल (नऱ्हेकर-नांदोशीकर) यांची व

शिवछत्रपति यांची परममैत्री व लोभ जडला (ले. स. ग. जोशी लेखांक ३०, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड - १, पृष्ठ ११८ व ११९) कसबे खेड येथील बापूजी मुद्‌गल न्ऱ्हेकर देशपांडे यांच्या वाड्यालगतचीच जागा दादोजी कोंडदेवांनी खेडच्या कोंडे देशमुखांकडून विकत घेतली. (इ. स. १६३६) व त्याजागी शिवाजीमहाराजांसाठी नवीन वाडा बांधण्याचे ठरले व त्याठिकाणी बांधकाम सुरू केले.

खेडेबारे येथील वाड्याभोवती पंतांनी नवे शिवापूर वसविले. त्यावेळी मुहूर्तसमयी पाटील, कुलकर्णी, देशपांडे वगैरे वृत्तिवंतास पंतांनी मानाची वस्त्रे देऊन त्यांचा सत्कार केला. (कसबे खेडेबारे (खेड येथे) वाडे बांधल्याचा उल्लेख शिवचरित्र प्रदीप, पृष्ठ मा. ४१ पृष्ठ ६२०, लेखक श्री. मेहेंदळे खंड-१ मध्ये नमूद आहे.) खेडेबारे येथील देश कुलकर्ण्यांच्या करिन्यांत शिवाजीच्या खेड येथील वास्तव्यासंबंधी आणखी एक उल्लेख आहे. (कृ. वा. पुरंदरे दफ्तर, भाग ३, क्र. १५१, पृष्ठ १३१-१३२)

खेड-पुण्याचे वाडे तयार झाले. विहीरींना पाणी भरपूर लागले. पुण्यातला वाडा अतिशय देखणा होता. प्रशस्त चौक होते, दिवाण सदर व खासे सदर, राणी महाल, कोठी, स्वयंपाकघर व अप्रतिम देवघर सुद्धा नीट बांधले होते. पागा, गोशाळांची व्यवस्थापना केली होती. दादोजींनी वास्तूचे नांव ठेवले "लाल महाल" त्यासमोर श्रीगजाननाचे मंदिर. जिजाऊंनी सोन्याच्या नांगराची पूजा करून तो भूमीला लावला. हर हर महादेवच्या गजराने परिसर दुमदुमून गेला, केलेल्या कष्टाचे चीज झाले. जहागिरीचे स्वरूप पार पालटून गेले. दादोजींनी निष्णात, पटाईत ढालकरी, पट्टेकरी बालराजांसाठी मुद्दाम आणवले होते. लढाईचे व मैदानी खेळांचे शिक्षण दररोज होऊ लागले. फलटणच्या मुधोळकरांची कन्या सईबाई हिचा विवाह शिवाजीशी जुळून आला. लगेच लग्नाची धामधूम सुरू झाली. शिवापूर, खेडेबारे (नांदोशी), मावळेहि आले. न्ऱ्हेकर नांदुस्करांनी बैलगाड्यांमध्ये वऱ्हाडी मंडळी मेळवून लग्न उत्तम तऱ्हेने पार पाडण्यांत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. तेवढ्यात शहाजीराजांनी जिजाऊ, शिवाजी या सर्वांना बंगलोरला या म्हणून बोलावणे केले. सर्वांना आनंद झाला. शहाजीराजे लग्नाला हजर नव्हते. म्हणून आता त्यांचे दर्शन होणार व आनंदात दिवस जाणार या विचाराने सर्वजण बंगलोरला जायची तयारी करू लागले.

पंतांची जहागिरीची व्यवस्था विश्वासू अशा नऱ्हेकर देशपांड्यावर सोपविली. प्रवास सुरू झाला. घोड्यावरून वाटचाल असल्याने कर्नाटकातले सृष्टिसौंदर्य सर्वांना भुलवीत होते. तेथे पोचल्यानंतर संभाजीराजांनी मासाहेबांच्या पायाला स्पर्श केला. शहाजी राजांनी बंगलोरचे वैभव न्याहाळण्यासाठी माहीतगार इसमासह, सर्व कुटुंबास पहाता यावे यासाठी व्यवस्था केली. शहाजी राजांच्या मनात तोलदार अशा मोहित्यांची सोयराबाईशी शिवाजीचे लग्न करून द्यावयाचे मनांत होते. तेहि चर्चेअंती करण्याचे निश्चित करून लग्नाचा बार पुन्हा काढला. दिड वर्षानंतर मात्र का कोण जाणे विजापूर दरबारांतील वातावरण शिवाजीराजांना रुचेनासे झाले. शहाजींनी त्यांच्या जहागिरीतला छत्तीस गावांच्या मोकासा जो पूर्वीच शिवबा राजांच्या नावे होता तो नीट संभाळण्यास सांगितले. परंतु शहाजीराजांना मात्र तेथला काळ आनंदाचा गेला. पंतांना म्हणाले, "चांगल वाढविलंत पोराला." पंतांनी उपरण्याला डोळे पुसून मूक उत्तर दिले. पुण्याला जाताना जिजाऊंना व शिवबांना अत्यंत वाईट वाटले.

पुण्याला आल्यावर नऱ्हेकर-नांदुस्करांनी दीड वर्षाच्या घडामोडींचे दफ्तर पंताला दाखल केले. त्यांच्या कामसूपणाची पंतांनी पाठ थोपटली.

मग रोहिडेश्वराला भेट घेण्याचे असे राजांच्या मनात आले. बरोबर बाजी जेधे, येसाजी कंक, दादाजी नरसी प्रभू गुप्ते, बाळाजी व चिमणाजी नऱ्हेकर वगैरे सर्व मंडळी होती. आळंदी, जेजूरी मग रोहिडेश्वराचा डोंगर कारीच्या पुढे अवघड वाट. परंतु घोडेश्वारांना त्याची अडचण नव्हती. निसर्गरम्य हिरवीगार वनस्पती, दाट झांडी, झुडुपे जंगली श्वापदांचा वावर सर्वजणांनी मार्ग नेटाने ओलांडला, मंदिर आले. थंडगार वाऱ्याच्या झुळकेमुळे वातावरण आल्हाददायक बनून राहिले. रोहिडेश्वर देवळांतील शंभु महादेवाचे दर्शन घेतल्यावर सर्वजण देवासमोर क्षणभर बसले. राजे काहीच बोलले नाहीत. मग चिमणाजी नऱ्हेकर म्हणाले "राजे" आपण बोलला नाही. त्यावर राजे म्हणाले, निजामशाही नंतर आदिलशाही, शाही फौजेने मुलूख लुटायचे व आपण भरणा करावयाचा, किल्लेदारांनी हात मारावा, गांवे जाळून टाकलेली आम्ही पहावी तरी काहीही बदल होत नाही. हे जहागीरदार, देशमुख, पाटील व कुलकर्णी एक झाले तर ह्या गोष्टी बंद व्हायला वेळ लागणार नाही. तेवढ्यात बाळाजी नऱ्हेकर म्हणाले, "विजापूरची ताकद काय कमी आहे का?

राजे बंगलोरला दीड वर्षे राहून आले होते. म्हणाले त्यांची मी तऱ्हा बघून घेतली आहे. उंटावरून शेळ्या हाकण्याचाच प्रकार करतात ते.

येसाजीने सर्व मातब्बर मंडळींना बोलावणे केले होते. त्यांचे समोर राजांचे मनोगत सांगितले. सर्वांना तो पटला नंतर जेवणे झाली. राजांच्या मनांत शिकार करण्याची लहर आली. बरोबर दोस्त मंडळी बाजी, येसाजी, बाळाजी व चिमणाजी व इतर साथीदार होतेच. वाघाच्या मागावर सर्व लक्ष देत होते. तेवढ्यात डोंगरावरून उतरून पलीकडे जाणार एवढ्यात राजांनी बंदुकीने बार उडविला. धुराने जाळी वेढून गेली. समोरच वाघ निपचित पडला होता. पण तो जिवंत होता. पुन्हा उडी मारण्याच्या प्रयत्नांत राजांनी भाल्याची फेक केली. प्रचंड धूड अखेरचा श्वास घेऊन कोसळला. त्या वाघास पुण्यात आणण्यात आले. जिजाऊ व दादोजीपंत यांना कौतुक वाटले.

लालमहालांतील मुक्काम संपला. उन्हाळा सुरू झाला शिवापूर, संभापूर व जिजापूरला पंतांनी आंब्याच्या बागा लावल्या होत्या. पाच-सहा वर्षानंतर फळबहाराने झाडे डोलू लागली.

रोहिडेश्वराजवळ देशमुख, देशपांडे, वगैरे अठरा पगड जातीचे लोक जमा झाले. दादोजीपण तेथे गेले. राजांची दादाजी नरसूप्रभू गुप्ते, बाजी पासलकर, कान्होजी नाईक जेधे, कोंडाजी कंक, सूर्यराव काकडे, बाजी जेधे, सूर्याजी मालूसरे, भिकोजी चोर, त्र्यंबक सोमदेव तानाजी, बाळाजी व बापूजी नऱ्हेकर व इतर मंडळी होती. दादाजींच्या साथीने या सर्वांनी रोहिडेश्वरजवळ नंदादीपासमोर असलेल्या गाभाऱ्यात जाऊन बेलभंडार वाहून शपथ घेतली. आज तुझ्या प्रेरणेने हिंदवी स्वराज्याची शपथ आम्ही घेत आहोत हा संकल्प सिद्धीस जाऊ देत शंभो, हर हर महादेव अशी गर्जना करून मैत्री अखंड ठेवून दिल्या वचनांत अंतर ठेवणार नसल्याबद्दल शपथ पूर्ण केली. शेंदरीलगतच हे दैवत स्वयंभू आहे.

मग राजांच्या आज्ञेनुसार कामाला सुरुवात झाली. मग काय गडावर गवताचे भारे त्यामागचे निमित्त करून त्यांत हत्यारे दडवून थेट किल्ल्यावर सर्व मंडळी व धारकरी गेले. किल्लेदारास संशय आला. इतक्यात काहींना गडावरच्या माणसांना हत्यार दाखवून किल्लेदारास तोफेच्या तोंडी देण्याचा हुकूम राजांनी दिला. तो घाबरला. राजांना म्हणाला, "गड तुमचाच!" सर्वांनी हत्यारे टाकून देऊन गड

राजांना मोकळा करून दिला. बाळाजी व चिमणाजी न्हेकर – नांदुसकर, दादाजी नरसी प्रभू, गुप्ते हे ३ रोहिडखोऱ्याचे देशपांडे आहेत. गुप्ते, जेधे, तानाजी, येसाजी या मंडळींनी गढीची मालमता, धान्य, शिबंदी यांचा हिशेब केला. आदिलशाहीस पहिला धक्का बसला. भगवा ध्वज रोहिडेश्वर गडावर फडकू लागला. गडावरील जखमी माणसे शिवापूरला वाड्यात हलविली गेली.

राजांचे लक्ष आता तोरणागडावर होते. तो सर करण्याची तयारी करू लागले. लगेच त्यावर स्वारी करून जिंकला पण बांदल देशमुखांनी त्या बंडाळ्याची हकिगत शिरवळला सुभानमंगळ किल्ल्याचा ठाणेदार अमीनला केली. त्याने ती बातमी विजापूरला कळविली. त्यांत दादाजी नरसू प्रभू गुप्ते, रोहीडखांऱ्याचे देशपांडे राजांना जाऊन मिळाला असल्याबद्दल तक्रार गुजरली. इकडे राजांनी तोरणा गडावर दुरुस्तीचे काम काढले. पैशाअभावी काम बंद करण्याची वेळ येते किंवा काय याबद्दल शंका वाटू लागली.

तोच भल्या पहाटे तानाजी गडावर विपुल धन मिळाल्याची बातमी घेऊन आला. मोहरांचे हंडे सांपडले. राजे आनंदित झाले. आता तिन्ही गडांची कामे पूर्ण होण्याची खात्री त्यांना वाटू लागली बंदोबस्तात खजिना वाड्यात आला. पण अंदाज बांधून कामे उभी करण्याबद्दल दादोंजीपंतांनी सांगितले. शस्त्रे खरेदी झाली, बंदुका मोठ्या प्रमाणावर आल्या. विजापूरकरांचे दादोजी नरसीप्रभू यांना फर्मान आले की रोहिडखोऱ्यांत पुंडावा करून गड घेतल्याबद्दल त्यांना विजापूरला दिवाणांत बोलावणे आले आहे.

कारवाई होणार या अपेक्षेने दादोजी नरसी प्रभू पुण्याला लालमहालात आले. तिकडे रोहिडेश्वर, तोरणा आणि रोहिडा गडांच्या दुरुस्तीची कामे उरकत आली. दादोजींचे आता वय झाले होते. बसल्या जागी जहागिरीचा बंदोबस्त ते करीत. आता यापुढे राजांची चढाई कोठे करावी याबद्दल दादोजींनी विचारले असता "कोंढाणा" असे राजांनी उत्तर दिले. त्यावर दादोजींनी त्यांना बारा मावळातील हिशेब दाखविला व सविस्तर तपशील राजांना दिला. पंत एकदम गंभीर झाले. राजांना म्हणाले आम्ही पिकली पानं आज आहे व उद्या नाही. आम्ही थकलो. घ्याल ती माणसं पारखून घ्या. साऱ्यांचे ऐका. मनाला येईल, पटेल तेच करा. पुण्यात आपण आलो त्यावेळी तुम्ही लहान होता. सारा मुलूख बेशिस्त होता. होईल त्या मगदुराने सारं

आटोक्यात आणलं. तुम्हाला घेऊन सारा मुलूख फिरलो. गांवन् गाव, बारा मावळ फिरलो. आदिमाता जगदंबा तुम्हाला उदंड यश व आयुष्य देवो. राजे गहिवरले. पंतांची तब्येत दिवसेंदिवस बिघडत गेली. अन् त्यांचा श्वास मिटत चालला. दादोजींचा अंत झाला (इ. स. १६४७).

• • •

प्रकरण २

सिंहगड, पुरंदर, चाकण, सुभान मंडळ काबीज..., शहाजींना अटक, जावळी खोरे जिंकले.

कोंढाणा किल्ला ताब्यात घ्यायचे ठरले. त्यानुसार तेथील गढकरी मिया रहिम अहमदास हुसकून लावायचे महाराजांनी ठरविले. यानुसार कोंडाणा ताब्यात घेणेची कामगिरी पुणे परगण्याचे हवालदार बापूजी मुद्गल न्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांच्यावर सोपविली... शिवाय ते स्वतः कोंढाण्याच्या दक्षिणेस पसरलेल्या खेडेबाऱ्याचे (नांदोशी) देशपांडेपण असल्याने त्यांना कोंढाण्याची नसन् नस माहिती होती. कोंढाण्याचा हवालदार सिद्दीवाहब हा शहाजीच्या पक्षाचा असल्याने व बापूजींशी त्याचा स्नेह असल्याने सिंहगड किल्ला मिळविण्यासाठी, प्रत्यक्ष तेथे फौज-फाटा व घोडदळ नेऊन सुद्धा, युद्ध करावे लागले नाही. तलवार बाहेर काढावी लागली नाही. शके १५६९ म्हणजे १४ मार्च १६४८ रोजी कोंढाणा महाराजांना मिळाला. (ऐतिहासिक शकावली बाबासो. पुरंदरे पृ. १४४. शककर्ते शिवराय, विजय देशमुख) ग. ह. खरे यांचे ऐ. सं. सा. १/४८ शि. भा. १३/४३-४५, शिचप्र ५५) त्यावेळी महाराजांचे वय फक्त वय १७ वर्षांचे होते. तसा कोंढाणा जिंकून घेणे म्हणजे काय सोपी गोष्ट नव्हती. सहा सहा महिने वेढा घातला तरी किल्ला हाताला येईलच याची खात्री नव्हती. गड ताब्यात आल्यावर राजे बेहद्द खूष झाले. जिजाऊंना अतिशय आनंद झाला.

इकडे मिया रहिम मुहंमद सुभेदार, किल्ले कोंढाणा ताब्यात घेण्यासाठी निघाला. शिरवळ ते कोंढाणा अंतर ३५ किलो मीटर होते. त्याला वाटेतच कोंढाणा घेतल्याची बातमी लागली. ती समजतांच तो चरफडत माघारी वळला. व त्याने अदिलशहाला खबर कळविली. (नंतर ४/२/१६७० रोजी कोंढाणा परत स्वराज्यांत आला. त्याचे नांव सिंहगड ठेवले. इ. स. १६८० ते इ. स. १७०७ पर्यंत २७ वर्षात, १६८४, १६८९, १६९३, १७०३, १७०५, १७०६, १७०७ अशा ८ वेळेस सिंहगडाची मालकी कधी मराठ्यांकडे तर कधी मोंगलाकडे गेली. (म. मं. तेंडुलकर)

बारा मावळांतील विस्तारासाठी राजांनी पुढचे पाऊल उचलले. राजांच्या खेपा रोहिडेश्वर व चाकण येथे होऊ लागल्या. खरे लक्ष होते पुरंदर किल्ल्यावर! त्यामुळे पुरंदराबाबत हात घालणे अवघड होते. त्यांत नीळकंठरावांचा मृत्यु झाला. त्याचे तीन मुलगे संक्राजी, पिलाजी व निळोजी. निळोजी राजेसाहेबांना मानीत होता. पण संक्राजी व पिलाजी त्यांना मानीत नव्हता. ते दोघेजण राजांच्या पाठी लागले. त्या तिघांच्या भांडणांत राजे लक्ष घालू शकत नव्हते. निळोजी आदिलशाहीचे इमानी सेवक. एकंदर परिस्थितीचा विचार करून त्या दिवशी ते पुरंदरावरच थांबले. दुसरे दिवशी गडावर भगवा झेंडा लागला. तिघे भाऊ कैदेत पडले. मग राजांनीच त्यातून मार्ग काढून तिघा भावांना वतन सारखे करून त्यानी गडाखाली वतन संभाळावे असे ठरले. गड मात्र राजांच्याचा ताब्यात रहाणार होता. असा समेट होऊन प्रकरण संपले. तिघा भावांनी त्याप्रमाणे शपथा घेतल्या पुरंदर राजांच्या हाती आला. आता फक्त चाकणचाच किल्ला राहिला नंतर राजे गडाची व्यवस्था पाहून शिवापूरला गेले व तेथून त्यांनी पुण्याला प्रयाण केले.

राजे सदर महालांत होते. बैठकीत खाली बाळाजी, चिमणाजी न्हेकर-नांदोशीकर देशपांडे, तानाजी, येसाजी वगैरे सर्व मंडळी होती. चाकणच्या तयारीसाठी त्यांनी तानाजीला राजे म्हणाले, आपले तीन हजार स्वार झाले पायदळही तसेंच तयार होईल. मात्र घोडदळ वाढविले पाहिजे. कारण शिबंदी तोपर्यंत पूर्ण होणार नाही. तेवढ्यात येसाजी, बाजी, चिमणाजी व बाळाजी तुमचे स्वतःचे घोडदळ व स्वार तयार ठेवा. उद्याला चाकणला जायचे आहे. सर्वजण तयारीला लागले. चाकणचा किल्ला आला. राजांनी फिरंगोजी नरसाळ्याला आल्याची वर्दी हवालदाराजवळ दिली. फिरंगोजी आले. बाळाजी, चिमणाजी, तानाजी, येसाजी पाठोपाठ आले. राजांनी फिरंगोजींना स्वराज्यासाठी चाकणचा किल्ला हवा असल्याबद्दल सांगितले. राजे म्हणाले स्वराज्याचे किल्लेदार बनून गड तुमच्याकडे ताब्यात ठेवा. झाले चाकणही स्वराज्यांत दाखल झाले. तेथेही भगवा झेंडा फडकू लागला. पुरंदरवर कामे जोरात चालू होती. बाजी पासलकरांनी बातमी आणली. येतांना त्यांचा चेहरा चिंतातुर दिसत होता. राजांनी विचारल्यावर ते म्हणाले. शिरवळच्या अमिनाने आदिलशाहाकडे तक्रार केली. त्याने पुरंदराचा बंदोबस्त करण्यासाठी फत्तेखानाला पाठविला आहे अशी बातमी होती. अर्थात् हे एवढे होणारच होते ही राजांची अपेक्षा होती, बाजींना त्यांनी फर्माविले व पुरंदरवर पहिली लढाई खेळायाची जिम्मेदारी त्यांच्यावर सोपविली.

चांगला मुहूर्त पाहून राजांनी बाजी पासलकरांबरोबर पुणे सोडून ते पुरंदरवर आले. गडावर फौजेत मोठा उत्साह संचारला. दारूखाना प्रचंड! अचूक माऱ्याच्या जागा शोधून तोफा दडून ठेवल्या होत्या. नेताजींनी शस्त्रागार उघडले. गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैसेजी चोर, पोळ, घाटगे तसेच बाळाजी, चिमणाजी न्हेकर-नांदोशीकर हे सरदार घोडदळ व पायदळ / धारकरी यासह लढाईची चोख व्यवस्था झाली होती. राजेंनी घोड्यावरून गडाच्या व्यवस्थेची पहाणी करून सरनौबत नेताजी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

इकडे खानाने खळद-बेलसरला तळ दिल्याची बातमी रामोशांनी आणून दिली. एक प्रमुख सरदार बाळाजी हैबतराव याला फौज देऊन पाठविले. शिरवळला आदिलशाहीचे आमिनाचे ठाणे होतेच. तिथवर बाळाजी हैबतराव सैन्यासह येऊन सुभान मंगळच्या गढीत ठाणे वसविले. राजांना ही पण बातमी ताबडतोब समजली.

कावजी मल्हारला शिरवळच्या कोटाची माहिती होती. तो गडाखाली उतरून त्याची फौज सुभाष मंगळ गढीकडे गेली. शिरवळ मोकळे झाले. मग कावजी सैन्यासह तटाला भिडला. भिकाजीच्या मनात तटाला शिड्या लावायच्या होत्या. यात कावजी त्याला म्हणाला कशाला शिड्या? तटाच्या भिंती ताबडतोब फोडा. घोडदळ, पायदळातील प्रत्येकजण हशमांची मुंडकी छेदित होता. सरदार फाजलशहा, अशफशहा हे बाळाजी हैबनरावाबरोबर किल्ल्यांत फिरत होते. तटाचा दरवाजा तेवढ्यांत पडला. खिंडारानून, शिड्यावरून "हर हर महादेव" ची गर्जना करून मावळे गर्जना करून एकमेकावर तुटून पडू लागले. कापाकापी सुरू झाली. घरे/कोठ्या जळून खाक झाल्या, धुराचे लोटचे लोट सुभानमंगळावर उठले. राजांचे सारे सरदार त्वेषाने हालचाल करीत होते. कावजीने बाळाजी हैबतरावाला पाहिले मात्र, त्याने भाला थेट बाळाजीवर रोखला. भाल्यासह बाळाजी आडवा झाला. त्या वार्तेने पळापळ सुरू झाली. प्रतिकार कमी होऊ लागला आणि किल्ला हाती आला. संध्याकाळी गडावर भगवे निशाण लागले. राजांना खबर पोहोचली.

सुभानमंगळावर रात्र झाली तरी खणत्या चालू होत्या. पहाटे लूट गोळा करून कावजी पुरंदरकडे निघाला. लुटीत अनेक घोडे, हत्ती, मौल्यवान अलंकार वस्त्रप्रावरणे, पालख्या, शस्त्रे मिळाली. राजांपुढे ती ठेवली गेली. राजांच्या आनंदाला सीमा राहिली नाही. त्यांना त्यांनी सर्वांना सूचित केले की आता फत्तेखान पुरंदरव

चालून येईल त्याची तयारी सुरू करा. राजांची बातमी खरी होती. खरोखरच फत्तेखानाची फौज पुरंदरच्या पायथ्याशी आलीसुद्धा. त्याचे सैन्य गड चढू लागले.

शत्रू बाणांच्या टप्प्यांत येताच तोफांचा मारा सुरू झाला. घाटगे-निंबाळकर सरदार नियत्रंण ¨ारीत होते तटावरून इतर सरदार येसाजी, भिकाजी, चिमणाजी-बाळाजी हे गडा रून खालच्या सैन्यावर मारा करीत होते.

बाजी पासलकर गडाखाली आले. त्यांना आलेले पहातांना सर्व मराठ्यांना चेव चढला. आदिलशाही सैन्यावर सर्वजण तुटून पडले. गोदाजी जगतापने भाल्याने मुसेरखानावर हल्ला केला. मुसेरखान सुद्धा लढवय्या होता, त्याने अंगात शिरलेला भाला उपसून त्याचे दोन तुकडे करून फेकून दिले. त्यांतच गोदाजीने तलवार मुसेरखानाच्या खांद्यावर वेगाने उगारली. खान रक्ताच्या थारोळ्यात पडला. ते पहाताच उरले सुरलेले सैन्यहि पळू लागले. फत्तेखान जीव खाऊन माघारी जाऊ लागला. बेलसरच्या छावणीतील मावळ्यांनी खानाच्या सैन्याला रेटले. त्यांत बाजी **पासलकर कामास आला.** सैन्य गडाच्या पायथ्याला आले. राजाची फत्ते झाली.

सर्व सरदारांची, मावळे लोकांचे हे शौर्य पाहून राजांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. परंतु या आनंदाबरोबर बंगळूरहून शहाजी राजांकडून खलिता आला. मुधोळच्या बाजी घोरपडे व इतर मोगल सरदार यांनी शहाजी राजांना बेसावध असतांना अटक करून बेड्या घालून दरबारी हजर केले. नंतर त्यांना कैदेत ठेवले गेले.

त्यावर राजांनी निलोजी पंतांना शहाजाद्यांना खलिता पाठविण्यास सांगितले. त्यांची चाकरी करण्यास आम्ही धन्यता मानू. हे कळवा. आदिलशाहीने अकारण आमच्या वडिलांना कैद केल्यामुळे आम्ही संकटांत पडलो, नाहीतर खुद्द जातींने शहाजाद्यांच्या दर्शनाला आम्ही आलो असतो, असं लिहा. खातरजमेचं पत्र येताच आम्ही दर्शनाला येऊ असं कळवा.

अमात्यांनी त्याप्रमाणे रातोरात खलिता काढून तो अहमदाबादला पाठविला.

यावर उपाय म्हणून शहाजीराजांनी कोंडाणा किल्ला विजापूरला देण्याबद्दल राजांना सुचविले. त्यामुळे अदिलशहा आणखी कारवाई करेल अशी भीती होती. सुदैवाने तसे काही घडले नाही. शहाजींची सुटका झाली. कान्होजी जेधेपण सुटले.

राजांना कान्होजी भेटणार असे समजल्यावर राजांना आनंद झाला. शहाजीराजांनी कान्होजींना राजांच्या सेवेतच सेवा करावी असा आदेश दिला. कान्होजी जेधे

रोहिडखोऱ्यास गेले. भोसले घराण्याचे कुलदैवत फलटण जवळच असलेले निसर्ग सुंदर "शिखर शिंगणापूर" शंकराचे ते जागृत देवस्थान आहे. राजांनी शिखर शिंगणापूरची मोठी तयारी सुरू केली होती. स्वार, सामान पुढे गेले. मेणे/पालख्या तयार झाल्या राजे, राणीसाहेब सईबाई, लेक सखुबाई वगैरे वाटचाल करू लागले. बरोबर येसाजी, तानाजी, शिवा, बाळाजी व चिमणाजी हेही लोक होते. विधिपूर्वक सर्वांचे दर्शन झाले. तेवढ्यांत बाळाजी निंबाळकर राजांना भेटले. त्यांची मुस्लीम बायको विजापुरी मरण पावली व पूर्वपत्नी सावित्रीबाई फलटणला वारली. लेक मल्हारजी फलटणला होता. राजांनी विधिपूर्वक त्यांना हिंदुधर्मात घेण्याची क्रिया शास्त्रोक्तरीत्या पार पडली. पुण्याला आल्यावर सखुबाईना आनंद झाला. राजांनी स्नेहभोजनाचा बेत केला. रात्री पंगतीला अपूर्व शोभा होती. रांगोळ्या घातल्या. सर्वत्र धूपाचा वास दरवळत होता. राजे, बजाजी, म्हादाजी व नेताजी मंडळी बसली व दुसरीकडे बाळाजी, चिमणाजी नांदोशीकर पाटील अशा ब्राह्मणमंडळी बसली होती. महादजी व सखुबाईचा विवाह उत्तम तऱ्हेने पार पडला.

आता जावळी खोऱ्यावर चढाई करण्याचे ठरले. पुरंदरवर निवडक फौज गोळा होऊ लागली. रघुनाथ बल्लाळ कोरडे यांना राजांनी हेजिबीस मोऱ्यांकडे पाठवले. बरोबर सुमारे दीडशे धारकरीही पाठविले. राजांना कळून चुकले की चंद्ररावांस मारल्याशिवाय राज्य न साधते. ज्याच्या हाती जावळी त्याचांच सत्ता वाई प्रांतावर कोरड्यांना आज्ञापत्र मिळले. ते ताबडतोब मोर गढीत प्रवेश करते झाले. म्हणाले "राजे, मी वारंवार तुम्हास कळवीन. बेत ठरला की बेलाशक फौज जावळीवर पाठवा.

कोरडे मोऱ्यांचे वाड्यांत आले. बातमी गेली की "शिवाजीचा वकील येतोय." कोरडे व संभाजी कावजी म्हणाले "मी रघुनाथ बल्लाळ कोरडे" शिवाजी राजांचा चिटणीस. कोण राजे?... मोरे. "येथे राजे म्हणजे आम्हीच" मोरे. "ते आपण म्हणू शकता. आम्ही नाही. शिवाजी राज्यांच्या कृपेमुळेच आपण मोऱ्यांच्या गादीवर दत्तक गेलात. चंद्रराव किताब मिळाला. हे कृपा करून ध्यानी घ्यावं." "मोठे उपकार आहे शिवाजीचे! येवढी ताकत होती तर तेच का गादीवर बसले नाहीत?"

संभाजी कावजी व **चिमाजी बापूजीचा** हात लगेच तलवारीकडे वळला. पण कोरड्यांनी इशारा करून त्यांना थोपविले.

रघुनाथांनी दुसरा डाव मोऱ्यांना सुनावला. ते म्हणाले. भोसले सोयरिक करू इच्छितात. मग आमचे कारभारी यशवंतराव आहेत त्यांच्या मुलीशी विचार करा. योग्य पायरीनेच सोयरिक हवी.

कोरडे यांना त्यांच्या अहंकाराबद्दल तिटकारा आला. ते एकदम कडाडले. संताप आवरेना. सारे चपापले. रघुनाथपंत मोऱ्यांना म्हणाले "फार ऐकलं चंद्रराव एकेवेळ संधी दिली होती. ती तू गमावलीस! या सर्व जावळीभोवती सर्व बाजूंनी माझ्या फौजेने वेढा घातला आहे.

हनुमंतराव मोऱ्यांनी रघुनाथपंतावर तलवार उपसली, तेवढ्यात मागे असलेल्या संभाजी कावजीने त्यांच्यावर वार केला. हनुमंतराव कोसळले. संभाजी, चिमणाजी, रघुनाथपंत वगैरे कापाकापी करीत वाड्याबाहेर आले. जावळीच्या चारी बाजूंनी "हर हर महादेव" ची आरोळी उठून रणकंदन सुरू झाले.

मोऱ्यांच्या वतीने वाड्याबाहेर एक मर्द तलवार शर्थीत चालवीत होता. त्याच्यापुढे सर्वांची हार होत होती. पण त्यांना वाटेला पकडण्यात आले. ते होते "**मुरारबाजी देशपांडे.**" राजांनी जावळी जिंकली. यशवंतराव बायका मुलांसह रायरीस पळून गेला. पकडलेल्या मुरारबाजींना राजापुढे नेले असता राजांनी त्यांची तारीफ केली. म्हणले तुमचे शौर्य पाहिले. अशी जुनी माणसे आम्हाला हवीत. झाले मुरारबाजी राजांना मिळाले. जावळी खोऱ्यात सर्वात मोठे यश हे होते.

◆ ◆ ◆

कल्याण - भिवंडी सर - अफझलखानाचा वध

राजांची फार दिवसाची इच्छा पूर्ण झाली. चांभारगड, सोनगड, चंद्रगड, कांगोरी, सोनगड, मकरंदगड हातात आले. जावळीच्या समोर उभ्या असलेल्या भोरप्या डोंगराकडे राजांचे लक्ष गेले. मोरोपंत पिंगळे यांना म्हणाले "मोरोपंत! तुम्हास गडाची चांगली माहिती आहे. असे आम्ही ऐकिले आहे. राजांची कल्पना शक्ती इतकी विलक्षण की वरील येवढे संरक्षक गड जावळीभोवती असतांना, भोरप्या येथे नवीन गड बांधण्याची कल्पना ऐकून मोरोपंताना आश्चर्य वाटले. कारण त्यांच्या मनांत तोच विषय होता, यशवंतराव रायरीवरून पळून गेल्याची बातमी राजांना मिळाल्यावर कान्होजी जेधेंनी त्यांना पकडून राजांपुढे हजर करून जेरबंद केले. तरीही त्यांची मुजोरी कायम होती. राजांनी लगेच त्यांची गर्दन मारून जावळी-रायरीची व्यवस्था लावून राजे पुण्यास परतले.

सुप्याची वतनदारी शहाजीची होती. तिमाजी कुलकर्णी यांचेकडे होती. संभाजी मोहिते (राजांचे सावत्र मामा) यांनी तिमाजीचा छळ करून त्याचे वतन जप्त करून वतन भावांना दिले. मोहिते सुप्याचा कारभार बेलगामपणे करीत होते. हे शहाजीराजांचे मेव्हणे होते. त्यांचेबद्दल बऱ्याच तक्रारी आल्या व राजांना ते मानीत नव्हते. राजांनी कुलकर्णी यांना अभय दिले. मोहित्यांची दादागिरी कमी झाली नाही. राजे उत्तरले, "सुप्याची वतनदारी आम्ही जप्त केली आहे. तुम्ही बंगलोरचा रस्ता सुधारावा. सुप्याची गढी (कडेपठार) हस्तगत झाली.

त्यानंतर राजांच्या आज्ञेनुसार रघुनाथ बल्लाळ अत्रे दाभोळ ऊर्फ मुस्तफाबाद बंदरावर चालून गेले. अत्र्यांनी विजय मिळविला. मुस्तफाबादच्या बंदरावर आणि आजूबाजूच्या किल्ल्यावर भगवे झेंडे फडकू लागले. विजयाची बातमी गडावर येतांनी राजांनी डबीर सोनोपंत यांना औरंगाबादेस पाठविले. शहाजाद बिथरला होता. परंतु त्याबद्दल एक अक्षरहि औरंजेबाने लिहिले नाही फक्त जिंकलेल्या दाभोळ पट्टीला

मंजुरी दिली. हे बरोबर न वाटल्याने, त्यांनी जुन्नरवर फौज पाठविला. जुन्नरच्या पागेतील अस्सल जातिवंत शेकडो घोडी पागेत होती. ठाणबंद होती. ती राजांना मिळाली. तीन लक्ष होनांची मत्तापण मिळाली. त्याखेरीज कापड, जडजवाहिर वगैरे जिन्नसांचा समावेश होता. ती घेऊन राजे चाकणला आले. सर्व चीजवस्तू चाकणला ठेवून ते पुण्याला परतले.

राजांना पुत्ररत्न झाल्याचे कळतांच ते पुरंदरास गेले. मुलाचे नांव "संभाजी" ठेविले. इकडे कल्याण भिवंडीवर चढाई करण्याचे ठरले. चोहोबाजूंनी हल्ला करण्यात आल्यावर कल्याण-भिवंडी सर झाली. सुभेदार मुल्ला अहमदला गिरफदार केले गेले. गडांवर भगवे झेंडे फडकू लागले. मोठा खजिना मिळाला. त्याशिवाय जडजवाहिर, सुवर्ण-रौप्यनाणी, अनेक अलंकार, रत्नांचे ढीग यांची राजांच्यासमोर मोजदाद झाली. कल्याणच्या सुभेदारांची सून मात्र इतमामाने विजापूरला पाठविण्यांत आली.

तिकडे औरंगजेबाला शिवाजीच्या एकामागोमाग विजयाने त्याचे पारिपत्य गंभीरपणे घेण्याची जरूर वाटली. अफजलखानाने ती जबाबदारी घेतली. तुळजापूरला पोहोचल्यावर खानाने ते लुटण्याचा हुकूम दिला. तुळजाभवानी दैवताचे तुकडे तुकडे केले. गांव बेचिराख करून टाकले. देवीसमोर गाय मारली. खानाचा राग शांत झाला.

तिथून त्याने पंढरपूरला कूच केल. खानाच्या हालचालीची बातमी दररोत राजांकडे पाहोचती केली जात होती. पावसाळ्यात खान जरी आला तरी वाईला पावसाळा तोपर्यन्त येईल. तो संपेपर्यंत त्याला काही हालचाल करता येणार नाही. राजांनी फिरंगोजीला तूर्त चाकणला जाऊन गडाच्या बंदोबस्तासाठी शिबंदी ठेवावयास सांगितली व उरलेल्या जादा शिबंदीसह इकडे येण्याबद्दल सोनोपंतांना अशाच आज्ञा सर्व गडावर पाठविण्यास सांगितल्या. दुसऱ्या दिवशी शिवापट्टमचा मुक्काम राजगडावर हलला. तेथेहि गडावर खानाच्या हालचालीच्या बातम्या येत होत्या. तेवढ्यांत पंढरपूरला जाळपोळ व त्याने तेथे लुट केल्याचे कळाले. कान्होजी जेधे व त्यांचे पुत्र एकदम तडकाफडकी गडावर येऊन राजापुढे बादशाही फर्मान दाखविले. त्यांत असा हुकूम होता की,

राजांनी कोकणांतील मुसलमान लोकांस त्रास देऊन पातशहाचे कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. त्याचे पारिपत्यासाठी अफझलखानास नेमले असून शिवाजीचा पराभव करून त्याचे साथीदारांय ठार मारावे व आदिलशाहीचे दौलतीचे कल्याण चिंतावे. त्याप्रमाणे न केल्यास परिणाम चांगला होणार नसल्याबद्दल फर्माविले होते. राजांच्या सरदारांनी त्यांना पूर्ण सहकार्य द्यायचे ठरविले. जसे कान्होजी जेध्यांना बादशहाने धमकाविले; तसेच खानाने पंढरपुरावरून येत असताना वाटेवर असलेल्या बजाजी निंबाळकरांना कैद केले. वास्तविक त्यांचा कसूर नसताना ते केवळ राजांचे मेव्हणे होते म्हणून त्यांना हत्तीच्या पायाखाली दस्त करण्याचे ठरवून त्यांना मारण्याचे ठरले. त्या बातमीने सईबाई खचल्या. मग राजांनी पांढरे नाईकांना पत्र पाठवून त्यांना गळ घातली. पांढरे हे शहाजीचे खास मर्जीतले सरदार. शेवटी खान साठ हजार होनांना राजी झाला. बजाजींनी तेवढे कर्ज काढून खानाला भरले व तुरुंगातून अखेर ते सुटले.

बाजी प्रभू देशपांडे यांना मोहनगड मजबूत करण्याची आज्ञा दिली. पाऊस उघडल्यावर राजगडच्या संजीवन मार्गावर तोफा चढवायचे अवघड काम होते. पावसाने ओल्यामार्गात चाके रुतत होत्या. एक तोफ अडकली सुद्धा. राजे समक्ष पहात होते. तेवढ्यात संभाजी कावजी खाली सरला. चाक अलगद ताकदीने उचलून तोफगाडा वर ओढला. तोफ वर गेली.

शिवापूर आणि राजगड सरदारांनी व मावळ्यांनी भरून गेला. फिरंगोजीच्या ताब्यात तो देऊन राजे जावळीकडे गेले. बाकी सर्व मंडळी राजगडवर होती. जावळीला मोरोपंत पिंगळे यांनी सर्व खोरे व प्रतापगड सुसज्ज करून ठेविला होता. कल्याण जिंकल्यावर तेथील तोफा इथे उपयोगी पडल्या त्यांचेच मोर्चे लावून ठेविले होते. प्रतापगडावरून कोसभर अंतरावर वाई होती. तेथूनच खान नक्की येणार होता हे राजांना पक्के ठाऊक होते.

सईबाईंची प्रकृती फारच बिघडली. राजे व्यथित झाले. सईबाई अखेरच्या क्षणाला पोचल्या. जिजाबाईंना ते म्हणाले "राणीसाहेब आम्हाला सोडून गेल्या" सर्वांना हळहळ वाटली. नवरात्र सुतकातच गेली. दसरा उजाडला.


खान वाईला आला. हेरांनी बातमी आणली. कृष्णाकांठी खानाचा तळ पडला. राजांना तेवढ्या दुःखातही जबाबदारीची जाणीव होती. गडांकडे या अगोदरच तयारी पूर्ण केलेली होती. घोडदळ, पायदळ, तोफा, सरदार, मावळे सर्वजण तयारीतच



रघुनाथ बल्लाळ कोरडे यांनी जावळी येथे फौज घेऊन स्वत: लढाईत भाग घेऊन हनुमंतराव मोरे यांना ठार केले. प्रतापराव मोरे विजापुरास पळाले.



पुणे जिल्हा- हवेली तालुका, सिंहगड. शके- १५६९ इ.स. १४/३/१६४८, बापूजी मुद्गल, नांदोशीकर-देशपांडे यांचे स्वतःचे घोडदळ असूनसुद्धा रक्तपात न करतां सिंहगडावर किल्ला सिद्धी वहाब या किल्लेदारापासून ताब्यांत घेतला.




कात्रज घाट व सिंहगड किल्ला दोन्हीकडून सैन्याची कुमक आंबील ओढ्याजवळ भेट. (चिमाजी बापूजी व बाळाजी बापूजी)




पुणे-लालमहाल-शाईस्तेखानावर हल्ला- शके १५६९ इ.स. १६६३ चिमणाजी बापूजी व बाळाजी मुद्गल (नांदोशीकर-देशपांडे)
नेताजी पालकर व छत्रपति शिवाजीमहाराजांबरोबर



कात्रज घाट येथे गाई व बैलांच्या शिंगांना दिवट्या बांधून मुघल सैन्याची रात्रीची दिशाभूल करण्यासाठी केलेला प्रयत्न



सुरत लढाई (पहिली) १६६४ संताजी बोबडा, परसोजी महाडीक, नारो बापूजी व चिमणाजी बापूजी हे सरदार लोहगाव मार्गे येतांना वडगाव (मावळ) मार्गे पुण्यापासून ३१ कि.मी. मोगल सरदार मुकुंदसिंग रजपूत वडगाव मुक्कामी तीर लागून घोड्यावरून खाली कोसळले.




नारो बापूजी मुदगल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांच्या समाधीची आतील बाजू ६०"X ६०"
झाडांच्या मुळ्या समाधीच्या आतपर्यंत गेल्या आहेत



नारो बापूजी मुद्‌गल-नऱ्हेकर-नांदोशीकर देशपांडे यांच्या समाधीचे घुमटाकार छत



नारो बापूजी मुद्गल-नऱ्हेकर-
नांदोशीकर देशपांडे यांच्या
समाधीचे बाहेरून
दिसणारे दृश्य
सुरतेची पहिली लढाई



नारो बापूजी मुद्गल
-नऱ्हेकर-नांदोशीकर
देशपांडे यांच्या
समाधीचे बाहेरून दिसणारे
दृश्य सुरतेची पहिली लढाई

होते. राजांनी सोनोपंत डबीर यांना बोलावून घेतले. राजांनी खानाला विरोध न करतां सामील व्हायचा हुकूम सोनोपंतांना रुचला नाही. सोनोपंत म्हणाले राजे एवढी आपण तयारी केली ती काय फुकट गेली?

पण राजांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे भाकीत बरोबर होते. खानाने शिवाजीचा प्रदेश बळकाविला. खानाचे सरदार सगळीकडे धुमाकूळ घालूं लागले. जाधवाने सुपे प्रांत काबीज केला. पांढऱ्याने शिरवळला ठाणे दिले. खराट्याने सासवडला तर हिलालाने पुण्यात तळ दिला व हबशी सैफखानाने तळ कोकणांत ठाण दिले. खानाला कोणीच विरोध केला नाही. त्याचे सैन्य मुलूखाची लूट करीत होते. विध्वंस करीत होते.

तरीदेखील खान जावळीत शिरेपर्यंत कोठेहि लढाई करू नये असे राजांना वाटत होते.

खानाशी युद्ध म्हणजे राजांचा पराभव हे सर्वांनाच वाटत होते. कारण खान पुऱ्या तयारीनिशी आला होता. सारेजण बेचैन होते. फिरंगोजीने तर राजांना तह करण्याबद्दल सुचविले. परंतु राजांच्या मते सल्ला करणे योग्य नव्हते. युद्ध करून मारता मारता जे होईल ते करण्याचे ठरले.

सर्वांना पुढील कार्यक्रम कसा रेटीत न्यावा असा विचार पडला. परंतु काय कोण जाणे राजेच अचानक म्हणाले की देवी दृष्टांतानुसार अफजलखान तुझ्याच हस्ते मरणार. यश तुझेच आहे. भिऊ नको. आता मनात तर इतर विचारसुद्धा येणार नव्हता.

विजयी होऊन परत या!

आणि राजेसाहेब गडावरून खाली उतरले. चौकी, पहारे, मोर्चे व सैन्याची तयारी पाहणी करून, जावळीच्या प्रतापगडावर आले. मोरोपंतांनी गडावर सुंदर पण छोटेखानी वाडा बांधला होता. जेव्हा प्रथम प्रतापगडावर आले होते त्यावेळेस अतिमनोहर असे शिवलिंग सापडले होते. मग त्याची स्थापना सदरेसमोर करून सुंदर देवालय बांधले. त्याचे दर्शन घेऊन वाड्याचा बंदोबस्त सुद्धा तपासला. कान्होजींनी शब्द दिल्याप्रमाणे लगतच्या भागातील देशमुख, देशपांडे, शितोळे, खोपडे, गायकवाड, डोहार, मारणे, कोंडे, मरळ, शिळमकर सारे हजर झाले. सर्वांनी

बेलरोटीची शपथ घेऊन राजनिष्ठा व्यक्त केली. फौजेचा विस्तार दहा हजारापर्यंत वाढला होता. पायदळासाठी प्रशस्त मैदान होते.

राजांनी पंताजी गोपीनाथांना खानाकडे पाठविले. बरोबर खानाचा वकील कृष्णाजी भास्करपण होता. खानाकडून आलेल्या पत्राचे उत्तर पंतांनी विदित केले. मागील अनुभवांचा विचार करून राजांनी खानाच्या समोर काय काय घडले ते सविस्तर सांगितले. व त्यात खानाचा शुद्ध हेतु असेलच अशी खात्री नसल्याबद्दल सांगितले. राजांना कैद करून विजापुरास यावे असा खानाचा विचार आहे. पंत म्हणाले की खान लोभी आहे, त्याचा फायदा घेऊन एकांती एकांगी करून मारावा, लष्कर लुटावं व राज्य आपले करावं राजांना पंतांचा विचार पटला.

जावळीचा आलेख समोर होता. जावळी खोऱ्यातील महत्त्वाच्या अचूक ठिकाणावर निरनिराळे सरदार ठेवले होते. "पार" गांवाजवळ कोयना खोऱ्यातील धारकऱ्यांच्या गुप्त व प्रकट चौक्या ठेवल्या. खानाने आपल्या माणसांना तळाची जागा जावळीजवळ न्यायला सांगितली. त्याचबरोबर दहा-पंधरा हजार स्वार, तोफखाना, पायदळ, बुतरनाला, बाणाचे उंट च जेजाले होते. जंगली व डोंगराळ प्रदेशातून येवढा कबिला चढविताना व जावळी खोऱ्यात उतरवितांना खानाच्या नाकी नव आले.

प्रचंड लष्कर व त्यांत रडतोंडीचा घाट. प्रवास जिकिरीचा होता. पुढे छावणीवर मात्र त्याचे हाल झाले नाहीत. हत्ती, उंट व तोफगाडे व्यवस्थित ठेवले गेले. त्यात राजांनी शेकडो बिगारी लावून खानाच्या लष्कराला काही उणीव भासू दिली नाही. मोठा बाजारपण तेथे भरला. राजांचे सैन्य चहूबाजूंनी वेढले गेलेले असल्याने खानाचे सैन्य कोंडीत पडल्यासारखे झाले. दोन्ही बाजूंचे वकील एकमेकांकडे खेपा घालून भेटीच्या अटी ठरूं लागल्या. खानाने भेटीच्या जागी यावे. राजांची वाट पहावी. दोन्ही अंगास दहा-दहा सैनिक बाणांच्या टप्प्यावर ठेवावेत. दोघांतही अटी मान्य झाल्यावर दिवसआड भेटीचा दिवस ठरला.

प्रतापगडच्या मोहीमेच्या वेळी कसलेला योध्या काय करतो हे कवी परमानंद म्हणतात पायदळ / घोडदळ शिपायांच्या पांच सेनापतींची नांवे म्हणजे (१) कान्होजी साळुंके, (२) गायकवाड, (३) येसाजी कंक, (४) बापूजी मुद्‌गल् (५) नेताजी

पालकर यांनी ठेवून नाकेबंदी करून, शत्रूवर योग्य वेळी चाल करून मोहिम फत्ते केली.

बापूजी मुद्‌गल् यांचा मुलगा नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे जो पांच हजार सैन्याचा सेनापती आहे. मोरोपंत पिंगळे हे कोकणातून येऊन जय्यत तयारी करतात व युद्धमंडळ तयार करतात व त्यांना निवडक माणसे तैनात केली होती. सोबतच्या नकाशा पाहिल्यास तीस माणसांचे युद्धमंडळ नेमले होते व त्यांतील सरदार, स्वतःच्या प्राणांची बाजी लावून आहुती देण्यास सज्ज होती.

वाडीचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे, दाभोळचे दळवी व जंजिऱ्याचा सिद्धी खानास त्या काळांत मिळणार नाही याची पुरती खबरदारी देण्यांत आली होती. म्हणूनच सुर्वे व दळवी त्यांच्याशी तात्पुरता तह केला होता व मोरोपंत पेशव्यास व नेताजी पालकर यांना पारघाटांत व ढवळा घाटाजवळ महाराजांनी त्यांना ठेवले होते. तसेच त्या मुलुखाच्या माहीतगार रघुनाथ बल्लाळ कोरडे याला नेताजी पालकरांबरोबर दिले होते. कोपीच्या टोकाखाली त्रिंबक भास्कर, मोरोपंत पिंगळे व श्यामराजपंत कुमठे, पार व शिवाचे टोक अडवून ठेवल्यामुळे कोणांसी शत्रूला कोकणांतून घाटावर येण्याकरितां निर्वेध असा मार्ग ठेवला नव्हता. मार्गावरील मोठी झाडे तोडून शत्रू सैन्याचा इतरहि मार्ग बंद करण्यांन आले. रडतोंडीच्या घाटाने खानाची फौज जावळीकडे जातांना त्याच्या सैन्याच्या खूप हालअपेष्टा झाल्या. त्यांत जनावरे, घोडे, अवजड तोफा, सामानाचे पेटारे, धान्य-वैरण घेऊन सह्याद्री ओलांडायची दुर्बुद्धि खानाने केली. सिंहेच्या गुहेत फौजफाटा जात राहिला.

सिंह चाल करून हत्तीचे गंडस्थळ फोडतो त्याप्रमाणे त्या सर्वांची गत झाली. युद्ध सुरू झाले. खानाच्या फौजेची दाणादाण हेऊन खानाचे घोडदळ, द्रव्य, सामान शिवाजी महाराजांच्या हाती लागले. खानाचे सैन्य बरेचसे कापाकापीत मेले. येसाजी कंक, इंगळे, कखर, काटके, सिद्धी इब्राहिन, कमलोजी साळुंके, रामजी पांगरकर, नारोपंत-नांदोशीकर-देशपांडे, पंचहजारी, सेनापती यांनी शत्रूसैन्यास यमसदनास पाठविले. परंतु महाराजांकडील **बाबाजी भोसले, श्यामराव पद्मनाभी इ. सरदार व १७३४ सैनिक युद्धात कामी आले.**

अफझलखानाची आणि महाराजांची भेट झाली. पंताजी गोपीनाथ व कृष्णाजी भास्कर शिवाजी महाराज व अफझलखान ह्या दोघांनाच समोरासमोर ठेवून दोघेही

अदब ठेवून बाजूला झाले. खानाने आपले विशाल बाहू पसरून राजांना मिठीत घेतले. जमदाड उपसून राजांच्या पाठीत खुपसली. राजांच्या कुडता फाडीत गेली. तोच राजांनी बिचवा खानाच्या उजव्या बगलेत तीव्रपणे भोसकला, खानने वेदनेने तीव्र किंकाळी मारली. 'दगा, दगा' तेव्हांच संभाजी कावजी व जिवा महाला आत घुसले. त्यांनी आंत येणाऱ्या खानाच्या रक्षक सय्यद बंडावर घाव घालून त्याचा हात पट्ट्यासह तोडून टाकला. दुसरा वारकरून सय्यद कोसळला. तदवत् संभाजी कावजीने तलवारीने खानाच्या छातीत वार करून त्याला संपविले. कृष्णाजी भास्कर शिवाजीवर चालून येताच नाईलाजाने त्यांना ठार करणे भाग पडले. कृष्णाजी गतप्राण झाले.

झाडीत बसून राहिलेले वीर तयारीत होते. त्यांनी भीषण हल्ला करून राजांना शामियान्याच्या बाहेर काढले. राजांच्या हातात भवानी तलवार जिवाने दिली. ते घोड्यावर स्वार झाले, संभाजी कावजीने खानाचे मस्तक धरून आणले होते. सर्वजण स्वारांनिशी गडावर पोहोचले.

ज्या म्लेंच्छाने आमच्या कुलदैवतास उपद्रव दिला, त्याचे मस्तक इथे राजगडावर ठेवा. सय्यद बंडा जेथे पडला तेथे त्या जागी विजापूरच्या सेनापतीचे यथोचित दफन करा.

राजे प्रतापगडावर आले. दरबार भरविला. जखमी झाले. त्यांना दौलत वाटली. पराक्रम गाजविणारांचा सन्मान केला. या मोहिमेत ५ हत्ती, चार हजार घोडी, बाराशे उंट, शेकडो तोफा, उंची कापड, जडजवाहीर व अगणित संपत्ती मिळाली.

राजांनी वरील विजय संपादन केल्यावर प्रतिस्पर्ध्याकडून हालचाल होईल या अपेक्षेवर पन्हाळ्याच्या मोहिमेवर जायचे ठरविले. तेव्हा सर्व सैन्याला वाईला जमा व्हावयाचे आदेश दिले गेले. त्यानुसार राजांची विजयी फौज वाईला गोळा झाली होती. जावळीतील लढाईतील वस्तू वाईलाच एकत्रित ठेवल्या होत्या. हजारो घोडदळ हजारो पायदळ शिस्तीने हजर होते. शाही शामियातून डेऱ्यांपर्यंतचे छावणीचे सर्व सामान हाती आले होते. हजारो उंट, शेकडो हत्ती, सामान वाहतुकीच बैल, गाडे, पालख्या, मेणे, अंबाऱ्या हौदे, असे नानाविध सामान उभे होते. त्यावर स्वतंत्र अधिकारी देखरेख करीत होते.

सेनापती नेताजी पालकर आले. राजांनी त्यांना मानवस्त्रे दिली व सन्मान केला. खानाचे सरदार जाधवराव, पांढरे, खराटे, सिद्दी हिलाल शरण आले होते व राजांच्या दर्शनाला नेताजीबरोबर आले होते. मात्र फाजलखान व खंडोजी खोपडे पळून गेल्यामुळे मात्र राजांना वाईट वाटले. शरणागत आलेल्या सर्वांना राजांनी आपल्या सैन्यात दाखल करून घेतले.

राजे पंतांना म्हणाले, पुणे, इंदापूर, चाकण, सुपे, बारामती या भागातील हिंदू व मुसलमान यांना जी इनामे अफझलखानाच्या पूर्वीपासून आहेत ती तशीच चालू राहू द्यात, मात्र राजांच्या मुलखाला जो उपद्रव त्यांच्याकडून झाला त्याची भरपाई आदिलशाही मुलखातूनच व्हावयाय पाहिजे अशी ताकीद दिली.

◆ ◆ ◆

प्रकरण ४

पन्हाळा काबीज - कर्नाटक मोहीम - शाईस्तेखानावर हल्ला - बाळाजी - चिमणाजी मुदगल नांदोशीकर देशपांडे यांचे शौर्य

राजांनी पन्हाळावर चढाईचा बेत ठरल्याचे नेताजी पालकरांना सांगून त्याप्रमाणे शिबंदीला हुकूम देण्यास सांगितले. चंदनवंदन किल्ल्याची नाकेबंदी करून राजांच्या फौजेने वाई प्रांत व्यापून, दक्षिणेकडे खटाव, मायणी, वाळवे, कऱ्हाड या भागात खंडणी वसूल केली. तेथून सुपे जोडून तोरणा किल्ले पर्यतचा सर्व भाग राजांनी घेतला. एका मागोमाग एक असे विजय संपादन करून राजे कोल्हापूरला आले. नंतर फौज पन्हाळ्याचे दिशेने गेली. तोफांचे मोर्चे लागले. मावळे तटाला शिड्या लावून आजूबाजूला धारकऱ्यांनी कापाकापीस सुरुवात केली होती. गडाचे दरवाजे उघडले गेले अन् मराठी फौजेने "हर हर महादेव" ची गर्जना केली. पन्हाळा काबीज आला. तेवढ्यांत रात्र झाली. तरी राजांनी गडावर चढण्यास सुरुवात केली. चार दरवाजा, तीन दरवाजा, वाघ दरवाजा आणि राजदिंडी अशी दरवाजांनी, गडाची प्रवेशद्वारे रोखली होती. सज्ज कोठी, कलावंतिणीचा सज्जा, पंचवीस हजार खंडी धान्य साठेल असा अबरखाना, अनेक मंदिरे, मुबलक पाणी एवढे पाहिल्यावर राजांना गड जिंकल्याचे समाधान झाले.

विजापूरला या सर्व बातम्या पोहोचल्यावर आदिलशाही घाबरून गेली. त्यांची शिवाजीवर दुसरी मोहीम पाठविली. त्यात वाईवरून पळून गेलेला अफजलखानाचा मुलगा फाजलखान सूड घेण्याच्या विचारांत होता. आदिलशाहीचे सरदार सादमखान, फत्तेखान, संभाजी घोरपडे, सर्जेराव घाडगे हेहि त्या मोहिमेत सामील झाले होते.

राजांनी या संकटावर मार्ग काढण्यासाठी पुणे भागातील नवे सरदारांनाहि तातडीने बोलविले. शत्रूचे सैन्य आल्यावर नेताजीनी फाजलखानावर व राजांनी रुस्तुरजमासाठी असे दोन विभाग केले. कोल्हापूरनजीक सैन्य समोरासमोर उघड्यावर होते. त्यात राजांना विजय मिळाला. आदिलशाहीचा दुसरा पराभव झाला.

आता तिसरी मोहीम कर्नाटकाकडे आखण्यांत आली. नेताजी पालकरांना त्यांच्या तीन हजार घोडदळासह विजापूरलगतचे तिकोटे, दक्षिणेकडील हुक्केरी, गोकाक येथपासून गदग लक्ष्मीश्वरापर्यंत जाऊन खंडण्या गोळा केल्या.

दुसरे दिवशी बाजी प्रभू देशपांडे राजांना भेटले. त्यांनी पन्हाळ्यावर हालचाली कशा कराव्यात याबद्दल त्यांची कल्पना राजांना दिली. तेथून विशालगडावर १५ कोसांचे अंतर कसे पार पाडावयाचे याबद्दलही चर्चा झाली.

खरे शिवाजी राजे पळून गेले राजांनी विशालगडावर राजापूरच्या घोडाखिंडीजवळ येऊन पोहोचले सुद्धा समोर सुर्वे व जयवंतसिंग वेढा देऊन होते, मात्र मसूरची फौज वेगाने पाठलाग करीत येत होती.

बाजी प्रभू राजांना म्हणाले तुम्ही पुढे निघा. मी शत्रूला खिंड ओलांडू देत नाही. राजांना गडावर गेल्यावर इशारतीची तोफ देण्यास सुचविले. "हर हर महादेव" ची गर्जना करून बाजीचे व त्यांच्या साथीदारांनी खिंड त्वेषाने लढविली. बांदल मावळे बाजींना मदत करू लागले. मसूदच्या सैन्याची कापाकापी सुरू होती. इकडे राजांनी सुर्व्यांना मागे रेटले त्यांचा वेढा कापून ते स्वतः विशालगडाकडे पोचले. राजे सुटले होते पण बाजी पुरे अडकले होते. त्यांत बाजीची फौजही निम्म्याने उरली होती. खुद्द बाजी प्रभू रक्तबंबाळ झाले होते. पागोटे दूरवर पडले होते. बलदंड शरीराचे बाजी शत्रूवर त्वेषाने फिरंग चालवीत होते. डोईच्या संजाबातून मानेवर शेडाचा झुबका रुळत होता. लढाईचे असे रूप त्याने आजवर पाहिले नव्हते. मसूदाची बंदुक त्याच वेळी बाजींच्या छातीवर गेली. धक्क्याने बाजी कोसळले. परंतु खिंड अजूनहि लढतच होती. गडावरून तोफेची गर्जना झाली. बाजींना धन्य वाटले. धन्याला सुरक्षित ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न साध्य झाला. बाजींची सारी फौज कामाला आली जखमींना कुजलेले तूप लावले गेले. बाजींना घोडखिंड पावन केली. किल्लेदारास त्याचे नांव "पावनखिंड" ठेवावयास सांगितले.

राजे काही स्वस्थ बसले नव्हते. कारण सुर्वे मसूदचे सैन्य पुन्हा मोर्चे उभारण्याच्या तयारीत होते. त्यांना तोंड देण्यासाठी राजांनी त्यांच्यावर तुटून पडण्याचा हुकूम दिला. पुन्हा कापाकापी कामगिरी फत्ते करून फौज परत गडावर आली. राजांनी गडावर तोफ डागण्याचा हुकूम दिला. शत्रुपक्षाची फौज वेढ्याचा मार

सोडून माघारी वळली. राजांची वाट मोकळी झाली. आता शाहिस्तेखानावर बंदोबस्त काम बाकी राहिले होते. राजे राजगडाकडे वळले.

कान्होजी व नेताजी पालकर गडावर आले. राजे नेताजींना म्हणाले की त्यांनी हुकूम पाठविला त्याचवेळी पन्हाळगडावर जायला हवे होते कारण वेढ्यात दोन महिने ते अडकून पडले. नेताजीच्या फौजेची हानी झाली. पराभव पण झाला. नेताजींना राजे म्हणाले की त्यांनी शहापूरला जो पराक्रम केला तो अद्वितीय होता, त्याबद्दल नेताजींचे कौतुक करणे भाग आहे.

बाजीप्रभूंनी घोडखिंडीत अर्धे सैन्य त्यांचेकडे ठेवून अर्धे सैन्य राजेसाहेबांबरोबर पाठविले होते. त्यांना बाजीप्रभूंची एकदम आठवण झाली, मन कालवले गेले, राजांची जोखीम पत्करून, गडावर तुफान मारा असतांना पन्हाळगड ते खेळणा किल्ला, पंधरा कोसांचे अंतर, दिवस रात्र प्रवास उपासतापास, चिखलापाण्याचे दिवस व त्यांतच राजांची पालखी धावत पळत होती. त्यांत घोडखिंडीच्या मागून गनिमांची गांठलेले स्वकीय शत्रू सुर्वेपण वेढा देऊन होते. मागेपुढे शत्रू उभे होते. उपाशीतापाशी बांदल सैन्य घेऊन बाजीप्रभू खिंड लढताना व त्यांतच राजांना म्हणतात "राजे, तुम्ही गडावर जा. तुम्ही पोहोचल्याची तोफ येईपर्यंत कोणालाही पुढे सोडणार नाही. साहेबाकामी आम्ही मरतो. निम्म्या शिबंदीने गड गाठला. पण बाजी निम्म्याच शिबंदीसह खर्ची पडले. कोणी वाचले नाही. अशा दुर्दैवाचा प्रसंग. राजांना हा साक्षात प्रसंग नजरेसमोर आला. ते पुन्हा गहिवरले. दरबारच्या पहिल्या मानाने पान बाजी देशपांड्यानाच मिळाले पाहिजे अशी राजेसाहेबांनी इच्छा बोलून दाखविली.

कान्होजी म्हणाले, "मग राजे, मग त्यांत विचार कसला? बाजींच्या पराक्रमामुळे तुमचे पाय आम्हाला दिसले. राजांनी कान्होबास मिठी मारली.

नेताजी राजांना म्हणाले चाकणला संग्रामदुर्गावर शास्तेखानाने वेढा घातला आहे फिरंगोजी आज दीड महिना गड लढवीत आहेत. त्यांना तातडीने मदत करायला हवी. राजांच्या मनातहि तेच विचार होते. उद्याच व्यवस्था करूं म्हणून होकारात्मक मान डोलाविली.

चारपांच दिल्यानंतर फिरंगोजी स्वतःच राजांना भेटून शास्तेखानाचे गड ताब्या घेतल्याची बातमी दिली. शत्रूने खिंडार पाडून, भुयारांतून दारू उडवून खिंड पाडले परंतु गनिम आंत जाऊ शकला नव्हता. शिबंदी थोडी, पन्नास दिवस

थकली. नाईलाज झाला. दुःखद अंतकरणाने फिरंगोजी सांगत होते. परंतु राजांना सत्यपरिस्थितीची जाणीव होती. अपुऱ्या फौजेनिशी पन्नास दिवस गड लढवत ठेवले महामुष्किलीचे काम होते.

राजांना त्या पराजयाचे दुःख वाटले नाही. फिरंगोजीच्या शौर्याची त्यांनी तारीफ केली. मोरोपंत राजांना म्हणाले फिरंगोजीचे शौर्य पाहून खुद्द खानाने फिरंगोजींना आपल्याकडे बोलावले. फिरंगोजी सुखावले.

मोरोपंतांनी मानाचे तबक आणले. त्यांत भरजरी दुशेला व तलवार होती. ते दिल्यावर राजे फिरून म्हणाले; भूपाळगडची किल्लेदारीपण तुम्हाला दिली आहे. जी आदिलशाहीच्या सरहद्दीवर आहे.

पावसाळा संपल्यावर शास्ताखान पुढील हालचाल करणार अशी बातमी हेरांनी आणली. त्यात आदिलशहा शिवाजीवर चालून जाण्यासाठी विजापूरहून निघाल्याची बातमी होती. आदिलशाही व मोगलाई एक होऊन जाण्याची शक्यता धूसर होती. राजांचे सर्व सरदार यांचा पुढील कार्यक्रमावर विचार ठरला. पन्हाळगड तूर्न आदिलशहाला देऊन विशालगड आपल्याकडे ठेवून तह करण्याचे ठरले. वाटाघाटीसाठी वकील पाठविला गेला. सागरी हल्ल्यासाठी खाडीवर डौलणारी गलवते राजांनी मुद्दाम बनवून घेऊन सागरी आक्रमणाची तयारीही फिरंग्याप्रमाणे सातासमुद्राकडे फिरायला जायला हवीत असे विचार मनांत येऊ लागले.

पावसाळा संपला. शास्ताखान तळ उठवून पुण्याला आला. खुद्द राजांच्या मुलखांत शास्ताखानाने छावण्या ठोकल्या. तो स्वतः शिवाजीराजांच्या लालमहालात राहिला. राजे संतापले

सोनोपंत विश्वनाथ डबीरांना नरमाईचे पत्र देऊन खानाकडे पाठविले. पावसाळा असूनही शास्ताखानाने पुण्यांत आल्यावर राजांचा मुलुख बेचिराख करून टाकला.

आदिलशाहीशी राजांनी केलेला करार व राजांची वाढती सत्ता पाहून आदिलशहाने शहाजीराजांना तीर्थयात्रेची, शिवबा व जिजाऊ यांना भेटण्याची परवानगी दिली. हे राजेसाहेबांनी मासाहेबांस सांगितल्यामुळे सर्वांना आनंद झाला तुकाई ऊर्फ तुळजापूरच्या महिषसुरमर्दिनीला मंदिर लुटण्याचे वेळी दुसरीच मूर्ति देवळांत ठेविली होती. तिचा भंग झाला होता. मात्र मूर्ति चल असल्यामुळे खरी मूर्ति भोप्यांनी शहाजी महाराजांपुढे आणून सविस्तर पूजा अर्चा करून राजांचे आशीर्वाद घेतले. पंढरपूर, जेजुरीहून

शहाजीराजे येईल असा कयास होता. कारण शाईस्तेखानाच्या पुण्यातील तळाची कल्पना महाराजांना न देतां खानाला शिवाजीने झुलवून ठेवले.

शास्तेखानाची वाटाघाटी चालूच होत्या. सोनोपंत डबीर वांरवार पुण्यास जात होते. त्याने भेटीबरोबर खानासाठी भारी वस्त्रे, अलंकार वगैरे पाठविले जात होते.

शहाजी राजे पंढरपुरावरून जेजुरीस गेले. सर्वांनी जेजुरीच्या गडावर भेटण्यास ठरवून सर्वांनी नंतर सर्वांनी पुण्यास यावयाचे ठरले.

शृंगारपूरचे सर्वे, कुडाळचे सावंत व पालवणचे दळवी हे तिन्ही जहागिरीची गांवे आपल्याच माणसांची असल्याने त्यांचेशी राजे वैर धरूं इच्छित नव्हते. उलट हे सर्वजण आपल्याकडे यावेत अशी त्यांची इच्छा होती. या सर्वांना निरोप देऊन त्यांना राजांच्या फौजेकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. व संकटकाळी फौजेला मदत करावी. अशी विनंती केली.

या वार्तेने सुर्वे निर्भय झाले. राजांची कामगिरी त्यांनी आनंदाने स्वीकारली. राजांना समाधान वाटले. मोहिमेतून राजे परत आल्यावर सुर्वे व पिलाजी नीळकंठही राजांना मिळाले.

पुढील पल्ला राजापूर! पुरेसे घोडदळ व पायदळ घेऊन राजापूरची चारी बाजूंनी नाकेबंदी केली राजांनी वकील राजापुरांस पाठविला. सधन व्यापारी, सावकार वगैरेंकडून खंडणी गोळा झाली. टोपीकरपण मागाहून न बोलावतां आले. राजे म्हणाले शास्ताखान आमच्या मुलखांत आले असतांना तुम्हाला माहीत असून सुद्धा तुम्ही पन्हाळ्यावर तोफा घेऊन आमच्यावर हल्ला करण्यास मदत केली. त्यांचा हेतू व्यापाराचा असून सुद्धां राजे म्हणाले तुम्ही कशाचा व्यापार करतां? मालाचा की देशाचा? हा तर व्यापार असेल तर तो आम्हास परवडायचा नाही. त्यांना गिरफ्दार करण्यांत आले. आपला बावटा फडकावून आमच्यावर गोळे उडविल्याचे प्रायश्चित्त त्यांना आणि त्यांच्या कंपनीला मिळावयास हवे.

टोपीवाल्यांची वखार कुदळी लावून लुटण्याची आज्ञा झाली. जेवढे टोपीवाले सांपडतील तेवढे गिरफदार करा. तर त्यांची गय न करता सरळ कत्तल करा. राजापूरच्या लुटीचा माल, अगणित संपत्ती राजांनी सोनगडावर पाठवून दिली. वखारीचे सर्व इंग्रज कैद केले गेले होते. रेव्हिंग्टन व त्याच्या साथीदारांना सोनगडाच्या कैदेत ठेवले गेले. बाळाजी कावजीला राजांनी आणावयास सांगितले. हवालदार

त्यांना घेऊन आले. तो तरुण त्याच्या आईसह आला. ते दोघेजण राजांच्या पाया पडले व म्हणाले "राजे, आम्ही गरीब, आमच्याजवळ काही नाही. त्यावर राजे म्हणाले काळजी करूं नका. तुमच्या बाळाजीला आम्ही कामासाठी बोलावले आहे. गुन्हा केला म्हणून नव्हे. बाळाजीची आई सांगत होती की तिच्या मालकांना व दिरांना सिद्दीने मारले. व तिच्या मुलांना गुलाम म्हणून विकायला पाठविले. खलाशांना दया येऊन मस्कतला न नेता राजापूरला आणले. माझ्या भावाने, नांव विसाजी शंकर, ओळख न दाखवतां मला विकत घेतले. त्याच्याच आश्रयाने आम्ही पोरं जगवितो.

राजांनी विचारले विसाजी शंकर तुमचे भाऊ, व्यापार करता ना. त्यावर म्हातारीने होय म्हणून सांगितले. मग राजे म्हणाले तुमचीही लुट झाली असेल किंवा नाही? तो म्हणाला "नाही महाराज" कारण आम्ही खंडणी आधीच भरली होती. लगेच राजांनी चिटणिसांना बोलावून त्यांची खंडणी संपूर्ण परत करावयास सांगितली, बाळाजीकडे वळून राजे उत्तरले, इथले जुलूम, अत्याचार यांचे जे पत्र तुम्ही आमच्याकडे पाठविले, त्याची खात्री तुमच्या मातोश्रींकडून मला कळाली. तुमचे हस्ताक्षर उत्तम आहे, आमच्या पदरी काम करणार काय असे विचारतां त्यांनी होकारार्थी उत्तर दिले. राजांना बाळाजी आवजी दफ्तरी आल्याचे समाधान झाले.

शाईस्तेखान अद्याप पुण्यात लालमहालात होता. त्याच्या छावणीने सर्व पुणे लुटमार करीत होते. नांमदारखान व नेताजीची सुप्याजवळ चकमक झाली. त्यांत नेताजी जखमी झाले. सरफराजखान व नामदारखान या दोघांनी नेताजीला पाठलाग करून त्यांची तीनशे घोडी जायबंदी केली. आता राजांना काहीतरी चाल खेळणे आवश्यक होते. त्यांनी मोरोपंत, सर्जेराव जेधे, तानाजी, नेताजी पालकर बाळाजी व **चिमणाजी हे नऱ्हेकर देशपांडे बंधू** यांची गुप्तपणे खलबते चालूं होती.

पुण्यात खानाकडे साठ सरदार होते त्यांचे तळ कोठे कोठे आहेत. त्यांची जागा, निरनिराळे शामियाने, डेरे, चौकी, पहारे वगैरे बारकावे ध्यानी घेतले जात होते. लालमहालावर चाल करण्याची महाराजांनी ठरवले. खानाची फौज लाखाहून अधिक असूनसुद्धा! तीन वर्षाच्या कालावधीत शास्ताखानाने राजांचा मुलूख जवळजवळ गिळल्यासारखा झाला होता. मुघलांना अशीच उसंत दिली तर कोकणातहि हातचं जायला विलंब लागणार नाही. राजांच्या मते लालमहालात हल्ला केला, ते घडलं, खानमेला की फौज रहाणार नाही. सारा मुलूख मोकळा होईल.

राजांनी पंचमीला बाहेर पडून कोंढाण्यास तळ करून अष्ठमीला पुण्यांत लालमहालावर जाण्याचे ठरले व दिनांक ५ एप्रिल १६६३ च्या रात्री चाल पूर्ण करून रामनवमीला परत कोंढाणा किल्ल्यावर साजरी करण्याचे ठरले. रमजानचे उपवास सुरू होतील उपवासाने खानाची माणसे चंद्रोदयानंतर रात्री जेवण करून गाढ झोपतात. हाच मोका साधून कारवाई करण्याचे ठरले.

राजांच्या बरोबर खासे खासे सरदार नेताजी पालकर, फिरंगोजी, बाळाजी, चिमणाजी देशपांडे (नांदुसकर) आणि मोरोपंत पेशवे होते. कोंढाण्याच्या खलबतखान्यात राजे बसले होते. कोयाजी बांदल, चांदजी जेधे, सरनोबत नेताजी, फिरंगोजी, तानाजी, येसाजी, बाळाजी, चिमणाजी, मोरोपंत, सर्जेराव जेधे, येवढी खास विश्वासाची माणसे गोळा झाली होती. **बाळाजी व चिमणाजी यांचे वडील लालमहालातच चाकरीस असल्याने तो सारा परिसर सर्वांनाच तोंडपाठ होता.** शिवाजी राजांनी एकूण दोन हजार माणसे/धारकरी निवडले. शाहिस्तेखानासोबत मराठा सरदार व मनसबदार असल्याने या मराठी लोकांचा संशय कोणाला येणार नव्हता. खासे शिवाजीराजे चिलखत, शिरस्त्राण चढवून निघाले. थोडी चौकशी झाली तेव्हा "कटकाचे लोक" पहाऱ्यास गेलो होतो. अशी बतावणी देत मंडळी पुण्यात आली.

पहिली तुकडी सरदार **चिमणाजी बापूजी नांदुसकर देशपांडे व शिवाजी महाराज** हे दोनशे मावळ्यांसह सिंहगड डोणजे धायरी कात्रज या मार्गे लालमहालातच थोडे लांब आंबिल ओढ्यापाशी मावळे येऊन थांबले. तेथून मोरोपंतहि स्वारीत सामील व्हावयाचे होते.

दुसऱ्या तुकडी दोनशे मावळ्यांसह सरदार **बाळाजी बापूजी नांदुसकर देशपांडे** यांनी मध्यरात्री दुसऱ्या मार्गाने सिंहगड-शिरवळ-घाटमार्ग-पुण्यापासून एक मैल अंतरावर होती. घाटातून येताना घोडेस्वार व पायदळ यांचेबरोबर बैलाच्या शिंगांवर पलिते लावून ठेवले होते. दोन्ही तुकड्यांचे नेतृत्व सरदार **बालाजी व चिमणाजी बापूजी नांदुसकर देशपांड्याकडे होते.** शिवाजीमहाराज व इतर लोक लालमहालाच्या पिछाडीस आले. जेवण उशिरा झाल्याचे स्वयंपाकी जागे होते. गडी भांडी साफ करीत होते. या आचाऱ्यांवर महाराजाचा पहिला घाला झाला. तलवारीपुढे झाऱ्यांचे काय चालणार? आचारी कापले गेले. थोडा आवाज झालाच.

एका नोकराने शाईस्तेखानाला ही खबर कळविली. खानाने त्या नोकरालाच हाकलले. शाईस्तेखान मद्याच्या नशेत होता. मराठ्यांची एक भिंत फोडली. तेथे छोटी दिंडी होती. वारूळातून मुंग्या याव्यांत तसे मराठे त्या दिंडीतून लाल महालात घुसले. महालभर पांगले. खासे शिवाजीमहाराज तलवार घेऊन शाहस्तेखानाला शोधीत होते. लालमहालात एकच कापाकापी सुरू झाली. काही पहारेकरी झोपेत होते. त्यांना मराठ्यांनी "असा पहारा करतात काय?" असे म्हणत त्यांना कापून काढले.

आरडाओरडा ऐकल्यावर खानाची नशा उतरली. हत्यार घेण्यासाठी तो निघाला. चिमणाजी बापूजी नांदुसकर देशपांडे यांनीपण तलवार उपसली. व राजांना सावध केले. तो शिवाजी राजांना अचानक खानच समोर दिसला. ते पुढे सरसावले. तेवढ्यांत खानाच्या बेगमांनी चिरागदाने विझविली. एकच अंधार झाला. मराठ्यांनी अंधारातच तलवारी चालविल्या. सरदार **बाळाजी व चिमणाजी बापूजी नांदुसकर (देशपांडे)** व मावळे धारकऱ्यांनी आदले दिवशीच खानाचा मुलगा अबुल फतहखान यांना तलवारीने वार करून यमसदनास पाठविले. त्या अंधुक प्रकाशात पळणारा शाहिस्तेखान शिवाजीराजांना दिसला. प्रथम चिमणाजी लगेच खानावर येऊन धावला. त्या पाठोपाठ राजांनी खाडकन् आपली तलवार खानावर उगारली. त्यांत त्याची तीन बोटे तुटली. शिवाजीराजांना वाटले की खानच ठार झाला. म्हणून ते बाळाजी बापूजी व चिमणाजी बापूजी नांदुसकर (देशपांडे) यांना म्हणाले "चला रे, झालं काम. निघा आता." मराठे लालमहालाच्या दरवाजांत आले. दरवाजाबाहेरहि गर्दी झाली होती. मराठ्यांनीच दरवाजा उघडला आणि "गनीम गनीम" असे म्हणत ते लालमहालाबाहेर पडले. मुठा नदीच्या पलीकडे आंबिल ओढ्यानजीक सर्जेराव जेधे घोडेस्वारासह वाट पहात उभे होते. शिवाजीराजे व मावळे/धारकरी सिंहगडाकडे त्वरेने निघून गेले. शास्ताखानाचे सरदार शिवाजीचा पाठलाग करण्याचे हेतूने कात्रज घाटाच्या रोखांत उतरू लागले. खानाचे पथक मशालीच्या दिशेला वळलेले पाहताचं राजाचे घोडदळ कोंढाण्याकडे वळले. खानाचे पथक मात्र बैलाच्या शिंगांवर लावलेले पलिते पाहून खानाचे सरदार जागच्या जागी खिळून राहिले. त्यांच्या नजरेसमोर काजवे चमकूं लागले. राजांनी दुसरे दिवशी रामनवमी कोंढाण्यावरूनच साजरी केली.

शाईस्तेखानाच्या उजव्या हाताची तीन बोटे तुटली होती. त्याचा एक मुलगा, जावई, बारा बेगमा, इतर लोक मिळून पंचावन लोक त्या रात्री मारले गेले. शिवाजीराजांची सहा माणसे मारली गेली. या हल्ल्याची खानाने इतकी दहशत खाल्ली की तीन वर्षे पुण्यांत ठाण मांडून बसलेला शाईस्तेखान तीन बोटे गमावून तीन दिवसांतच पुणे सोडून औरंगाबादेकडे निघून गेला. अफझलखानाचा वध आणि शाईस्तेखानावरील हल्ला यामुळे शिवाजीराजांची कीर्ती हिंदुस्थानभर केवड्यासारखी दरवळली.

शास्ताखान औरंगजेबाचा रिश्तेदार. आता थोट्या हाताने औरंगजेबासमोर कोणत्या तोंडाने जावयाचे याचा शास्ताखानाला विचार पडला होता. आपल्या मुलाचे, बेगमांचे दफन करून शास्ताखान लालमहालात आला. रात्र पडू लागली. तसा त्याचा धीर सुटू लागला. आरंभीची रात्र त्याने जागून काढली.

खानाची फौज कोंढाण्याजवळ येताना दिसतांच राजांनी इशारत दिली. फौज फारशी नव्हती. राजांनी गडाचे दरवाजे सताड उघडे ठेवावयास सांगितले. तटावर कोणी माणूस दिसत नव्हता. एवढेच काय भगवे निशाण सुद्धा गडावर फडकत नव्हते. मोकळे दरवाजे व निर्मनुष्य तट पाहून खानाचे सैन्य पुढे झेपावले. शिवाजी गड सोडून पळून गेला असाच सर्वांचा समज झाला. क्षणाक्षणाला खानाचे सैन्य पुढे सरकत होते. आघाडीच्या हत्तीवर मोगल ध्वज फडकत होता.

कोंढाण्याच्या खालच्या परिसरांतील जमीन **सरदार बाळाजी बापूजी व चिमणाजी बापूजी नांदुसकर-देशपांड्यांची होती** व परिसरातील सर्व इत्थंभूत त्यांना माहिती व वहिवाट त्यांची असल्याने राजांच्या फौजेला त्यांनी अचूक मार्गदर्शन करून हल्ल्याचा व चढाईचा वेग वाढविला. तो तंतोतंतपणे पूर्ण उपयोगी पडला. बाळाजी व चिमणाजी यांचे त्यांच्या नांदोशी येथील रहात्या घरांतून सिंहगड कायम समोर असल्याने व धुले दऱ्यांतील अवघड वाटा त्यांच्या नजरेसमोर असल्याने खानाच्या सैन्यास कोंडीत पकडून, शिपायांस जेरीस आणले राजांच्या हुकुमान्वये तोंफाचे मारे करावयास हुकूम झाला. धुराचे लोटच्या लोट येऊ लागले. खानाच्या सैन्याची दुर्दशा उडून गेली. माघार घेईपर्यंत बाळाजी बापूजीने खानाची निम्म्याहून अधिक फौज मारून टाकली. खानाच्या सैन्याने कशीबशी माघार घेतली. फौज जीव घेऊन पळत सुटली.

ही वार्ता पुण्यास पोहोचली. शास्ताखान पुरता धास्तावला. गनीम खाशा डेऱ्या येईपर्यंत, सर्व सरदार फितव्यांत मिळाल्याचा खानास संशय, त्यांत त्याची हाताची बोटे कलम झालेली, उद्या कदाचित शिर सुद्धा कापून नेतील या भीतीने खानाने आवराआवर केली. तिसऱ्याच दिवशी पुण्याचा तळ हलवून जसवंत सिंगाला पुढील आदेश देऊन खान औरंगाबादेस पोहोचला.

राजांनी त्याप्रकारे शास्ताखानास शास्त म्हणजे शिक्षा केली. शास्ताखानाच्या छाप्यानंतर आठच दिवसांत राजांनी कोकणची मोहीम काढली. कुडाळ, वेंगुर्ला हे मुलूख जिंकून नवे कौल, आश्वासन पत्रे देऊन राजांची स्वारी थेट बांद्यापर्यंत गेली. मोगली फौज महाडपर्यंत पोचली होती. राजांना माघारी वळावे लागले. सर्व पुणे उद्ध्वस्त झालेले, कोकण अस्थिर होते, सतत लढायांमुळे आर्थिक ताण अशी परिस्थिती बिकट होती. त्याकरितां राजांनी सुरतेवर चढाई करण्याचे ठरले.

◆ ◆ ◆

प्रकरण ५

सुरतवरील वेढा - जलादुर्गाची बांधणी - पुरंदरचा तह - आग्रा भेटीचे आमंत्रण

सुरत शहरावरील पहिली स्वारी :

'सुरतेची स्वारी' महाराजाच्या पराक्रमी प्रखर चरित्रांतील ही एक उत्तुंगपणे उठून दिसणारी अशी घटना आहे. आपल्या महत चातुर्याने अन चपळाईने 'न भूतो न भविष्याति' अशी स्वारी अगदी कल्पनेबाहेर यशस्वी करून दाखविली. महाराजांनी लूट केली ती "गबरांची", गरिबांची नाही!

शाईस्तेखानाने स्वराज्याचे तीनवर्षांहून अधिककाळ अफाट नुकसान केले होते त्याची भरपाइ करणे अत्यंत आवश्यक होते. कोकण किनाऱ्यावर कडवाड ते दमणगंगेपर्यना अनिर्बंध सत्ता प्रस्थापित करणे त्यासाठी महाराज महाबलाढय आरमार व जबरदस्त जंजिरे स्वराज्याच्या पश्चित किनाऱ्यावर उभारणे आवश्यक होते. यासाठी हवा होता पैसा. त्या खेरीज लढाऊ गलबते स्वराज्यांत उभारणे तांतडीचे होते. **बहिर्जी नाईक जाधव** या हेराने इत्यंभूत माहीती जमा करून राजांस सांगितली. सुरतेवर स्वारी करण्याचे ठरवून औरंगजेबाची लंकाच लुटण्याचे ठरले कारण सुरतेच्या बंदरांतून भला कोट्यावधी रुपयांचा व्यापार चालत होता. सुरत म्हणजे "मोंगल बादशाहाची दाढी" असे संबोधले जाई. केवळ जकातीच्या रुपाने व करांच्या रुपाने औरंगजेबाला सुरतेतून कोट्यावधी रुपये मिळत असत. टोपीवाले इंग्रजी, डच, फ्रांसिसी, पोर्तुगीज, युनानी, आर्मिनी, फिरंगी, पर्शियन, आफ्रिकन, चिनी, सिद्दी, हबशी व युरोपियन व्यापारी सुरतेवरून व्यापार करीत. गोऱ्या व्यापाऱ्यांकडून मोंगलांना तोफा, बंदुका, दारूगोळा मुबलक मिळत असे.

पुण्यापासून सुरतेपर्यन्तचा सर्व प्रदेश मोंगलांचा होता. तरी देखील दिडशे कोस आंत सुरत शहरावर मुसंडी मारून ते संपूर्ण लुटून फस्त करून त्याची पुरती

होळी करून लगोलग स्वराज्यांत परत फिरायचे "हा केवढा तरी विलक्षण धाडसी बेत महाराजांनी आंखला होता. त्या धाडसाला दूरवरच्या प्रदेशाची संपूर्ण खडान्‌खडा माहिती बर्हिजी नाईकाने काढलीच होती. सुरत ते राजगड अंतर तीनशे कोस, ते सुद्धा मोंगली मुलुखांतून. सुरतेची वस्ती दोन लाख व वस्ती सात हजार. तापी नदीच्या दक्षिणेस सुरत म्हणजे पूर्वीचे "सूर्यपूर" जे समुद्र किनाऱ्यापासून सत्तावीस मैल आंत आहे. शिवकाळांत सुरतेचे क्षेत्रफळ चार चौरस मैल होते व वस्ती खूप दाट होती.

इ. स. १५४० साली येथे एक किल्ला सुलतान मुहम्मदशाह तिसरा याच्या खुदावंतखान नावाच्या सुभेदाराने बांधला. त्याची तटबंदी ४५ फूट रुद व ६० फूट उंच होती. सोळाव्या शतकाच्या सुरवातीस सुरतेस पोर्तुगांजांची वाढत्या सत्तेचा त्रास होऊ लागला. पोर्तुगीजांनी १५२९, १५३०, १५३१ व १५४६ सुरतेची जाळपोळ केली होती. इ. स. १५७३ मध्यें मोंगल बादशहा अकबराने सुरत ताब्यात घेतले. नंतर इंग्रज व डच लोकांनी तेथे वखारी घातल्या.

अशा सुरतेवर लढाई करावयाचे म्हणून शिवाजी महाराजांनी नेताजी पालकर, **नारो बापूजी, चिमणाजी बापूजी मुदगल् देशपांडे, परसोजी महाडिक, मोरोपंत पेशवे, निळोपंत, आण्णाजीपंत, दत्ताजीपंत** आदिमंडळींना बरोबर घेऊन कोंकणांतून मजला दरमजल करून ५/७ गांवे रोज करून सुरतेवरच्या लुटीत सामील झाले. सुमारे आठ ते दहा हजार सैन्य महाराजांनी घेतले होते. शके १५८५ च्या मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस म्हणजे ६ डिसेंबर १६६३ रोजी महाराजांनी सुरतेसाठी प्रस्थान ठेवले.

ह्याच वेळेस पुण्यात असलेल्या मोंगल फौजेसह महाराजा जसवंतसिंहाने सिंहगड किल्ल्यास वेढा घातलेला होता. मात्र जसवंतसिंहाला सुद्धां कल्पना नव्हती की आपल्या शेजारून तीन कोसावरूंन मराठ्यांची भली मोठी फौज थेट सुरतेवर चालली आहे. मोंगलांच्या ताब्यांत असलेल्या पुणे ते सुरत असा तीनशे मैलांचा धाडसी प्रवास शत्रूच्या मुलूखांतून महाराजांनी कशा प्रकारे केला असेल या विचारानेच मती गुंग हाऊन जाते. संपूर्ण प्रवास रात्रीच केला व दिवस दाट जंगलांत विश्रांती अशा पद्धतीने मार्ग क्रमीत होते. मध्ये त्र्यंबकेश्रराचे दर्शन घेऊन, औरंगाबादेला चालून जाणार त्या अफवेने सुरतेच्या वाटेवर त्यांना कोणीही आडवले नाही. ४

जानेवारी १६६४ ला घणदेवीला पोहोचते. सुरतेपासून सव्वादोन कोसावर महाराज येऊन ठेपले.

सुरत हे व्यापारी गांव, त्यावेळी वैभवात पोचले होते. औरंगजेब प्रतिवर्षी दहा लाख कररूपाने गोळा करी अशी हेरांनी बातमी आणली होतीच. नाना देशीच्या माल सुरतला जात येत होता. फिंरगी, वलंदेज, गुजराती, सिद्दी, अरब असे अनेक लोक रहात होते. सुभेदार इनायतखान मोगलाच्या वतीने सुरतेची जबाबदारी पहात होता, त्याला प्रथम शिवाजीच आपल्यावर चाल करून येतो आहे यावर विश्वास बसला नाही. शिवाजीच्या वकिलांनीच त्याची गांठ घेतली त्यावेळेस त्याला पटले. शिवाजीचा खलिता होता.

"उद्या दुपारी सूर्य मस्तकावर येण्याच्या आधी शिवाजीराजे सुरतेत पोचले आहेत तेव्हा तुम्ही स्वतः आणि धनाढ्य व्यापारी, बहरजी बोहरा हाजी कासम आणि हाजी सय्यद बेग यांना राजांना भेटून खंडणी निश्चित करून घ्यावी, नाहीतर शहरावर आग आणि तलवार गाजवू" हे वाचल्यावर इनायतखान घाबरून बायकामुलांसह आणि जडजवाहिर घेऊन किल्ल्याच्या आश्रयास गेला. सुभेदार पळाल्याचे समजतांच श्रीमंत व्यापारी सुद्धां जीव वाचविण्यासाठी किल्ल्याकडे धावत सुटले.

सर्व सुरतेभोवती वेढा पडला. दि. ६/१/१६६४ कोणालाही बाहेर पडता येथे अशक्य झाले. इंग्रजांनी आपला बंदोबस्त वाढविला. हेरांनी बातमी दिली की शत्रूचा बंदोबस्त कांहीही नसून, सुभेदार व पहारेकरी पळून गेले आहेत. राजांनी नेताजी व मोरोपंत यांना तीन लक्ष खंडणी मागा व इंग्रज व वलंदेजांना काही धक्का लावू नका असे सांगितले. कडतोजी गुजर व बहिर्जी पाहिल्यावर ऑक्सेंडेनचे डोळे विस्फारले गेले. त्यांनी कडतोजींना सांगितले आमच्याजवळ नगद रुपये नाहीत, फक्त मसाले, कापडरूपाने खंडणी घेणार असतील तर घ्या. नसतां तुमची लढ्याची तयारी असेल तर लगेच या असा निरोप दिला. निरोप ऐकून राजे हंसले. संतापलेले कडतोजी राजांना म्हणाले की आज्ञा करा की, फक्त दोनशे टोपडी, चार तोफा व वखारी होत्या की नव्हत्या असं करून माघारी येतो. एवढ्यांत नेताजी पालकर कांही लुटीचा माल घेऊन राजांसमोर आले. जकातनाके व चार घरांचीच ती लूट असल्याचे सांगितले. राजांनी मोगली मिजास सांगणाऱ्या सुरतेची बेसुरत करा व हिचं सारं वैभव आमच्या स्वराज्यासाठी एक करा असे आदेश दिले. संध्याकाळपर्यंत

प्रचंड लूट म्हणजे सोने, चांदी, जडजवाहिर, रत्ने जमा झाले होते. दुसरे दिवशीपण लूट चालूच राहिली. सुभेदार इनायतखान अजूनहि किल्ल्यांत लपून बसला होता. शिवाजीशी तह करण्यासाठी तेथूनच त्याने वकील पाठविला. अश्वपथकावर दौडत आलेल्या तानाजीने फार मोठी लूट आणली. तीस पिंपे सोन्याने भरलेली होती. राजांनी आपल्या गलबतावर ती चढवून ठेवण्याबद्दल सांगितले. सुभेदारकडून वकील आला. पण त्यांची उद्दामपणाची भाषा कमी झाली नाही. वकील तरुण होता. त्याचे महाराजांवर वार करण्याच्या उद्देशाने हात वर केला. त्याने क्षणी खाडकन् महादेव शिवाजीचा अंगरक्षक याने त्याचा हात छाटला. चौथ्या दिवशी लूट पूर्ण झाल्यानंतर जमा झालेली करोडो रुपयांची संपत्ति गलबतांवर पाठविली गेली. ६ ते १० जानेवारी १६६४ तेथून निघातांना राजांनी व्यापाऱ्यांना सांगितले.

तुमच्या बादशहाला व सुभेदाराला आमचा निरोप सांगा, तुमची सुरत होती ती आम्ही बेसुरत केली. ही भूमि हिंदूची आहे. जेथे तुम्ही राज्य करतां ती दिल्लीही तुमची नव्हे. तीही पुरातन हिंदूंचीच आहे. एक ना एक दिवस आम्ही ते सिद्ध करून दाखवू. आमचा निरोप तुम्ही जरूर बादशहांना आणि सुभेदारांना कळवा. राजे माघारी फिरले.

सुरत स्वच्छ करून महाराज पौष वद्य अष्टतीस १० जानेवारी १६६४ रोजी सुरतेहून निघाले. आठ हजार घोडेस्वारांच्या रांगा वळणे घेत घेत संथ गतीने सह्यद्रीत घाट चढत होत्या. पहाडी चढावामुळे अन् पाठविणाच्या ओझ्यामुळे त्यांना जरा नेटाने दापा टापा टाकाव्या लागत होत्या. हे घोडेस्वार मोठमोठ्या थैल्या व पडशा घोड्यावर लादून कोंकणातून देशावर येते होते. बरोबर सरनाबेत नेताजी पालकर अन् प्रत्यक्ष प्रत्यक्ष महाराज! राजश्री शिवाजीराजे होते! अन् मागोमाग सुरतेची महालक्षी आज अश्वारुढ होऊन स्वराज्यांन आणली जात होती. सर्व लूट सुखरुप घाट चढून देशावर आली. निघाल्यापासून कोणीही आडवे आले नाही. की कुणीही पाठलागावर आले नाही.

परंतु राजगडी पोहोचण्यापूर्वी महाराजांचा तळ कांही काळ लोहगडावर पडला होता. सरनौबत नेताजी पालकर ह्या तळावर होते. नारो बापूजी (मुद्गल - नांदोशीकर-देशपांडे). चिमणाजी बापूजी (मुद्गल - नांदोशीकर-देशपांडे; परसोजी महाडिक; संताजी बोबडे, सखो भिकाजी

होहि सरदार या लष्करांत होते. लोहगडावरून हे मराठी लष्कर राजगडाकडे यायला निघाले. लोहगड ओलांडून ते वडगांवाजवळ (वडगांव-मावळ, पुण्यापासून ३० किलो मीटरवर, जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर) आले. तेथे एका वडाच्या झाडाखाली मोंगली सरदार मुकुंद सिंग रजपूत याने मराठ्यांना गांठले. चिमणाजी, परसोजी संताजी हे नेताजीसह तूट घेऊन त्वरेने पुढे सरकले अन् मुकुंदसिंगाला नारो बापूजीने रोखून ठेवले. नारो बापूजी (नांदोशीकर-देशपांडे) ने सर्व बाकी सरदारांना लूट घेऊन सुखरूपपणे राजगडावर जाणेस सांगितले. दरम्यान समोर आलेल्या शत्रूशी मी लढतो असे सांगितले.

लूट सुस्वरूपणे पुढे गेली. पण मागे झालेल्या धुमश्चक्रीत नारो बापूजी (मुद्गल - नांदोशीकर देशपांडे) बाण लागून ठार झालो. तो घोडा गजरल आसनकोहो होता. त्यावरी जीव गेला. विशेष म्हणजे लोहगडाच्या मुक्कामांतच नारो बापूजींचा राहुजी पतकींच्या मुलीशी वाङ्निश्चय झाला होता. व राजगडावरून परतल्यानंतर लग्न करायचे ठरले होते. नारो बापूजींच्या मृत्यूच्या वार्तेने महाराजांचा आनंद क्षणार्धांत करपून गेला. सिंहगड जिंकतांना तानाजी मालुसरेंनह ज्याप्रमाणे त्याच्या मुलाच्या लग्नांचा बेत पुढे ढकलला तत्सदृश हा प्रकार घडला होता, (पुरंदरे दप्तर, भाग ३, पृष्ठ क्र. १३८)

राजगडावर ते पोचले. वास्तविक राजे मोठा विजय संपादन करून आणल्याचा आनंद समोर दिसत नव्हता. फिरंगोजी दुःखद अंतकरणाने राजांचे पुढे आले फिरंगोजीनी थोरले महाराजांच्या मृत्यूची वार्ता त्यांना सांगितली शिभोगाच्याजवळ असलेल्या होदीगिरे नजीक ठिकाणी असलेल्या शाहूमहाराज शिकारीस बाहेर पडले. रानांत श्वापद उठले. महाराज हाती भाला सरसावून श्वापदाच्या मागें भरधाव धांवत जात होते. घोड्याचा पाय फसला. महाराज बाहेर फेकले गेले व त्यांतच ते शांत झाले. २३/१/१६६४ जिजाबाई सती जाण्याच्या तयारीत होत्या. शिवाजी राजांनाहि दुःखावेग सहन होईना. राजांनी जिजाईचे मन वळविले. सती जाण्यापासून त्या परावृत्त झाल्या.

राजांचा मुक्काम राजगडावरच होता. मोगल सरदार जसवंतसिंग कोंढाण्याला वेढा देऊन बसला होता. राजे सुरतेवरून परत आले. तरी कोंढाण्याचा वेढा तसाच

होता. कोंढाणा त्याच्या हाती लागलाच नाही. जसविंतसिंगच्या दारूखान्याला आग लागली. भडका उडून त्याची अनेक माणसे गगनांत फेकली गेली. तो पुरता निराश झाला व अपयश घेऊन तो पुण्याला परतला. मोगल फौजेच्या टक्कर देणाऱ्या वीरांचे कौतुक करण्यासाठी ते लगेच कोंढाण्यास गेले. किल्लेदाराची तारीफ केली. सुरत व कोंढाण्याच्या यशाने राजांची दहशत वाढती. अहमदनगर लुटून औरंगाबदेपर्यंत जाऊन त्यांनी मोगली मुलूख पुरता झोडपून काढला.

फारसनविंस नीलप्रभूंना बोलावून राजांनी बादशहास फर्मान पाठविले.

"बादशहा दिल्लीत बसून हुकूम सोडतात, शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा." तुम्ही जबाब पाठविता. "आम्ही लवकरच काबीज करतो. आमच्या या कठीण मुलखांत नुसत्या कल्पनेचा घोडासुद्धा नाचविणे कठीण आहे, मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला? भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हांस लाज कशी वाटत नाही? कल्याणीचे व बेदरचे किल्ले उघड्या मैदानांत होते, ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदी नाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत अरे साठ किल्ले आज आमचे तयार आहेत. पैकी काही समुद्रकिनाऱ्यालगतच आहेत. बिचारा अफझलखान जावळीवर फौज घेऊन आला. आणि नाहक मृत्युमुखी पडला. हा सर्व प्रकार बादशहास का कळविला नाही? समोर उल उमराव शास्ताखान आमच्या या गगनचुंबी डोंगरांत व पाताळांत पोहोचविणाऱ्या खोऱ्यांतून तीन वर्षे सारखा खपत होता. शिवाजीचा पाडाव करून लौकरच त्याचा प्रदेश काबीज करतो असे बादशहाकडे लिहून पाठविल्या, तरी मी आपले कर्तव्य बजाविण्यास कधी चुकणार नाही."

शत्रूकडून (राजाकडून) अशा तऱ्हेने पत्र आणलेले पहाताच मोगल सरदार चकित झाला.

आता राजगडावर जिजाईचे पत्र आले. त्यांत खवासखान विजापूरहून निघून तुमच्यावर रवाना झाला आहे. त्याजबरोबर बाजी घोरपडे व खेमसावंत हे आहेत. ते तिकडे येत आहेत. ये समयी त्यांचे वेढे घ्यावे."

कोंकण चढून वर येईपर्यंत खवासखानावर प्रतिकार करता सहज शक्य आहे. बाजीराव खवास खानाबरोबर आदिलशाही सरदार म्हणून एकोजी राजे भोसलेपण होते.

घोरपडे फौजेत सामील नसले तरी ते मुधोळमध्ये विश्रांती घेत बसले आहेत अशी हेरांनी बातमी आणली. राजांना वाईट वाटले साहजिक होते. एकाच वेढ्यांत कुडाळ सावंत, बाजी घोरपडे असतांना त्यांना आता कायमची विश्रांतीच द्यावी या हेतूने त्यांनी मुधोळ गांठले. वेढा घातला. राजे सरळ बाजी घोरपड्यांच्या वाड्यांत शिरले. घोडपड्यांपुढे तलवार घेऊन धांवले. बाजी म्हणाले झोपलेल्या इसमावर वार करतात काय? त्यावर राजे उफाडले. ते म्हणाले "जेव्हा शहाजी महाराज झोपले होते तेव्हांच तुम्ही त्यांना कैद करून बेड्या चढविल्या होत्या, आणि आम्हांला रणनीती सांगता होय? राजे

समोरच्या "कुरटे" बेटावर राजांचे लक्ष गेले. तेथे भेट दिल्यावर त्यांना त्या ठिकाणी "जंजिरा" किल्ला बांधण्याचे ठरविले. तेथील उपाध्ये जानभट अभ्यंकर यांनी शुभमुहूर्त काढून दिला. सर्व कोळ्यांनी पूर्ण सहकार्य, आश्वासन देऊन त्यांनी तरांडी ताफा दिला. दुर्ग बांधणीची सर्व व्यवस्था करून महिन्याभरांत राजांनी जलदुर्गाची व्यवस्था करून ते आनंदाने राजगडास परत आले.

महाबळेश्वर येथे सुवर्णतुला करण्याचे ठरले. जिजाबाईखेरीज सोनोपंत डबीर हे वयोवृद्ध शहाजी महाराजांपासून विश्वासू असे होते. ते दिल्लीदरबार पर्यन्त राजांचे वकील म्हणून गेले होते. त्यांचीही सुवर्णतुला करण्याचे राजांनी ठरविले. सोनोपंतांची तुला झाली. राजनिष्ठेचे सोने झाले. त्यानंतर दानाचा कार्यक्रम संपवून सोहळा संपला.

शास्ताखानाचा पराभव, सुरत अहमदनगरची लूट, जसवंतसिंगचा पराभव असे शिवाजीचे उपद्व्याप पाहून दक्षिणेतील मोगलाई संपुष्टांत येईल असे औरंगजेबास वाटले. त्यांनी त्याचा सर्वश्रेष्ठ सरदार "मिर्झाराजे जयसिंग" यांचेकडे प्रचंड फौज देऊन औरंगजेब मिर्झा राजांना म्हणाले शिवाजीचा बीमोड करून तुम्ही माघारी यावे. तुमचे बरोबर दिलेर खानासहि आपल्या मदतीला दिले आहे.

त्याप्रमाणे मिर्झा राजे ८०,००० स्वार, ५००० पठाण, बरोबर दिलेर खान अशा फौजेसह येत असलेले नजरबाजांनी सांगितले. त्यांत ती फौज दक्षिणेत आल्यावर पुणे-सुप्यात पसरलेली फौज धरतां फौजेचे बळ एक लाखांवर जाईल.

दरम्यान राजांनी ऐश्वर्यसंपन्न अशा बसनूरवर चढाई करण्याचे ठरविले. राजांचे आरमार आतां खूप मोठे झाले होते. कोळी लोकांनी भरपूर तरांडी-गलबते समुद्रांत उभी होती. जहाजांवर राजांची फौज चढली. राजांनी आज्ञा दिली. नांगर उचलले

गेले. शिडे फरारू लागली. गलबतावरचे झेंडे डौलाने फडकू लागले. राजे मोरोपंतांना म्हणाले,

"पंत, या सागरात आमची शेकडो गलबते हिंडायला हवीत. परकियांपासून आमचे भूमीचे संरक्षण करण्यासाठी ती ताकद वाढविली पाहिजे.' गोव्याहून आरमार जात असता फिरंगी भयचकित नजरेने ते पहात होते. राजांच्या आरमाराला कोणीही विरोध केला नाही.

बसनूर निद्रेतून जागे होतानाच "शिवाजी आला, शिवाजी आला" अशी हाकाटी उठली. बेसावध बसनूरची सावकाशपणे लूट करून संपत्ती गलबतांवर टाकून राजे गोकर्ण-महाबळेश्वर येथे आले. नंतर कारवार दौरा. तेथे शेरखान होता परंतु त्याचेजवळ फौजफाटा नव्हता. त्याने आपल्या बुद्धीचा वापर करून ठराविक व्यापाऱ्यांना गाठून खंडणी करून राजांच्या ताब्यांत दिली. परंतु इंग्रजांची गलबते राजांच्या स्वाधीन करावीत म्हणून शेरखानास निरोप दिला.

कुडतोजी गुजर व रघुनाथपंत कोरडे यांनी मिर्झा राजांच्या हालचालीबद्दल हकिगत सांगितली. मोरोपंत पेशवे यांनी राजाच्या फौजफाट्याविषयी काय तरतूद केली याबद्दल राजांना अहवाल दिला. मोरोपंतांनी फौजेसाठी उत्तमोत्तम घोडे खरेदी केल्याची बातमी दिली. सुलक्षणी घोडे निवडलेले पाहिल्यावर राजांनी त्यांची वाखाणणी केली.

मिर्झाराजांना कबजा देऊन जसवंतसिंग दिल्लीस परत गेला आहे. मिर्झाराजांच्या बरोबर त्यांचा पुलग किरतसिंग आहे. मदतीला अनेक मोठे मोठे सरदार राजे आहेत. दिलेरखान, दाऊदखान, राजा जयसिंग, सिस्तेदिया, इनायतखान, राजा सुभानसिंग बुंदेला, तिरुमल, जबरदस्तखान, बकरंदाजखान, कुबतखान, मित्रसेन, इंद्रसेन बुंदेला असे अनेक सरदार असून त्यापैकी अनेक नौबत-नगर याचे मानकरी आहेत.

मिर्झाची एवढी तयारी बघून राजांनी गडावर भर व्यवस्था आहे किंवा नाही याबद्दल चौकशी केली. तानाजी व चिमणाजी म्हणाले कोंढाण्याची काळजी करू नये. दारूगोळ्यासह सर्व जय्यत तयारी केली आहे. आता पुरंदराची काळजी होती. पण पुरंदरावर मुरारबाजी देशपांडे आपली फौज गोळा करून हजर झाले होते. राजांच्या खास विश्वासाची जी माणसे होती, त्यापैकी मुरारबाजी देशपांडे होते.

ओठावरल्या गलमिश्या, उन्हाने करपटलेल्या चेहऱ्यावर चमकणारे तेजस्वी डोळे, कमाविलेल्या पोलादी शरीराचे मुरारबाजी राजांची आज्ञा ऐकण्यास उतावीळ झाले होते. राजांनी किल्लेदारास व मुरारबाजींस आज्ञा केली.

"मुरारबाजी, मिर्झा राजे आमच्या पारिपत्यासाठी रणांगणांत उतरले आहेत. बहुतेक प्रथम पुरंदरवर चढाईची सुरुवात होईल अस कयास आहे. मिर्झा राजांचे सैन्य, ताकद अफाट आहे. आणि त्याच्याविरुद्ध गड लढविण्याची जोखीम तुमची आहे."

"महाराज जोपर्यंत गडावर मुरारबाजी आहे तोपर्यंत गडावर शत्रू येणार नाही याची मी खात्री देतो. चढाई लांबली तर जादा दारूगोळा पाठविण्याची व्यवस्था करावी."

मिर्झा राजांना राजेसाहेबांच्या मुलुखात लुटालूट करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे सुपे, जुन्नर, लोणी, पुणे, शिरवळ याठिकाणी आपले सरदार ५/१० हजार सैन्यानिशी पाठविले. बारा मावळांत हाकाटी उठली. दिवस-रात्र घोड्यांच्या टापांनी परिसर हादरून जाई. राजांच्या सर्व मुलुखावर शाही वरवंटा फिरविला गेला.

दिलेरखान गडावर जाऊन झुंज देत होता. पण त्यांत यश येत नव्हते. मागून मिर्झा राजांची फौज त्याला मिळाली. गडावरून प्रतिकार भारी पडत होता. मावळ्यांनी खंदकांतील तीन मोगली तोफा रंजुकीच्या भोंकांत खिळे ठोकून निरुपयोगी करून टाकल्या होत्या.

मोरोपंत, रघुनाथपंत कोरडे, आण्णाजी दत्तो, नानाजी, येसाजी, कुडतोजी गुजर, आनंदराव हे क्षणोक्षणी अस्वस्थ दिसत होते. शेवटी रघुनाथपंत राजांस बोलले की मिर्झा राजांशी सल्ला करावा. कुडतोजी गुजर यांनी शत्रुगोटाची बातमी काढून आणल्याने त्यांना मोरोपंतांचे हस्ते "प्रताप राव" असा किताबत त्यांना देऊन सन्मान केला. तेवढ्यांत तानाजीने बातमी आणली की पुरंदरावरील वज्रगड तेरा दिवसांतच पडला. मिर्झा राजांशी परत बोलणी करावयाचा विचार राजांच्या मनांत आला. पण त्यांच्याकडून योग्य प्रत्युत्तर मिळाले नाही. मिर्झा राजे वळत नव्हते. त्यांना संपूर्ण शरणागतीच पाहिजे होती. शेवटी राजांनीच मिर्झा राजांना भेटण्याचे ठरविले. एकदाचे ते समोरासमोर आले. एकमेकांना भेटले. शांतपणे व स्मितवदनाने राजेंचे लक्ष मिर्झा राजांकडे गेले. पराजय स्वीकारतांनाही आपल्या बेगुमान गहिरी नजरेने आव्हान देणारा तरुण मिर्झा राजे प्रथमच बघत होते. परंतु हिंदू असून सुद्धा ते बादशहाचे

आज्ञाधारक असल्याने त्यांचे मनांत काय आहे ते राजांना ताबडतोब उमगले. तोफांचे आवाज सारखे येतच होते त्यांत पुरंदरचा बुरूजहि ढासळला होता व खिंडार पडल्याचे राजांनी पाहिले. त्यांचे मन विषण्ण झाले. मिर्झा राजांनी किरतसिंगला पाठवून तातडीने दिलेरखानाकडे हल्ला थांबविण्याची आज्ञा केली. रघुनाथपंत कोरडे समोर आले. राजांना त्यांना सांगितले की लढाई थांबविली नसून मुरारबाजी देशपांडे लढाईत कामी आल्याचा निरोप दिला. राजे सुन्न झाले. कोरड्यांना म्हणाले मुरारबाजी कसे पडले हे मिर्झाराजांच्या ऐकायचं आहे. तेवढं सांगा.

"महाराज, मी मुरारबाजीं बरोबरच होतो. शत्रूनं सुलतानढवा केला. बाजी तटावरून ते पहात होते. बाले किल्ला धोक्यात येतो हे पाहताच मुरारबाजींनी हिंमत उचलली. त्यांनी बाणे किल्ल्याचा दरवाजा उघडण्यास सांगून स्वतः पंधराशे मावळ्यांसह बाले किल्ल्याच्या बाहेर पडले. अचानक झालेल्या हल्ल्याने शत्रू बिचकला. मुरारबाजी त्वेषाने पुढे जात होते. गनीम मुरारबाजीची चाल पाहून दिलेरखानाने माघार घेतली. दिलेरखान आपल्या छावणीत गेला. मुरारबाजीची लढत पठाण फौजेवर चालून गेली. महाराज असा बहादूर आम्ही पाहिला नाही. खुद्द दिलेरखान समोर येऊन लढाई थांबविली. तो मुरारबाजीस म्हणाला, "तू खरा मर्दाना. अरे कौल घे. मी तुला कौल देतो. सरदारकी देतो."

"अरे जा! तुझा कौल म्हणजे काय? मी शिवाजीराजांचा शिपाई तुझा कौल घेतो की काय?

आणि मुरारबाजी खानावर चालून गेले. एकदम कापाकापी झाली. तेवढ्यांत एका नेमबाजाने बाण सोडला. बाणाने मुरारबाजीचा वेध घेतला. बाण आरपार गेला. मुरारबाजी पडला.

कोरडे थांबले. त्यांना जाण्याची अनुज्ञा राजांनी केली.

मिर्झा राजांनी रात्री तहाची बोलणी करू म्हणून महाराजांना सांगितले. तह झाला. इ. स. १६६५ तेवीस किल्ले व चार लक्षाचा मुलूख तहामध्ये बादशहाच्या पदरी पडला. राजांकडे ताब्यात अवघे बारा किल्ले राहिले. तह पुरा पाळला जाईपर्यंत संभाजी राजे मिर्झा राजांकडे ओलीस म्हणून राहतील असे ठरले.

मिर्झा राजांनी राजांना पन्हाळ्यावर फौज नेऊन कारवाई करावयास सांगितले. दोन तुकड्यात फौजेला सज्ज होऊन एक राजांकडे व दुसरी नेताजीकडे दिली

होती. नेताजीना पन्हाळ्याच्या पायथ्याशी हजर रहाण्यास सांगितले. त्यांना आदिलशाही मुलुख मारीत पन्हाळगड गाठायचा होता. राजांजवळ दोन हजारांची फौज होती. त्यापैकी एक हजार लोक कामी आले. राजांना फार मोठा धक्का बसला. नेताजी वेळेवर आले असते तरी एवढी प्राणहानी झाली नसती. नेताजींना त्यांनी हाकलून दिले.

पन्हाळगड आणि पराभव. राजांना वाईट वाटले. त्यांनी फोंड्याकडे वेढा मारला. परंतु आदिलशाहीकडून अधिक कुमक येताच तेथेहि माघार घ्यावी लागली. मिर्झा राजांनी आग्र्याला शिवाजीला यायला सांगितले. राजांना भीती वाटली. स्वराज्याचे काय होणार याची चिंता होती. मिर्झा राजांनी राजांना आश्वासन देऊन स्वराज्यांतील भागात कोणताही धक्का पोचणार नाही यांची त्यांना ग्वाही दिली. राजे राजगडावर आले आणि महालात मोरोपंत पिंगळे, सोनोपंत डबीर, जिजाबाई यांना बोलावून बातचीत केली. विश्वासातल्या सर्व माणसांना, म्हणजे तानाजी, येसाजी, प्रतापराव गुजर, फिरंगोजी नरसाळा, हिरोजी फर्जद, निराजी रावजी, त्र्यंबक सोनदेव यांना बोलावून राजांनी राज्याची निरवानिरव केली.

राज्याचा कारभार, मुख्यत्यारी जिजाबाईच्या हाती सोपविला, मोरोपंत पिंगळे, निळो सोनदेव मुजुमदार व नेताजीनंतर सेनापति बनलेल्या प्रतापराव गुजर यांना राज्यकारभार सांगितला. आरमाराचा सुभा दर्यासारंग दौलतखान आणि मायनाक भंडारी यांच्यावर सोपविला.

आग्र्याला जाताना राजाच्या बरोबर रघुनाथपंत कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर, मदारी मेहतर, बाजी जेधे, निराजी रावजी व सबनीस ही मंडळी जाण्याचे ठरले. राजे प्रथम औरंगाबादेस प्रयाण करते झाले. वाटेत राजे व शंभूराजांची स्वारी व त्याच्याबरोबरचा फौजफाटा व रुबाब पाहून सर्वांना कौतुकाचे भरते आले. पुढे दौलताबादला राजांची स्वारी आली. हिंदूंचे गतवैभव येथेच नांदत होते. मोगली वरवंट्यामुळे साम्राज्ये नष्ट पावली होती. राजांनी वाटेत घृष्णेश्वराचे दर्शन घेतले. दिवसेंदिवस वाटचाल सुरू होती. नर्मदात्र्यंबक पार करून आग्रा आले. रामसिंग त्यांची वाटच पाहत होता, आग्रा शहर अतिशय सुंदर होतेच त्यांत औरंगजेबाने समारंभ ऐश्वर्यात होण्याचे दृष्टीने खूप मेहनत घेतली होती. शहाजहान नुकताच मेला होता. औरंगजेबाचे बापाला कैदेत टाकल्याने जुने सरदार नाखूष होते. भावांची

बंडे मोडून त्यांना देहांत शासन करविले होते. बापाच्या विष प्रयोगाने मृत्यु घडवून आणून तो स्वतः तक्तावर बसला.

शिवाजीराजांना त्यांच्या माघारी दक्षिणेकडे काय काय घडामोडी चालल्या असतील त्याविचारांनी त्यांचे मन त्रस्त झाले. अंताजी, मोरोपंत, प्रतापराव, तानाजी वगैरे मंडळी स्वराज्याचा तारू संभाळतील काय? जिजाबाई कोणत्या अडचणीत आहेत कां? त्यांनी पराजय व परमेश्वरी वरदान ह्या गोष्टी वीरपुरुष धैर्याने सहन करतात, लाक्षागृहातून पांडव सुटतात, कंसाच्या बंदेशाळेतून वासुदेव श्रीकृष्णाला सुरक्षितपणे बाहेर काढतात. त्यांच्याच कृपेने पहारेकऱ्यांना निद्रा लागून कुलुपाचे बंध तुटले, भरल्या नदीने वाट दिली. राजांना या विचाराने समाधान वाटले. जणू त्यांना त्यांच्या सुटकेचा मार्ग दैवयोगाने पुढे आला. प्रथम त्यांनी रामसिंगला शिवाजीला जामिनकीतून मोकळे करण्याची औरंगजेबाकडे विनंती करावयास सांगितले. ती त्याने मानली.

◆ ◆ ◆

प्रकरण ६

आग्रा भेट, कोरडे, डबीर कैदेत - नंतर सुटका मिर्झाचा मृत्यू ... शिवराज्याभिषेक

थोडेच दिवसांत राजांची तब्येत बिघडल्याची बातमी पुढे आली. हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर हे दोघेजणच राजांच्या जवळ होते. प्रकृतीला आराम पडावा म्हणून साधुसंत, देवस्थाने, बादशहाचे वजीर, यांना मिठाई पाठविण्याचे राजांचे मनांत आले. त्याप्रमाणे दररोज मिठाई वाटली जात असे. राजा विठ्ठल दासाची हवेली पुरी होत आली होती. शिवाजीला त्या हवेलीत हलवून तिथेच त्याचा वध करून पुरण्याचे औरंगजेबाने निश्चित केले होते. याची बातमी रामसिंगालाही होती. रामासिंगाने राजांशी पूर्वी चर्चा झाल्याप्रमाणे अंतिम क्षणाचा संकेत सांगितला.

लगेच राजांनी आपल्या माणसांना इशारत केली. **टोपली** तयार आहेत काय याची चौकशी केली. राजांनी हातातले कडे व कानांतले चौकडे हिरोजीकडे दिले. राजांनी वेष बदलला. राजे व संभाजीराजे पेटाऱ्यांत बसले. मिठाईने ते झाकून घेतले. पहारेऱ्यांनी ते बाहेर तपासले. पेटारे पुढे गेले.

नागमोडी गल्ल्या ओलांडत राजे एका घरातं घुसले. दार बंद झाले. बाळराजे मथुरेला गरीब ब्राह्मणाकडे वाटचाल करू लागले. राजांचा वेगळा मार्ग होता.

कैदखान्यांत हिरोजी फर्जंद पडद्याकडे तोंड करून पांघरूण घेऊन झोपला होता. मदारी पाय चेपीत होता. मंचकावर जिरेटोप व तलवार दिसत होती. रात्र चढत होती. राजांनी जेवणहि नाकारले होते कण्हण्याचा आवाज ऐकूं येत होता. हिरोजीने राजांचे कपडे बदलले. व त्यांचे स्वतःचे कपडे घालून तयार झाला. मदारीला घेऊन दोघेजण बाहेर पडले. पहारेकऱ्यांना ते म्हणाले राजांना रात्रभर झोप नाही. औषध घेऊन येतो. तो पर्यंत त्यांना त्रास देऊ नका.

एवढ्यात फुलादखान आला. त्याने पांघरूण उलगडून पाहिले तर काय? महाराज जागेवर नव्हते. "या अल्ला, शैतान भाग गया" १७ ऑगस्ट १६६६ रामसिंग व

फुलादखान दोघांच्याही माना अडकल्या. रामसिंग तडक दरबारी गेला. औरंगजेबास रामसिंग येताना पाहून समाधान वाटले. शिवाजीचा तो अखेरचा दिवस होता. सायंकाळी शिवाजीस विठ्ठलदासाच्या हवेलीत समाधी मिळणार होती.

रामसिंगाने शिवाजी नाहीसा झाल्याची बातमी दिली. औरंगजेबाने चारहि वाटांनी शिवाजीचा शोध घेण्याची व आग्र्यातील घर न् घर तपासण्याची आज्ञा दिली. रामसिंगाचे पहारेकरी पकडले गेले. त्यांना दमदाटी देऊन झाली. आग्र्याच्या झडतीत रघुनाथपंत कोरडे व त्र्यंबकपंत डबीर हे मात्र अडकले. त्या दोघांचा पुष्कळ छळ झाला. कवी परमानंदहि धरपकडीत सांपडले.

फुलादखानाने रघुनाथपंत व त्र्यंबकपंताचा अतोनात छळ केला. ते दोघे मेव्हणे-मेव्हणे होते. सर्व लटपटी-खटपटी राजांच्या आज्ञेनुसार व त्यांच्या सुटकेची व्यवस्था करणारे दोघे हुशार वकीलच सापडले. त्यांनी शिवाजीच्या सुटकेमागे रामसिंगाचा हात होता. ही फुलादची शंका होती. जबाबासाठी दोघांचा अनन्वित छळ केला. नाकपुड्यात मीठाचे पाणी घालून आसूडाच्या फटक्याने मारहाण करूनही दोघेजण कोणाचे नाव घेईनात. पुरेपुर साडेसात महिने (२०-८-१६६६ ते ३-४-१६६७) दोघांनी मरणप्राययातना सहन केल्या.

रामसिंगची मनसब काढून घेणेत आली. नेताजीला कैद करून पाठविण्याचा हुकुम मिर्झा राजांना पाठविला.

राजांनी व त्याच्यासोबत असलेल्यांनी बैराग्याचा वेष घेऊन हळूहळू सर्व आग्राबाहेर पडले. मथुरेस पोचले. मोरोपंत पिंगळ्याचे मेव्हणे कृष्णाजीपंत मथुरेस होते. त्यांचे भाऊ काशीराव व विसाजीपंत यांनी संभाजीराजांची जोखीम स्वीकारली. राजे कृष्णाजी पंतांना भेटले. ब्राह्मणवेशांतील संभाजीराजे त्या बैराग्याना पाहून चकित झाले. राजांची ओळख पटली. राजांनी संभाजी राजांना मथुरेस ठेवले. आपण मुलुखात गेलो की दूत पाठवूं, मग संभाजी राजांच्या सह कृष्णाजींनी यावे असे ठरवून राजांनी मथुरा सोडली. राजे काशीच्या वाटेला लागले. नंतर राजगडाकडे परतू लागले.

मोरोपंत दफ्तरी बसले होते. त्यांना भेटण्यासाठी एक जासूद आला. त्यांनी स्वाराला भेटण्यासाठी परवानगी दिली. मोरोपंत धावले. त्यांनी महादेवला कडकडून मिठी मारली. महादेवाने राजे सुरक्षित आहेत व तुम्हांस ही बातमी कळविण्यासाठीच

पाठविले असे सांगितले. मोरोपंतांच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या होत्या. जिजाऊंच्या कानावर ही आनंदाची बातमी सांगितली. तोफाचे आवाज झाले. देवासमोर सर्वांनी मस्तके टेकली. नमस्काराने सर्वांचे हात जोडलेले दिसत होते. जणू परमेश्वरानेच त्यांना मार्ग दाखविला.

राजांची नजर प्रतापराव, आनंदराव, तेलंगराव, अनाजी, बाळाजी, मोरोपंत यांवरून फिरली. राजांचा कंठ भरून आला म्हणाले, तुमचे अनंत उपकार आमच्यावर आहे. आम्ही शत्रू घरी सापडलो, कैद झालो अनेक मास लोटले. तरी राज्याची घडी एवढीही बिघडू दिली नाही. मोरोपंतास ते म्हणाले ही एवढी तुमची ताकद असल्यावर राज्य उभारणीसाठी माझी ही गरज लागणार नाही. जिजाबाईंना राजांनी शंभुराजे सुरक्षित असल्याचे सांगून मथुरेस एका ब्राह्मणाकडे त्यांना ठेवण्यात आलेचे सांगितले. अचानकपणे हिरोजी व मदारी महालांत आलेले पाहून राजांना अत्यानंद झाला. त्यांचा मोठा सत्कार करण्याचे राजांनी ठरविले. रघुनाथपंत कोरडे व त्र्यंबकपंत डबीर मात्र आग्र्याच्या कैदेतच होते. त्यांचेबरोबर कवी परमानंद व पंडित कलश होते. त्यापाठोपाठ संभाजीराजेपण येताहेत अशा बातम्या आल्या. राजे त्यांच्या अश्वपथकासह राजगडाहून तातडीने निघाले. दोनदिवसाने संभाजीराजे येणार असल्याचे त्यांना ठाऊक होते. जिजाबाईंनी बाळराजे समोर येतांच मोरोपंत पेशव्यास सोन्याच्या मोहरा ओवाळून टाकण्याबद्दल सांगितले. कृष्णाजीपंतांस यांना ''विश्वासराव'' हा मानाचा किताब दिला. त्यांच्या बंधूंचाही मान केला. पन्नास हजार रुपये बक्षीस कृष्णाजीपंताच्या व त्यांच्या मातृश्रीच्या पदरी घातले. मातबर लोकांत आसामी घातली, मोकसे दिधले. नांवाजिले हे दानपत्र आज उपलब्ध आहे. ते खाली उद्धृत केले आहे. जिजाऊंच्या पायावर मस्तक ठेवल्यावर त्यांनी बाळाराजांचा टोप काढला. संजाब राखलेले मस्तक, गुडघ्यापर्यंत पंचा, अंगावर छोटं उपरणं. हा प्रकार पाहिल्यावर राजांनी मोरोपंत, कृष्णाजीपंत, केसोत्रिमल यांना बोलाविले. कृष्णाजीपंतांच्या पत्नी पार्वतीबाई आणि काशीनाथपंतांच्या पत्नी लक्ष्मीबाई पण होत्या, त्याची ओळख राजांनी करून दिली व सांगितले, की

''मासाहेब, या सर्वांचे उपकार या जन्मी फिटणार नाहीत! मोरोपंतांचे मेव्हणे कृष्णाजीपंत, हे मथुरेलाच असतात. त्यांचे भाऊ काशिपंत या सर्वांनी

संभाजीराजांचा आपल्या घरी सांभाळ केला. बाळाराजांना जीव मोलाने जपले. हे कृष्णाजीपंत आम्हाला वाराणशीपर्यन्त सोबतीला आले आणि ह्या केसो त्रिमल यांनी बाळराजांना इथवर आणलं. ज्यांनी बाळराजांना आम्ही बरोबर नसतांनाही मथुरेत पोहोचविलं. ते कवी कलश मात्र आज औरंगजेबाच्या हाती आहेत.'' राजांनी सांगितले की बाळराजांना मथुरेस पोचविल्यानंतर परत आग्र्यास येतांना ते बादशहाच्या हाती लागले.

राजांनी मोरोपंत पेशव्यांना बोलावून सांगितले की रघुनाथपंत व त्र्यंबकपंत डबीर बादशहाच्या हाती सुखरूप आहेत व त्यांना इथे आणण्याची आमचे प्रयत्न आहेतच. काळजीचे कारण नाही. औरंगजेब व मिर्झा राजे यांची पुढील काय हालचाल होणार आहे त्याबद्दल राजांना काळजी वाटत होती. बाळाजी कावजी व मोरोपंतांना त्यांनी बोलावले. मध्यंतरी खर्च झाल्यामुळे आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती. फौज उभी करून ताकद वाढविणे ह्याचाहि विचार करावयास पाहिले. राजे मजकूर सांगत होते. बाळाजी लिहून घेते होते. स्वराज्य राखायचे तर मुलुखाचा बंदोबस्त केला पाहिजे. भक्कम तटबंदी व्हायला हवी. मालवण व जंजिऱ्याची कामे चालू होतीच. राजांच्या आग्र्याला जाण्यामुळे त्यांत खंड पडला नाही. तसेंच भक्कम तटबंदी असलेला गड माऱ्याला दाद देत नाही. राज्याचंहि तसंच आहे. मिर्झा राजांनी मनुची सारखा माणूस तोफखान्यावर कां ठेवला. हे आम्ही येथेच शिकलो.

पायदळ, घोडदळ व आरमार अशी फौजेची नवीन विभागणी ठरवून मोरोपंतांच्या साह्याने मंडळी फडांत काम करू लागली होती. दसरा होतांच फौजेने कूच करावे. आठ महिने परमुलुखांत पोट भरावे. खंडण्या घ्याव्यांत. पावसाच्या सुरुवातीस फौजेने आपला मुलुख जवळ करावा. लष्करात असतांना कोणीही बायको बटीक अथवा कलावंतीण जवळ बाळगूं नये. जो बाळगील त्याची गर्दन मारली जाईल. लुटीचा माल लपवील, त्यास कडक शिक्षा केली जाईल.

लष्कराच्या आणि आरमाराच्या व्यवस्थेत कसर राहूं नये. याची दक्षता राजे घेत होते. राजांची कल्पना साकारली जात होती. साऱ्या गडांना ते भेटी देत होते. फौजेच्या निरनिराळ्या तुकड्यांची ते पहाणी करीत होते. बळ वाढत होते. ताकद वाढत होती.

राजे मालवणचा जलदुर्ग पाहून आले. समुद्रातूंन मान वर काढणारा तट त्यांनी डोळे भरून पाहिला, अपार कष्ट करणाऱ्या लोकांचे त्यांनी कौतुक केले. समुद्रात तरांडी, गलबते, मचवे, दुबारे, संगमिऱ्या अशा अनेक जातीच्या नौका तरंगत होत्या. राजे राजगडावर आले. औरंगजेबाच्या बातम्या त्यांच्या कानांवर येत होत्या. मिर्झा राजांच्या दक्षिणेतल्या पराभवाने अस्वस्थ झालेला औरंगजेब उत्तरेला अफगाण बंडाव्याने दिवसेंदिवस त्रस्त होत होता. ती गोष्ट राजांना अनुकूल वाटत होती. औरंगजेब आपला तह मान्य करील याबद्दल राजांना विश्वास दुणावला. राजे महालात जाणार तोंच सेवक धांवत आला. त्याने बातमी आणली

''महाराज, रघुनाथपंत कोरडे व त्र्यबंकपंत डबीर आले. राजांनी त्यांना डोळे भरून पाहिले. त्यांच्या रूपांत फार बदल झाला होता. न सांगताहि औरंगजेबाने केलेला छळ त्यांचा चेहरा सांगत होता. दोघांनी राजांपुढे मुजरे केले. राजांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाट वहात होते. त्याचे त्यांना भान नव्हते. स्वतःला सावरीत राजे मोरोपंतांना म्हणाले,

''पंत, उरलेले आमचे दोन मोहरे काळाच्या दाढेतून सुटलेले पाहण्याचे भाग्य लाभत आहे. राजांनी रघुनाथापंताना ते थकले असल्यामुळे त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला. पण रघुनाथपंतच राजांना एक आनंदाची बातमी देणार होते. म्हणजे औरंगजेबाने राजांच्या तहास मान्यता दिली.

रात्री जिजाबाईच्या महालांत सारी मंडळी बसली होती. रघुनाथपंत कोरडे व त्र्यंबकपंत डबीर आपली हकिकत सांगत होते. औरंगजेबाने पकडून ठेविल्यापासूनची हकिकत रघुनाथपंत ऐकवीत होते. औरंगजेबाने छळाच्या गोष्टी अैकून साऱ्यांच्या मनाचा थरकाप उडत होता. धर्मांतरासाठी औरंगजेबाने दोघांवर टाकलेले पाश ऐकून साऱ्यांना चीड आली होती. स्वधर्मासाठी प्रत्यक्ष मृत्युच्या उंबरठ्यातून जायला सिध्द झालेली चर्या. साऱ्यांनाचा त्यांचा अभिमान वाटला. रघुनाथपंतांनी नेताजी पालकरांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्याचे सांगितले. राजे विषण्ण झाले.

राजांनी मोरोपंतांना बोलावून फौज गोळा करून .. किल्ल्यावर चाल करण्यास सांगितले. आश्चर्याची .. म्हणजे .. खान व खुद्द राजांचे सावत्रभाऊ एकोजीराजे गडाला वेढा टाकून होते. दुसरे दिवशी राजांच्या सैन्याचे आदिलशाही फौज मारून

रांगणा जिंकला. या पराक्रमाने फौजेची क्षमता दिवसेंदिवस वाढतच चालली. नवीन शस्त्रे तयार होऊ लागली. फौजेत नव्याने भरती सुरू झाली. घोडदळांची संख्या वाढली. पुढची लढाई कोकणभागांत कुडाळ सावंताची लढाईची. समोर सेवकाने मोरोपंतांना एक बातमी सांगितली. **मिर्झाराजे जयसिंगाच्या मृत्यूची मोरोपंत सांगत होते की मिर्झा राजांचा मृत्यू नैसर्गिक झाला नाही. अमावास्येच्या दिवशी त्यांचा बऱ्हाणपूर येथे विषप्रयोगाने अंत झाला,** मिर्झा राजांचे अस्तिव औरंगजेबास परवडणारे नव्हते. बापाला व भावाला मारून तो गादीवर आला. राजनिष्ठेपायी मिर्झांचा राजकारणाने बळी गेला. मिर्झा राजांना औरंगजेबाच्या राजनीती विषयी व त्याच्या अंतःस्थ हेतुविषयी जरी कल्पना आली असती व एकनिष्ठ राहूनसुद्धा बलाढ्य हिंदू राजांना कसे नंतर वागविले जाते याची कल्पना आली असती तर राजे शिवाजी यांच्याशी हातमिळवणी करून जो अपमानकारक तह झाला, तो झाला नसता व हिंदुस्थानचे राजकारण थेट काश्मीरपर्यंत एकसंघ झाले असते, औरंगजेबास मिर्झांच्या मृत्युने जरी बरे वाटले तरी **दक्षिणेची सुभेदारी दिलेले मुअज्जम व त्यांचा सेनापति जसंवतसिंग मात्र अस्वस्थ झाले. या दोघामध्ये शिवाजीशी लढण्याची ताकद नव्हती.** मुअज्जमाने तातडीने शिवाजीची शिफारस केली. औरंगजेबाने सारा विचार करून ते मान्य केले. त्याप्रमाणे खलिता राजगडावर आला. त्यानुसार बाळराजे प्रतापराव गुजरांबरोबर मनसब स्वीकारणेसाठी औरंगाबादेस जावयाचे ठरले.

संभाजी राजे रवाना होताच राजांनी आपले जासूद कोकणांत व गोव्यांत रवाना केले. येणारी वार्ता राजे ऐकत होते. रांगण्याच्या पराभवाने धास्ती खाल्लेल्या आदिलशाहीने राजांशी मित्रत्वाची तहाची बोलणी सुरू केली होती. राजांनी अंतःस्थ तह करून टाकला. आदिलशाहीने अनेक अटींबरोबर तीन लक्ष रुपयांची खंडणीही मान्य केली.

संभाजीराजे मनसब स्वीकारून मोठ्या मानाने राजगडावर परत आले. ते आतां मोगली दरबाराचे पंचहजारी मनसबदार झाले होते. निराजीपंतांनी बाळराजांच्या जहागिरीचा सर्व तपशिल सविस्तरपणे घेतला. व त्यासोबत वऱ्हाड देशाचा पंधरा लक्ष होनांचा मुलुख जहागीर म्हणून दिला आहे.

कोकणच्या देसाईं बारदेशात गेल्यावर राजांनी बारदेशांतच फौज पाठवून तीन दिवसांत खेडी जाळून बेचिराख करून, पोर्तुगाज सैन्य व आरमार यांची तमा न करतां तेराशे लोकांना कंठस्थान घातले. देसाई तहास ठाकले. राजांचा हेतु सफल झाला. बारदेशामध्यें वाढत्या धर्मांतराला पायबंद बसला. इंग्रजांनाही धास्ती वाटली. आदिलशाही व मोगलाई यांच्याशी .. असलेल्या शिवाजीची इतराजी देईल या हेतूने त्यांचे वकील स्नेहासाठी गडावर वारंवार येऊ लागले.

त्यानंतर गोवा व जंजिरा किल्ल्यावर चढाई झाली. पण त्यात यश मिळू शकले नाही. त्यानंतर कोंढाणा किल्ल्यावर चढाई करण्याचे ठरले. तानाजीने सांगितले. "कोंढाणा" घ्यावयाचे माझे काम. राजे म्हणाले कोंढाणा सर झाल्यावर खुणेची गंजी पेटल्यावर मी जागेवर राहीन. रोहिडखोऱ्यांतले मावळे गोळा करून उदयभानूसारख्या कडव्या राजपुत्राच्या जागता पहारा असलेल्या गडाशी झुंज घेणे. महाकठीण काम होते. नवनीत मावळे गडावर जाऊ लागले. मध्यरात्री मोरोपंताची साद आली ते म्हणाले राजे, गड घेतला, फत्ते झाली. सूर्योदयास राजे गडावर पोचले. खालच्या मानेने राजांचे स्वागत केले. तानाजी व उदयभानू दोघेहि लढता लढता मृत्यु पावले.

८ मार्च १६७० रोजी निळोपंत मुजुमदारांनी छापा घालून पुरंदर फत्ते केला. गडावरचा मोंगली किल्लेदार शेख रझिउद्दिन पंतांच्या हाती जिवंत सांपडला. त्याला पंतांनी महाराजांकडे रवाना केले. मुरारबाजी देशपांडे यांचा प्यारा पुरंदर पुन्हां स्वतंत्र झाला. पुन्हा सर दरवाज्यावर नाईकांची ढाल तालेवारीने चढली. पण एक गोष्ट मोठी वाईट झाली. **महाराजांचा एक तरूण सरदार केसो नारायण-नांदोशीकर देशपांडे गडावरच्या लढाईत ठार झाला. शिवापूरच्या (खेड) व नांदोशी येथील नारोपंत देशपांड्यांचा हा मुलगा. झुंझाझुंजीत पडला. कुळी उद्धरली पोराने जणूं. पुरंदरगड पुन्हां स्वराज्यांन दाखल केल्याची खबर मुरारबाजीला देण्यासाठीच त्याचे स्वर्गावर घोडा फेकला.** स्वराज्याच्या सौभाग्यासाठी मराठ्यांच्या किती लेकी सुना विधवा होत होत्या. अशा गणती नाही इतिहासाला हिशेब माहित नाही. स्वराज्यांचा झेंडा भगवा होता. पुरदरांवर हाच झेंडा असावा या हट्टासाठी दोन देशपांड्यांनी प्राण दिले. पांच वर्षापूर्वी

मुरारबाजीने आणि आज केसो नारायण. नांदोशीकर देशपांडे याने (शके १५९१ फाल्गुन वद्य १२ मंगळवार म्हणजेच इ. स. १०/३/१६७०)

तिकडे माहुलीवर लढाई सुरू होती त्यांत मराठ्यांना विजय मिळाला नाही. नंतर कल्याण भिवंडीला मोगली अधिकारी आपल्या फौजेनिशी प्रतिकाराला उभे राहिले. परंतु राजांच्या फौजेपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. उझबंगखान ठार झाला. लोचीखान पळून गेला. कल्याण-भिवंडी काबीज झाली. दि. १५/३/१६७० राजांची फौज चांदवडकडे वळली. चांदवड साफ लुटले गेले. फौजदार फत्तेजंगखान पळून गेला. कर्नाळपण हस्तगत झाला. उन्हाळ्याच्या सुरुवातीला राजांच्या फौजेने अहमदनगर, जुन्नर, पारिंडा या प्रांतातील एक्कावन्न गांवे लुटली.

माहुली किल्ल्यावर किल्लेदाराने जादा फौज मागविली होती. ती न मिळल्याने राजांनी पुन्हा माहुलीवर हल्ला करून तो ताब्यांत घेतला. किल्लेदार अलावर्दी बेग व त्याचे दोनशे साथीदार राजांनी कापून काढले. माहुलीवर भगवा झेंडा फडकू लागला. महिन्याच्या अवधित राजांनी माहुली, कर्नाला, कोंढाणा, पुरंदर, कल्याण, लोहगड, हिंदोळा, रोहिडा हे गड ताब्यांत घेतले.

हा कारभार पहाण्यास राजे निलोपंतास म्हणाले की त्यांनी माहोलीपासून भीमगड पावेतो व इंदापूर, चाकण करोन या वतनाचा कारभार पहावा, पण निळोपंत म्हातारे झाले होते. तरी त्यांची तलवारीची मुठीची पकड ढिली झाली नव्हती; कारण त्यांना लढाई व राजकारण दोन्ही कळत होते. शेवटी राजांनी त्या कल्पनेला मान्यता दिली. तसेंच रायगड ही राजधानी करण्याचे ठिकाण योजिले. त्याखाली पाचाडला जिजाऊंसाठी वाडा बांधून दिला. रायगड बारकाईने पाहिल्यावर राजांनी हिरोजी, आबाजी व मोरोपंतांची विशेष स्तुती केली. राजकारणांत आणि युद्धकारणांत पारंगत तसाच "**प्रतापगड**" हे **मोरोपंतांचे श्रेय आहे असे म्हणाले.** दूरवर पसरलेली सह्याद्रीची शिखरे व निसर्गसुंदर मुलुख नजरेत भरत होता. जागा इतकी शांत की "ध्यानालाही" अप्रतिम. चार दिवस राजगडावर राहून राजांनी राजधानीचे अचूकपणे तांत्रिकदृष्ट्या मौलिक अशा इमारती, राजांचा वाडा, प्रधानांचे निवासस्थान, भव्य बाजारपेठ, जिमखाना, दारूकोठार, जगदीश्वरप्रासाद, पागा. राजे प्रसन्न झाले. तसेंच ईशान्येला लिंगाणा, पूर्वेला तोरणा, दक्षिणेला कांगोरा, चांभारगड, सोनगड, वायव्येला तळेगड, उत्तरेला घोसाळगड या सर्व मालिकेत रायगड! पूर्णपणे सुरक्षित. राजे म्हणाले काही गोष्टी अजून नव्याने

करावयास आहेत. त्या आत्ताच पूर्ण करून घ्या. पैशांची फिकीर करू नका. सुरत एवढी हातांत असतां काळजीचे कारण नाही असे मोरोपंतांना सुचविले. राजांच्या मनांत सुरतेत दिवाळी साजरी करण्याचे ठरले. फौजफाट्यास आदेश दिले. सुरतेची वाटचाल चालू राहिली. कल्याणचा सुभेदार मात्र बेफिकिरीत होता, सैन्य आल्याच्या बातम्या येऊनहि त्याला खरे वाटले नाही. ज्यावेळी फौजच दहा कोसांवर आली त्यावेळेस त्याचे डोळे उघडले. सुभेदार गियासरद्धीनची फौज होती. अवघी तीनशे. लोक मात्र चीजवस्तू टाकून पळू लागले. खाडखाड घोड्यांच्या टापांच्या आवाजाने सर्व समोरासमोर आपल्या अफाट वेगाने पुढे येत होता. सुभेदाराचे शर्थीचे प्रयत्न चालू होते. राजांनी सरदारांना लूटमारी करण्याचे आदेश दिले. टोपीवाले, वलंदेज वगैरे परक्या लोकांना हात न लाटीता लुटीत लक्ष केंद्रित करा असा सल्ला दिला. "हर हर महादेव" गर्जना झाली आणि पाहतां पाहतां अश्वदळाने सुरत वेढली सुद्धां. प्रचंड लूट जमा होत होती. इंग्रज आपल्या वखारींचे जुजबी रक्षण करत होते. डच व फ्रेंच हे तटस्थच होते. सर्व माल मराठ्यांच्या हाती सापडला. सोने, रुपे, जडजवाहिरे, माणके, रत्ने, रुपे, सोन्याचा पलंग इ. इंग्रजांकडूनहि तलवारी, सुऱ्या, भारी वस्तू वगैरे. ही सर्व लूट घेऊन घोड्यावर लादून राजे माघारी वळले. वार्षिक बारा लाखांच्या खंडणी देण्याचे कबूल करून घेऊन सुरत सोडली.

वणी-दिंडोरीची लढाई -.

महाराजांनी सुरत सोडली व लूटीसह ते पेठेस आले. सुरतेवर मराठ्यांचा छापा पडल्याची बातमी मुअज्जमला समजली. पण स्वतः त्याने कांहीही हालचाल केली नाही. फक्त त्याने दाऊदखान कुरेशी यांना खबर कळवून शिवाजीवर चालून जाण्यास फर्मावले. महाराजही बागलाणांत पोचले. आपल्यामागे मोंगल फौज येत आहे अशी खबर मिळाली. लूट संभाळीत संभाळीत पुढची मजल मारायची असल्याने अशावेळी काळजी घेणे जरूर असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी वणी-दिंडोरीच्या मार्गाने पुढे हलले पाहिजे असा कयास बांधून रातोरात प्रवास करून जाण्याचे ठरले.

दाऊदचे हेर सांगतात की शिवाजी बागलाणांत जाणार. म्हणून दाऊदखान चांडवडकडे गेला कारण तेथूनच शिवाजी दक्षिणेकडे जाणे शक्य आहे अशी दाऊदची खात्री होती. १६/१०/१६७०. परंतु त्याने फौजेस लगेच निघण्याचा आदेश दिला.

रात्रीचे तीन वाजले होते. अंधारांत मोंगली सैन्य ढेपाळले होते. जरी मोंगली फौज व सर्व सरदार उत्तम दर्जाचे योद्धे होते तरी समोरच्या उंच टेकडावरून शिवाजीची दहा हजार फौज लढाईच्या तयारीने उभी असल्याचे दिसले. माहाराजांनी पांच हजार घोडदळाचे हशम, लुटीची घोडी व सामान पुढे मार्गी लावून दिले व आपण लुटीच्या पिछाडीस राहिले. स्वत: शिवाजी महाराज पट्टे चढवून आघाडीवर होते. त्यासाठी प्रतापराव गुजर, व्यंकोजीपंत, आनंदराव, नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे सरदार त्यांच्या पांच हजार घोडदळासह (शिवाजी दग्रेट, भाग १, विभाग २, पृष्ठ क्र ४७७ उंच (डच रेकॉर्ड). शि. भा. २२/२३.) शत्रूच्या समोर आव्हान देऊन शस्त्रे पाजळीत उभे होते. व बाकीची फौज पुढच्या हुकुमाची आदेशाची वाट पहात होते.

इखलासखान चवताळला होता. त्याने चाल केली व मराठ्यांवर चाल केली. घनघोर युद्ध भडकले. या रणक्षेत्रापासून वणी-दिंडोरी जवळच होती. वणीची सप्तशृंगी शिवाजीच्या पाठीशी उभी होती. इखलासखान त्याच्या मोंगली सरदारांसह आवेशाने लढत होते. मावळी तलवारी मोंगलीचे बळी घेत होत्या. मोंगली सैन्य हत्ती, घोडदळासह लढत होते. तिरंदाजी करीत होते. तिरंदाज किंवा भालाइत अचूक नेम धरून हत्तीवरल्या सरदाराच्या वेध घेई. तशाच तऱ्हेने मराठ्यांच्या बंर्कदाजाने इखलासखानाचा रिकामा हत्ती फरफटत महाराजांपुढे आणला.

आणि इखलासखान घोड्यावरून कोसळला तीव्र जखमा होऊन खाली आला. तेव्हा दाऊदखानाने राय मकरंद या सरदारास मराठ्यांवर सोडले. नारोपंत नांदोशीकर देशपांडे, आनंदराव, प्रतापराव गुजर, व्यंकोजीपंत व इतर मराठ्यांपुढे मोंगलानी चहूं बाजूंनी वेढले. त्यांनी केलेल्या तिरंदाजीने मोंगल सैन्य झपाट्याने खचले. मोंगली तोफखान्याच्या दरोगा मोर अबदुल मबूद याचा व मोंगलाच्या मुख्य सेनेचा संबंध तुटला. त्याच्यावर मराठ्यांनी हल्ला करून त्याला व त्याच्या दुसऱ्या मुलाला ठार केले. मात्र या धामधुमीत नारोपंत नांदोशीकर देशपांडे घायाल होऊन त्याचाही मृत्यू झाला. (शके १५९२ साधारण नामसंवत्सर, कार्तिक शुद्ध १४ (जो.श.), इ. स. १७/१०/१६७०.) तोफखान्याचे निशाण व घोडे मराठ्यांनी काबीज केले. दाऊदने माघार घेतली. महाराज तेथून कुंजरगडावर गेले. त्यानंतर रायगडावर दिंडोरीच्या लढाईत अजोड

यश मिळाले. पण त्यांत नारायण उर्फ नारोपंत सरदार यांचा मृत्यू झाला ही गोष्ट महाराजांना अतिशय लागून राहिली. याच नारोपंत नांदोशीकर देशपांडे यांनी प्रतापगडावर स्वतःचे पांच हजार घोडदळ घेऊन सेनापतीपद भूषविले होते. व विजय, संपादन करून अफझलखानांवर हल्ला होतांना शिवाजी महाराजांना साथ दिली होती.

तिकडून जासूदाने मोगल सरदार दाऊदखान येत असल्याचे सांगितले. इकडे राजे लुटीसह कांचना मंचना खिंडीतून उतरून चांदवड डोंगर पार केला. पायदळ व दोन हजार घोडेस्वार घेऊन लुटीसह तो माल राजगडावर घेऊन जाण्यास सांगितले. दाऊदखानाकडे चार/पाच हजार सैन्य होते, राजांजवळ पंधरा हजार सैन्य होते. त्यामुळे सर्व सैन्यानिशी समोरासमोर राजांचा स्पष्ट बेत होता. दाऊदखान दारावरच्या सैन्याशी लढत देऊन त्यांचा पराभव झाल्यानंतर पंतांच्या फौजेने मोगली तोफ खान्याचे निशाण व मबूदचे घोडे काबीज करून राजांच्या जवळ आणले. समोरून आलेल्या इखलास खानावर प्रतापराव तुटून पडले. इखलासखान घोड्यावरून खालीच कोसळला. मोगली फौज हदू लागली. **दिंडोरीच्या** या लढाईत राजांच्या फौजेने भारी पराक्रम केला होता. तीन हजारांहून अधिक मोंगली फौज कापली गेली. फौज हत्ती-घोड्यांसह वाटचालीस लागली. कुंजरगडावर मुक्काम झाला. पुढचे बेत चालू होते. तेवढ्यांत आनंदाची बातमी आली की मोरोपंतांनी, त्र्यंबकगडावर भगवे निशाण चढविले होते. दाऊदखानचा मुलगा अहमदखान व जसवंतसिंग यांच्यातील वैर विकोपास गेले. मुअज्जम व दिलेरखान यांच्या भांडणामुळे ते दोघेहि गाफील होते. या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन राजांनी कुंजरगडावर थांबून कारंजावर म्हणजे वऱ्हाडच्या राजधानीवरच हल्ला करून अफाट संपत्तीने भरलेले व्यापारी केंद्रच लुटले. वीस हजार फौजेनिशी ते वऱ्हाडपूरला गेले. जसवंतसिंग तेथे ठाण मांडून बसला होता म्हणून ते टाळून बहादूरपूर लुटले. मोरोपंत खानदेशात धुमाकुळ घालीत होते कारंजा येथील लूट येवढी मोठी होती की ती वाहून नेण्यास चार हजार बैल व गाढवे लागली. तसेंच व्यापाऱ्यांकडून वार्षिक खंडणीही कबूल करून घेतली. नंदुरबारजवळ चौथाई खंडणीची मागणी कबूल करून घेतली. लगेच मोरोपंतांचेहि सैन्य येऊन मिळाले. त्यामुळे विनासायास अहिवंत, खळा जावडा, मार्कंडा हे किल्ले राजांच्या पदरी आले. पुढे साल्हेर! शिवाजीने ते जिंकले समजल्याने

पहातांच व त्यात साल्हेरचा किल्लेदार ठार झाला. त्याच्या मेव्हणाने तो किल्ला राजांना देऊन टाकला.

राजे रायगडला आले. जिजाबाईंना समाधान वाटले. सुरतेची लूट, दिंडोरी, कारंजाची लूट या साऱ्या बातम्या त्यांना अगोदरच कळल्या होत्या. आता मोरोपंतांना कुडाळभागातून पायदळ घेऊन कुडाळ भागात येण्यास राजांनी सांगितले. सूर्यराव काकडे हे राजासह महाडलाच होते. मोरोपंत महाडमध्ये दाखल झाल्यानंतर रुपाजी भोसले, खंडोजी जगन्नाथ, मोरोनागनाथ असे वजीर-उमराव राजांच्या आज्ञेची वाट पाहात होते. साऱ्यांच्या मनात दिलेरखानाचा सूड उगवायचा होता. मोरोपंत राजांना म्हणाले की ते दिलेरखानावर चढून जाऊ इच्छितात. पुण्याला शह उठवायचा म्हटला तर प्रतापराव व आनंदरावांना वर घाटातून साल्हेरचा वेढा उठविण्यासाठी चालून जाण्यास आम्ही कळविले आहे. तुम्ही फौज घेऊन कोकणांत जा. दोन्ही बाजूंनी एकाच वेळी हल्ला चढवितांच साल्हेर मोकळे होईल व पुण्याचा शह लवकर सुटेल.

महाडच्या फौजेने साल्हेरकडे कूच केले. आनंदराव आपले घोडदळनिशी साल्हेरकडे निघाले. प्रतापराव कोकणातून येत होते. दोन्ही फौजा एकत्र होऊन आल्या व एल्गाराचा दिवस ठरला.


साल्हेरला पन्नास हजारांची मोंगली फौज वेढा देऊन बसली होती. ..खान वेढा देऊन बसला होता. इतरहि सरदार त्याचेबरोबर होते. तेवढ्यांत मराठे चालून समोरच आले. घनघोर युद्धाला सुरुवात झाली. दोन्ही बाजूंची हजारो माणसे पडली. मोगल सेनेला जीव वांचविता वाचवता पुरेवाट झाली. मोरोपंत, आनंदराव, प्रतापराव वगैरे उमरावांनी शिकस्त केली. या विजयांत मराठ्यांना सहा हजार घोडे, शंभरावर हत्ती व हजारो उंट मिळाले. तसेंच लक्षावधि रुपयांची जडजवाहिर, मालमत्ता, खजिना हाती आला. इरवलसखान पाडाव झाले. मोगलांचे बावीस नामांकित वजीर धरले. मराठ्यांचे सरदार सूर्यराव काकडे मात्र मृत्यु पावले.

मोरोपंत पेशव्यांनी साल्हेर पाठोपाठ मुल्हेरहि काबीज करून विजय संपादन केल्याचे पत्र राजांना जासूदांमार्फत दिले. राजांना अत्यानंद झाला. बाळाजींना त्यांची सोन्याचे कडे आणावयास सांगितले. जिजाऊंना राजांनी सांगितले की आमचे सेनापतींनी

मोरोपंत पेशव्यांनी थोर पराक्रम केला. साल्हेर व मुल्हेर दोन्ही जिंकून दिलेरखानाला पाणी चारले. युवराज राज्यकारभार पहातात यशाची वार्ता घेऊन येणाऱ्या जासूदाला सोन्याचं कडं चढविण्यास मान आज मोरोपंतांना द्यायला हवा.

साल्हेरच्या लढ्यांतील अपयशामुळे औरंगजेब दिलेरखानावर रुष्ट झाला.

◆ ◆ ◆



आग्रा-दिनांक २० ऑगस्ट १६६६ ते ३ एप्रिल १६६७- रघुनाथ बल्लाळ कोरडे व त्र्यंबकपंत सोनदेव डबीर (मेव्हणे-मेव्हणे) दोघे वकील. शिवाजी व संभाजी राजांच्या सुटकेची व्यवस्था केली म्हणून त्यांच्यावर फुलादखान (मोगल) याने साडेआठ महिने कैदेत ठेवून अत्याचार केले.



दि. २० नोव्हेंबर १६६६ रोजी संभाजी राजांचे रायगडला आगमन.
मथुरेतील कशी त्रिमल व लक्ष्मीबाई शिवाजी राजांनां भेटताना.



पुरंदर किल्ला- शके १५९१ फाल्गुन वद्य १२ मंगळवार दि. ८ मार्च १६७० यांचा केसो नारायण नऱ्हेकर देशपांडे शूर सरदार, (नांदोशीकर) पुरंदर किल्ला जिंकतांना मृत्यु



मौजे नांदोशी येथील वडजाई मंदिराचा आंतील भाग



नारायण उर्फ नारोपंत नांदोशीकर देशपांडे हे पंचहजारी घोडदळाचे सेनापती, अफजलखानाच्या हल्याच्या वेळी इ. स. १६५९-६० हजर होते. त्यानंतर शिवाजीमहाराजांसमवेत त्यांनी वणी-दिंडोरी लढाई जिंकली पण त्यात त्यांचा मृत्यु झाला. (कार्तिक शुध्द १४ शके १५९२ साधारण नामसंवत्सर) दि. वी. काळे पृष्ठ-१६६, जेधे शकावली शेजवळकर, शिवभारत २२ (२-४) डच् रेकॉर्ड-शिवाजी द ग्रेट, भाग-१ पार्ट-२, पृष्ठ ४७७.




शिवापूर येथील माध्यमिक शाळेचे पिछाडीस त्र्यंबक डबीर यांची समाधी
(पुण्यापासून २२ कि.मी.)




शिवापूर येथील माध्यमिक शाळेच्या आवारातील महादेव मंदिर. त्याच्या मागील बाजूस
त्र्यंबकपंत डबीर यांची समाधी




रामनगर- कसबे खेड शिवा
येथील राम लक्ष्मण सीता
यांच्या मुर्ति



खेड-शिवापूर
येथील शाळेच्या मागील
बाजूस असलेली त्र्यंबकपंत
डबीर यांची समाधी




खेड-शिवापूर येथील माध्यमिक शाळेच्या मागे असलेल्या कंपाउंड नजीक त्र्यंबकपंत डबीर यांची समाधि.(१० फूट X १० फूट आकाराच्या कोपऱ्यावर चार उभे दगडी स्तंभ असलेले)



खेड-शिवापूर येथील नऱ्हेकर देशपांडे यांचे जुने तीन मजली राहते घर.
(माध्यमिक शाळेसमोर)



कसवे खेड शिवापूर येथील छत्रपति शिवाजीराजांच्या सहकारी व्यक्तींची इतिहासप्रसिद्ध वास्तु



रामनगर (खेड-शिवापूर) येथील मुजुमदार यांच्या घराची इतिहासप्रसिद्ध वास्तु

प्रकरण ७

मोरोपंत पेशव्यांची चौफेर दौड ... छत्रपतीचे देहावसान

राजांच्या नव्या पराक्रमाने राजांची सत्ता वाढत होती. त्यामध्ये स्थिरता आणण्यासाठी राजे लक्ष देत होते. गड कोटांची दुरुस्ती करण्यासाठी दरसाल सव्वा लक्ष होन गंगाजळीत पडत होते.

मोरोपंत पेशवे कोकणांत मुलूखगिरी करीत होते, तर प्रतापराव गुजर वऱ्हाड खानदेशात धुमाकूळ घालीत होते. शिवाजी राजांच्या वाढत्या सत्तेची जाणीव इंग्रजांनाही झाली होती. सेनापति प्रतापराव गुजरांनी सुरतेकडे खंडणी मागितली होती, खंडणी दिली नाही तर, सुरत पुन्हा लुटण्याचीही धमकी दिली होती. प्रतापरावांकडून आलेल्या पत्रामुळे सुरत पुन्हां त्रस्त झाली. शिवाजीराजांकडून लिहिल्या गेलेल्या पत्रांत स्पष्टपणे उल्लेख केला होता की

"सरकारी जमाबंदीची चौथाई सुमारे चार लक्ष रुपये मला द्या. नाहीतर मी स्वत: येऊन वसूल केल्याखेरीज रहाणार नाही. तुमच्या बादशहाने माझा देश आणि माझी प्रजा यावर चढाई केली. त्याच्याशी लढाई करण्यासाठी मला सैन्य ठेवावे लागले. तरी त्या सैन्याचा पगार मला तुमच्याकडून वसूल करण्याखेरीज गत्यंतर नाही."

प्रत्यक्ष सैन्य जरी सुरतेत गेले नाही तरी त्या पत्राचा परिणाम मात्र दिसून आला. दक्षिणेची सुभेदारी महाबतखान व शहाजादा मुअज्जम या दोघांनाही औरंगजेबाने दिल्लीला बोलावून घेतल्याने दक्षिणेत फक्त दिलेरखान व बहादुरखान उरले होते. त्यांना चिंता वाटत होती की सुरतेवर पुन्हा हल्ला झाला तर? शिवाजीकडे त्यांनी तहासाठी वकील पाठविला. राजांची तहाची तयारी होती. पंरतु औरंगजेबाची नव्हती. राजांचे सैन्य मात्र नव्या जोमाने मोगलाईत लुटालूट करीत होते.

इकडे निराजीपंतांनीही गोवळकोंड्यास यश मिळवून खंडणीपैकी सहासष्ट हजार होन घेऊन ते राजांकडे गडावर आले. दुसरीकडे राजांच्या फौजा वऱ्हाड तेलंगणांत

लूट करून माल राजगडी पोहोचला गेला. यापुढे राजांनी आदिलशाही स्वारीचा बेत कायम केला. पुढील कारवाई पन्हाळा गडावर ठरली. ... पन्हाळ्याची मोहीम दिली गेली. त्यांत प्रतापरावांनाही मदत द्यायचे ठरले. परंतु यश मात्र निश्चित हवे होते. अनाजी दत्तो राजापूरला पोचले. त्यांच्या मदतीला कोंडाजी फर्जद यांना सुद्धां सांगितले. कारण अनाजींकडून महिन्याभरांत वेढा देऊन सुद्धा यश मिळाले नव्हते. दरम्यान मोरोपंत पेशव्यांनी नाशिक त्र्यंबकच्या काबीज केलेल्या मुलुखांतील लूट आणून गडावर पोहोचती केली. तोच समोरच्या झाडीतून हिरोजी इटलकर धांवत राजांकडे आला व पन्हाळा जिंकल्याची बातमी दिली. जासूदांना शंभर सुवर्णहोनांची बक्षिसी दिली व फत्ते मुबारदच्या तोफा गर्जू लागल्या. राजांनी जासूदाला कोंडाजींनी गड जिंकताना मेहनत घेतली हे सविस्तर सांगितले. मोरोपंत व मावळे गडाबाहेर होते व अवघ्या साठ मावळ्यांनी गडाचा तळ गांठून शिडीवाले, मेखीवाले, वाघनखवाले व शिंगवाले यांना सोबती घेतले. कोंडाजी कड्याला भिडले. एकमेकाला हात देऊन कडा पार केला व गड गांठला. दोऱ्या सोडून बाकी मावळ्यांस वर घेतले. रात्रीची वेळ होती. गस्तवाल्यास एकाने बाणाने टिपला व आवाज बंद केला. मग सर्वांनी मिळून कापाकापी सुरू केली. तोच मोरोपंत शिबंदीनिशी पुढे येऊन कोंडाजीने किल्लेदारांचे डोकं उडवलं. तोफेचा आवाज झाला. भगवा झेंडा गडावर उभा राहिला. कोंडाजीने राजांसमोर धनाच्या राशी ओतल्या. ते म्हणाले. गड अलगद हाती आला. गंगा-जमना अंबारखाने भरले आहेत. दारूगोळा व तोफखाना अलगद हाती आला. पन्हाळा हातून गेल्यामुळे खवासखान शिवाजीचा बीमोड कसा होईल या विचारांत होता. खान दहा हजार फौजेनिशी उंबराणीला आला. प्रतापरावांनी मिरजमार्गे फौजेला घेऊन उंबराशी गांठले. बहलोलखान तेथे तळ ठोकून उभा होता. जवळच एक पाणी पिण्याचा तलाव होता. प्रतापरावांनी खानाच्या छावणीची नाकेबंदी करून "हर हर महादेव" अशी गर्जना करून पाऊल पुढे टाकले. मराठ्यांच्या फौजेपुढे खानाचे चालले नाही. त्याचा हत्तीही त्यांच्या समोर होता. प्यायला पाणी नव्हते. प्रखर उन्हात फौजेचे अतोनात हाल होऊ लागले. अनेक सरदार कामी आले. खान शरण आला. प्रतापराव विरघळले. त्यांनी खानाला क्षमा केली. बहलोल खानास त्यांनी जाऊ दिले. राजांना हे आवडले नाही. कारण बहलोल खानास सोडणे म्हणजे आज ना उद्या तो उलटणारच अशी राजांची खात्री होती.

अन् प्रत्यक्षात तसेंच घडले. प्रतापरावांनी बहलोल खानाशी युद्ध केले त्यांत त्यांचा पराभव झाला. म्हणून आनंदराव फौज घेऊन बहलोल खानाचा पाडाव करूनच माघारी फिरले. जासूदाने तसा निरोपहि दिला. पण आनंदरावांनी शक्कल लढवून मोंगलाच्या प्रचंड फौजेशी सत्ता देण्याऐवजी शत्रुसैन्याला बगल देऊन आनंदराव सरळ कानडी मुलुखांत शिरले. बहलोल खानाची जहागीर, संपगांवचा बाजार आणि आदिलशाही मुलूख यांची होळी करून हजारो मैलांवरून अपार लूट घेऊन आनंदराव परतले. अगणित संपत्ति, पाचशे घोडी व दोन हत्ती घेऊन शंभुराजांनी गडावरून उतरून आनंदरावांचे स्वागत केले. या आनंदांत रायगडावर दुसरी विजयाची वार्ता आली. राजांच्या आरमाराने जंजिराच्या सिद्दीला सातवळीच्या खाडीत गांदून विजय संपादन केला. सिद्दी संबूळ जखमी होऊन पळून गेला. सिद्दीचे शंभरहून अधिक लोक कामी आले. या विजयावार्तांनी राजांना आनंद झाला.

केळंजा गडाची जबाबदारी हंसाजीकडे दिली होती. त्यांनी गडावर सुलतानढवा केला. तरफेची लढाई झाली. गंगाजी किल्लेदार त्यांत मारला गेला. गडावर भगवे निशाण लागले. हंसाजी मोहिते राजांचे सरनौबत बनले. त्यांना वस्त्रे, तलवार, शिरपेच बहाल केला गेला. त्यानंतर पंधरा वीस दिवस राज्याभिषेक करण्याचे कामी खर्च झाले. राजे छत्रपति झाले. राज्याभिषेकासाठी एक कोटी होन खर्च झाल्याचे मोरोपंत पेशव्यांनी राजांना सांगितले. पावसाळा असूनहि बहादुरखानाने सरकारी भरणा करावयाचे एक कोटी रुपये गोळा केले आहेत. त्याशिवाय बादशहांना नामांकित दोनशे घोडी द्यायचे ठरले असें वृत्त राजांना मिळाले. त्यांच्या आंत मोरोपंतांनी कल्याण-भिंवडीला जाऊन तळ करावा, वसईकरांकडून चौथाईची मागणी करावी. अनाजींनी फोंडा काबीज करावा. व राजांनी खुद्द बहादुर खानाची मोहीम हाती घ्यावी असे ठरले. यापुढे अष्टप्रधानांनी एकत्र येऊन विचारले. राज्याचे निर्णय घ्यावेत असे राजांनी सुचविले.

हंबीररावांनी दोन हजारांची फौज घेऊन खानावर चढून जायचे, त्याला झुलवीत दूर न्यायचे व पाठीमागे राजांनी आठ हजार सैन्यानिशी तयार राहून हंबीररावांचे सैन्य दूर गेल्यावर राजांनी छावणी फस्त करून परत फिरावे असा विचार केला. हंबीररावांना उद्देशून राजे म्हणाले की एक करोड होन व दोनशे नामांकित घोडी ही आहेरादाखल प्राप्त करून घ्यावीत असा त्यांचा उद्देश मनांत ठेवून कारवाई व्हावी. औरंगजेबास राजास राज्याभिषेक झाल्याचे दुःखच झाले काशीच्या काफिर

पंडितांनी राजाला दिलेली मान्यता ही गोष्ट सामान्य नव्हती. ते इस्लामला दिलेले एक आव्हानच होते

ठरल्याप्रमाणे दोन हजार मराठे बहादूरखानावर चालून गेले. व सैन्य मात्र पाठ दाखवून पळलेले पहातांच खानाने त्यांचा पाठलाग केला. हुलकावण्या दाखवीत मावळे पडेगावापासून बारा कोसांवर आले. वीस कोस पाठलाग करूनहि मावळ्याची गांठ पडेना. फौज थकली. खान बहादूरगडाकडे धांवू लागला. कसलाच प्रतिकार दिसला नाही. अघटितपणे तो पहात होता. तेवढ्यांत गडाचे रहिवासी छाती पिटत समोरे येऊन, हम लूट गये, मालिक! शिवाजीने हमको लूटा!

सर्व जणू जळून खाक झाले होते. मराठ्यांच्या पळण्याचा अर्थ आता त्याला कळला होता. उभ्या पावसांत मराठ्यांची काय लूट असते ते खानाने पाहिले. राजे माघारी गडावर चालू लागले. राजांच्याबरोबर हंबीरराव दौडत होते. बरोबर एक कोटी होनाची लूट व दोनशे नामवंत घोडी रायगडाकडे जात होती.

तिकडे कल्याण भिवंडीला मोरोपंत पेशव्यांनी दहशत निर्माण करून इंग्रज व पोर्तुगीजांना नमविले होते. अखेर कल्याण-भिवंडीचा ताबा मोरोपंतांनी घेतला. गमावलेली दंडाराजपुरी परत घेण्यासाठी राजांची एक फौज दंडा राजपुरी जवळ गेली होती. पावसाळ्यापूर्वी ती घेणे जरूर होते.

राजांनी फोंडा येथे वेढा घातला व त्यामुळे गोव्याच्या पोर्तुगीजांना मोठी भीती निर्माण झाली. त्यांनी राजांच्या कुरापती काढण्यास सुरुवात केली. सरहद्दीच्या देसायांना राजांविरुद्ध उठविले. मात्र राजांच्या सैनिकांनी देसायांची पाठ धरली. फोंड्याचा वेढा थोडा लांबत चालला होता. अनाजीचे पुढे इब्राहिमखान उभा होता. पंधरावीस दिवस फोंड्याला वेढा होता. तरी तो हाती आला नव्हता. शेवटी राजांच्या आज्ञेने सुलतानढवा करण्याचे ठरवून पांचशे शिड्या व लोखंडी कडी तयार केली. तटाला शिडी लावून आत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वीराला सोन्याचे कडे देण्याचे राजांनी जाहीर केले होते. नवा उत्साह संचारला.

तोच कानठळ्या बसणारा आवाज परिसरांत घुमूं लागला. तटावरच्या पहारेकऱ्यासकट तट आकाशात फेकला गेला. तीन सुरुंग धडाधड पेटले. तटाला खिंडार पडलेले पहातांच "हर हर महादेव" च्या गर्जना करून सारे वीर तटाला भिडले. अतोनात कापाकापी सुरू झाली. किल्लेदाराला बेड्या ठोकल्या गेल्या.

फोंडा सर झाला.

फोंड्यापाठोपाठ अकोला, शिवेश्वर, काद्रा आणि खुद्द कारवार राजांनी जिंकला. कारवार मराठी राज्यांत सामील झाला. पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी यांच्या हालचालींना पायबंद बसला.

राजांच्या फौजेने अथणीची मातब्बर पेठ लुटली होती. त्यामध्ये लक्षावधी होन लूट प्राप्त झाली. त्या लुटीतून इंग्रजहि वांचले नाहीत. हजारो होन किंमतीचे इंग्रजांचे कापड मराठ्यांचे हाती लागले. रामनगर भागांत गेलेले मोरोपंत पेशवे पिंडवोल पावना जिंकून लूट घेऊन, रायगडास गेल्याची बातमी राजांना आली. या विजयाबद्दल राजांनी मोरोपंतांचे कौतुक केले. विजापूर दरबार व मोगल सरदार बहादूरखानाने त्यांच्यातील यादवीचा फायदा घेण्याचे ठरविले. विजापूरवर स्वारी करण्याची बहादूरखान व खवासखान या दोघांची तयारी होती. बहलोलखानाने शिवाजीराजांची मदत घेऊन बहादुरखानाचा पराभव केला. सिद्दी मात्र त्रास देत होता. राजे आजारी असतांना त्यांनी वेंगुर्ला बंदर जाळले. त्यांची गय करून चालणार नव्हती. म्हणून राजे मोरोपंत पेशव्यांस म्हणाले की हवी तेवढी कुमक घेऊन सिद्दीचा पराभव करा. सदरेवरील अष्टप्रधानांपैकी अनाजीपंत, निराजी, हंबीरराव, आनंदराव, रघुनाथपंत कोरडे हजर होते. त्यांनी त्याला मान्यता दिली.

हंबीररावांनी कोप्पलकडे धांव घेतली. हुसेनखान मियाना लढाईच्या तयारीनं बाहेर पडला. गदग प्रांतातील येलबुर्गागांवी दोघांची गांठ पडली. मोठ्या तरफेचं युद्ध झालं. हुसेनखानाचा पाडाव झाला. या युद्धांत दोन हजार घोडी, बारा हत्ती, अनेक उंट, बिछाईत, छबिना व मदिन कापड सांपडले. राजांना आनंद झाला. मात्र नागोजी जेधे मृत्यु पावले. त्याचेबरोबर धनाजी जाधवाने पठाणांची लांडगेतोडच केली. हंबीररावांची फौज छावणीवर आली. लुटीचे त्यांनी आणलेले सामान पाहून साऱ्या छावणीने गर्दी केली.

राजांच्या फौजेत वीस हजारांच्या आसपास घोडदळ व वीस हजारांचे पायदळ होते. त्यांना हंबीररावांची फौज मिळाली. सर्वजण भागानगरास आले. शिवाजीराजे कुतूबशहाच्या मुलुखातून जाता असतां काहीही लुटालूट करीत नसल्याचे पाहून कुतूबखानास धीर वाटून तो शिवाजीराजांना भेटण्यास आला. कुतुबशहाचे वजीर मादळापंत व आकण्णापंत सामोरे आले. राजांना भेटले. छत्रपतींच्या विजयाच्या

घोषणा करून राजांनीही मादण्णा, आक्कण्णा, शाही दरबारचे मनसबदार या सर्वांचा यथोचित सन्मान केला.

राजांच्या कर्नाटक मोहिमेला कुतूबशहाने सर्व साहाय्य करण्याचे आश्वासन दिले होते. जिंजीपर्यंत सर्व मुलूख जिंकण्याच्या कामांत कुतूबशहांनी आपले सैन्य व मुख्यतः परदेशी गोलंदाजांच्या अंमलाखालील त्यांचा तोफखाना दारूगोळ्यासह राजांच्या बरोबर द्यावा व स्वारीचा खर्च म्हणून रोजी तीन हजार होन पुरवावे असा उभयतांत तह झाला होता, पातशहांनी या तहाखेरीज पाच लक्ष होन राजांना दिले. राजांनी रघुनाथपंत कोरडे यांना बोलावले. बाळाजी आवजींना पत्र पाठविण्याचे सांगून मालोजी घोरपडे यांचेशी स्नेहसंबंध जुळतील असे पत्र लिहिण्यास सांगितले. त्याप्रमाणे पत्र तयार झाले. रवानापण झाले. मराठी फौजेबरोबर गोवंळकोंड्याचा सेनापती मिर्झा महंमद अमीन हा चार हजार पायदळ, एक हजार घोडेस्वार व तोफखाना संगती घेऊन राजांच्या फौजेत सामील झाला. कर्नाटक पार करून राजे कर्नूलजवळ आले. तेथून नील पर्वताच्या रांगामध्ये असलेल्या श्रीशैल, या बारा जोतिर्लिंगाचे दर्शन त्यांनी घेतले.

राजांची फौज जिंजीकडे गेली. हा किल्ला खूप भव्य होता. बाजूचा खंदकहि वीस हात रुंद व खोल होता. विजयनगरच्या एके काळच्या वैभवाची साक्ष देणारा किल्ला बघून राजें भारावून गेले. फौजेने तट लावून तो सर केला. भगवे निशान गडावर लागले.

पुढे गांठ शेरखान समोर होती. शेरखानाने यांच हजार पठाणी फौजेनिशी लढा सुरू केला. बराच अवधि लोटूनहि राजांची फौज काहीही हालचाल करीत नव्हती. खानाने भीतीने त्रस्त होऊन माघार घेण्याचा त्याच्या फौजेला आदेश दिले. फौज माघार घेत आहे असे पाहून त्याचवेळी राजांनी त्यांच्या फौजेला स्वार होण्याची आज्ञा दिली. मराठी फौज मागून येत असलेली पाहून पठाणांचे उरले सुरले धैर्य नाहीसे झाले व ते पळू लागले. दोन्ही फौजा समोरासमोर आल्या. कापाकापी सुरू झाली. मागून शेरखानाचा पाठलाग सुरू झाला. त्यात अखेर त्याचा पराभव झाला. त्याने तहाचे बोलणे सुरू केले. वीस हजार खंडणी देण्याचे त्याने कबूल केले. राजांच्या हाती त्याचा मुलूख आला. खंडणीची पूर्तता न झाल्याने राजाने शेरखानाच्या मुलास इब्राहिमखानास ओलीस म्हणून ठेवून घेतले.

मराठी फौजेने शहाजी राजांच्या जहागिरीपैकी कोलार, होसकोटे, बालापूर, शिरे हा शिवाजीराजांच्या अंमलाखाली आला. तसेंच पाईनघाटाचा मुलूख व शहाजीराजांची एकोजीकडे चालत आलेली कावेरीच्या उत्तरेकडील सर्व जहागीर जिंकली. वीस लाख होनाहून जास्त महसूल असलेला मुलूख राजांच्या स्वराज्यांत सामील झाला, राजे परत निघाले. रघुनाथपंत कोरडे, सेनापति हंबीरराव मोहिते, संताजीराव भोसले, विठ्ठल पिलदेव अत्रे, हरजीराजे महाडिक वगैरे राजकारणांतील मुरब्बींना मागे ठेवण्याचा राजांनी निर्णय केला. राजांनी फौज त्यांच्या ताब्यांत देऊन मुलुखाचा जाबता बसवूनच माघारी येणेबद्दल सूचना दिल्या.

राजांनी मोरोपंतांना पन्हाळ्याला बोलावले. ते म्हणाले सिद्दी अजून प्रबळ आहे. दक्षिणेत कपटी दिलेरखान ठाण मांडून आहे व दुसरे म्हणजे मिर्झा राजे जयसिंग हे दोनच प्रबळ शत्रू आहेत. मोरोपंतांनी नाशिकच्या दौडीतून गडावर लूट आणली होती. त्याच वेळेस त्र्यंबकपंत सोनदेव डबीर अष्टप्रधानांपैकी एक, राज्याचे सुमंत शके १५९९ पिंगल नामसंवत्सर, चैत्र वद्य १२ दिनांक १८ एप्रिल १६७७ रोजी आपल्याला सोडून गेल्याची बातमी राजांनी दिली. ते शिवापूरास (शिवापूर येथील घर क्र. ४३५, महादेव मंदिर येथे त्यांची समाधी व वृंदावन आहे.) मयत झाले.

राजे दीड वर्षानंतर गडावर आले. दरबारांत त्यांनी मोरोपंतांच्या गळ्यात मोत्याचा कंठा घातला. अनाजींच्या गळ्यात माणकांचा कंठा व राहुजी सोननाथ यांना पाचूंचा कंठा घातला. मोरोपंताना राजे म्हणाले, "**मोरोपंत तुम्ही नाशिकची लूट आणलीत ती कशाच्या जोरावर? आम्ही नसलो तरी राज्य सुरक्षित आहे. ते पेलण्याचं सामर्थ्य आमच्या पंतप्रधानांत आहे. याच्याइतकी आनंदाची गोष्ट कोणती? तुमचा सन्मान कंठ्यानंच होणं योग्य. मात्र त्र्यंबक सोनदेव डबीर आपल्यात राहिले नाहीत हे वाईट झाले. मंत्र्याच्या सन्मानाबरोबरच राजांनी आपल्या दक्षिणेत आलेल्या हंबीरराव, येसाजी, आनंदराव यांचाही सन्मान केला.**

राजांनी आनंदरावांना पन्हाळ्याला जाण्याची व मोरोपंत पेशवे यांना फौजा देऊन मोगलाईत जाण्याची आज्ञा दिली. दिलेरखान विजापूरच्या मागेच लाभला होता. राज्याच्या चारहि कक्षांवर दहशत निर्माण करून द्या की जेणेकरून दिलेरखानास त्याची जाणीव व्हावी. जेधे, आनंदराव, तानाजी मोरे हेहि सरदार बाहेर पडले. विजापुरांतील पलगुंड, लक्ष्मेश्वर, गदग या पेठा मराठ्यांनी लुटल्या. ती लूट गडावर

आला. मोरोपंतांनी एक जासूद गडावर आलेला पाहिला. दिलेरखान व युवराज, संभाजीराजे यांच्यात अंत:स्थपणे बोलणी चालू असल्याबद्दलची बातमी होती. काहीतरी राजकारण असावे असे मोरोपंतांना वाटले. त्यांत महाराज स्वत: आजारी होते, त्यांत ही बातमी राजांनी युवराजांना परळीवर जाण्यासाठी सुचविले व आपणहि लगेच येतो म्हणून निरोप दिला. इतक्यांत अनाजींनी बातमी आणली की युवराज परळीहून पळून माहुलीला मोंगलांना मिळाले. दिलेरखानाने संभाजीराजांना सप्तहजारी सरदार केले. राजांनी हंबीररावांसह पन्हाळ्यावर जायचा बेत केला. मोरोपंतांना आनंदरावांसह स्वारीला पाठविण्यांत आले. दिलेरखान काय हालचाली करतो व कोणती चाल करतो याकडे लक्ष ठेवणे जरुरीचे होते म्हणून.

राजांच्या अनेक फौजा मोगलाईत व आदिलशाहीत धुमाकूळ घालीत होत्या. राजांनी चार महिने पन्हाळ्यावर काढले. त्या मुदतीत राजांना अनेक शुभवार्ता ऐकावयास मिळाल्या. मोरोपंत फौजांनिशी गदग मुलुखातल्या कोप्पळकडे भिडले होते. कोप्पळ जिंकले. आनंदरावांनी बाळापूर व शहापूर काबीज केले. दमणकडून लूट मिळाली. भूपाळगडावर फिरंगोजी लढा देऊन होते. परंतु युवराज तेथे राजाविरुद्ध लढत असल्याने फिरंगोजींना गड त्यांचे ताब्यात दिला. राजे संतापले. फिरंगोजीवर कडेलोटची शिक्षा देण्यापर्यंत राजांची मजल गेली. शेवटच्या क्षणी तो निर्णय फिरला. फिंरगोजी वांचले. राजांनी येसूबाईला सांगून पन्हाळ्याला तिला जायला सांगितले. युवराजांमध्ये काही बदल होतो किंवा कसे याची खात्री करावयाची होती.

राजे राजगडावरून विजापूरकडे गेले. तेथे मोरोपंत त्यांना मिळाले. दिलेरखानाशी झुंज चालू झाली. दिलेरबरोबर संभाजी राजे असल्याने मराठी फौज कितपत लढू शकेल हे सांगता येत नव्हते. मोरोपंतांनी बागलाण व खानदेश हे मोगली किल्ले घेतले. मोरोपंतांनी त्याचबरोबर सुरतेपर्यन्तचा मुलूख मारून परत आले पहा गडावर राजांनी पंधरा दिवस मुक्काम केला. गडाचे नांव बदलून "विश्रामगड" असे ठेविले. लगेच पुन्हां मोरोपंतांनी अहिवंत व नाहवा हेहि किल्ले पादाक्रांत केले. चौथाईचे करार केले. हनमंतगड काबीज केला. गडावर एक आनंदाची बातमी राजांची वाट पहात होती.

संभाजीराजे मोंगलांना सोडून पन्हाळ्यावर येऊन दाखल झाले होते. हे ऐकून राजांना समाधान वाटले. नामुष्कीचा प्रसंग संपला.

राजांनी दरबार भरविला. दरबार भरण्याचे प्रयोजन मंडळींना कळाले नाही. राजेच म्हणाले की युवराज राज्य संभाळतील असे वाटत नाही. कोणत्या क्षणी अविवेकी निर्णय करतील याचा भरोसा नाही. हंबीरराव व इतरांनी युवराजांची बाजू घेतली परंतु राजे म्हणाले आम्ही वतनाची मिरासदारी चालविण्याकरिता का आम्ही राजे झालो? भारतात हिंदूंचं राज्य नाहीस झालं म्हणून गागाभट्टांनी आम्हाला विनंती केली. त्यानुसार आम्ही राज्याभिषेक करवून घेतला. हे राज्य त्याच निष्ठेनं आमच्या मागेसुद्धां चालायला हवं.

राजे म्हणाले जिंजीचं राज्य संभाजीराजांना द्यावं व इथलं राज्य राजारामाच्या हाती सोपवावं असा आमचा विचार आहे. संभाजी राजे राजगडावर आले. क्षमा मागण्याच्या हेतूने पण राजांनी त्यांना कशा परिस्थितीत राज्य नेटाने नेले हे पटवून दिले. राजे म्हणाले, मोरोपंत पेशवे यांच्यावर तुमचा फार रोष. ज्या माणसांनी रोहिडेश्वराच्या शपथेपासून आजतागायत आम्हाला साथ दिली, अशी ती माणसं. आपल्या पराक्रमावर व कर्तृत्वावर त्यांनी राज्याचा पाया भक्कम केला. साल्हेर, मुल्हेर जिंकणारे प्रतापगडासारखे गड उभारणारे, आडी अडचणीच्या वेळी रणांगणांत धावं घेणारे "मोरोपंत आठवा" तुमच्या राज्याची धाराबंदी घडविणारे अनाजी पहा. म्हणजे त्यांची किंमत कळेल. त्या युवराजपदाच्या मुर्ख घमेंडीत भर राजसदरेवर "लुच्चे, लफंगे" म्हणून उपमर्द करण्यात तुम्ही मागेपुढे बघितले नाहीत. आमच्या तोला-मोलाची माणसं ती. तो अपमान आमचा आहे. हेहि तुमच्या ध्यानी आलं नाही. ती माणसं ... म्हणून तुमच्या ..पणावर पांघरूण घातलं. कर्ता सवरता मुलगा घरी असतांना उभं राज्य मंत्रिमंडळाच्या स्वाधीन करून जाण्यांत आम्हांला काय हौस होती? दिलेरखानाबरोबर भूपाळगडावर तुम्हांला लढतांना पाहून तुमच्या शब्दाखातर भूपाळगड तुम्हाला दिला. फिरंगोजी आमच्याकडे आले आणि त्याबद्दल आम्ही त्यांना काय शिक्षा दिली ठाऊक आहे? तोफेच्या तोंडी! शिक्षा दिली. परंतु अंमलात आणली नाही. हे हात दुबळे ठरले. दिलेरखानाने किल्ल्यांत प्रवेश करतांना स्वराज्याशी इमानी असणाऱ्या सातशे लोकांचे हात मोडले आणि ते तुम्ही उघड्या डोळ्यांनी पाहिलंत? परिश्रमात बांधलेला किल्ला इखलास खानाकडून त्यानं तोफाच्या भडिमारांत जमिनदोस्त केला. हे पातक

दिलेरखानाचं नाही, तुमचं आहे. निकोट्याला दिलेरनं राक्षसी नंगानाच घातला. अब्रू रक्षणासाठी आमच्या आया बहिणींनी मुलाबाळांसकट विहिरीत उड्या मारल्या. सारा अथणी गांव गुलाम म्हणून विकायला निघालांत!

संभाजीराजांना पश्चात्ताप झाला. राजांना म्हणाले की हवी ती शिक्षा मला करा.

शंभुराजांना ते म्हणाले, मोठ्या कष्टानं आम्ही राज्य उभं केले. या राज्यापायी हजारोंनी बलिदान केलं, अनेक संकटं भोगली. आज आमचं राज्य तुंगभद्रेपासून नर्मदेपर्यंत पसरले आहे. एवढे राज्य सांभाळणे सोपे नाही, पुढे दिवस कष्टाचे आहे. औरंगजेबाने जिझिया कर लादला आहे. त्याखाली हिंदू चेपले जात आहेत. औरंगजेब आतां दक्षिणेत उतरल्याशिवाय रहाणार नाही. आता आमचे मनसुबे तुम्ही पुरे करा. आम्ही आता थकलो आहे. तुम्हाला जिंजीचं राज्य द्यायचं ठरविलं आहे. राजांनी येसूबाईच्या पाठीवरून हात फिरविला. तिला समजुतीच्या गोष्टी सांगून अधिकार गाजवायचा हक्क गाजवीत जा एवढेहि म्हणाले. राजे परत निघाले. वाटेत समर्थांना भेटले. त्यांच्या अस्वस्थ मनःस्थितीला समर्थांच्या बोलांनी राजांना स्वात्मसौख्य प्रदान केले गेले. राजांना समाधियोग घडला. राजांनी जसा राजयोग साधला तसा सिद्धयोग होण्याबद्दल प्रार्थना केली.

राजांना दौलत खानाने खांदेरी-उंदेरीचा लढा कसा दिला हे मोरोपंत सांगत होते. मायनाक भंडारी दीडशे माणसं व चार तोफा घेऊन खांदेरीची तंटबंदीचे संरक्षणासाठी काम करीत होते. काम सुरू झाले. भिंत दीड हात उंच चढली. तेवढ्यांत ते काम रोखण्यासाठी इंग्रज आले. इंग्रजांना कैद केले. इंग्रजांचा प्रतिकार होताच. मग दौलतखानाने चाळीस पन्नास गुराबाकडून लढत दिली. तरीही इंग्रज ऐकेनात मग मराठ्यांनी राजापूरच्या बखरीला वेढा दिला. व सर्व माणसे नजरकैद केली. मग मात्र इंग्रज घाबरले व तहाला आले. मोरोपंत पुन्हा सांगू लागले की खांदेरी उंदेरी बेटांचा राजांचा हक्क इंग्रजांनी मानला. इंग्रजांनी तह केला. इंग्रज गलबते घेऊन माघारी गेले, तरी सिद्दी कासमच्या गलबतावर दौलतखानाने नजर ठेवली.

राजे अनाजीपंत व मोरोपंत पेशव्यांना म्हणाले की गेली वीस वर्षे आपण हा खेळ खेळलो आहे. आम्ही नसतानाही आमचे मनोरथ सिद्धीला नेण्याची तुमची


कुवत आहे हे आज आम्ही पहातो आहे. जंजिरा व मुंबई यामध्ये मधील एक ठिकाण - "खांदेरी/उंदेरी" आपल्याकडे असल्याने यापुढे इंग्रज व सिद्दी यांना पराभव करणे आपल्याला शक्य आहे.

औरंगजेबाकडून पुढील हालचाली होण्यासाठी कारवाई होईल अशी चिन्हे दिसूं लागली. ज्या मार्गाने शास्ताखान, मिर्झा राजे आले त्याच मार्गाने औरंगजेब येईल असे राजांना वाटत नव्हते. राजांच्या मते औरंगजेब तुळजापूर, पंढरपूर, कोल्हापूर व राजापूर मार्गे येईल असे होते. राजांचे राज्य आणि कर्नाटक याचे दोन तुकडे होऊन वरील देवळे भ्रष्ट होतील. तेथून राजापूर गांठल की इंग्रज व पोतुगीज त्यांना मदत करावयास तयार होतील. आलमगीर युद्ध उभी करण्याअगोदर आमची दैवत भग्न करील, आणि याचकरिता राजे म्हणाले की आलमगीरची पिछाडी उद्ध्वस्त करण्यासाठी दाभोळ बंदरातून गुजरातेत फौजा घुसविणेची आमची इच्छा आहे.

आलमगीर औरंगाबादचा सुभेदार होता. त्याला हा मुलूख माहीत आहे. मिर्झा राजांपेक्षांही कुशाग्र बुद्धीचा, राजकारणपटु, थोर मुत्सद्दी आणि प्रखर सेनानी असं त्याचं रूप आहे. दिलेरखानाच्या सूडबुद्धीची त्याला जोड लाभणार आहे. त्याला पुढे येऊ देण्याअगोदरच अशीर गडावर त्याला रोखून, गुजरातच्या भूमीवर त्याची धुळधाण उडविली पाहिजे. हे आपल्याला सहज जमेल, असे हंबीरराव व मोरोपंतांना उद्देशून राजे म्हणाले. भरपूर फौजा गोळा करा. कुतूबशहा व आदिलशहा यांनाही बोलवा. ते येतील.

मोरोपंत आतां वेळ घालवू नका. ही लढाई फार मोलाची आहे. औरंगजेबाचा पराजय येवढाच हेतू त्यांत नाही. दिल्ली तक्ख्त नाराज करून काशी विश्वेश्वराची स्थापना करायचं आमचं स्वप्न आहे. खरं म्हणजे राजांची तब्येत बरी नव्हती. वैद्यांची औषधे चालू होती. ज्वर कमी होत नव्हता. दहा अकरा दिवस राजे अंथरुणावर पडून होते. वैद्यांनी सर्व प्रयत्न केले. यश आले नाही आणि महाराज पंचत्वांत विलीन झाले! (शालीवाहन शके १६०२, रौद्र नाम संवत्सरे, चैत्र शुद्ध १५ रविवार दोन प्रहरी, रायगड मुक्कामी ३ एप्रिल १६८०).


◆ ◆ ◆



[illegible]

[illegible]

[illegible]





सहायक संचालक
पूर्ण पुरालेखागार, पुणे

श्री

1592

[illegible]

[illegible]

1592

८ — पुणे [illegible]
२७

श्री

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]


[illegible]


[illegible]


[illegible]



[illegible]


सहायक संचालक
पुणे पुराभिलेखागार, पुणे


81829



[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]



INAM
A
COMMISSION
R

[illegible]

[illegible]

सहायक संचालक

पुणे पुरालेखागार, पुणे



[illegible]

२ — [illegible]

[illegible]

३ — [illegible]

[illegible]

४ — [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

५ — [illegible]

[illegible]

[illegible]

६ — [illegible]

[illegible]

७ — [illegible]

[illegible]

[illegible] INAM A COMMISSION R

८ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] ५९

[illegible] ६

९ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१० [illegible]

[illegible]

[illegible]

११ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१२ [illegible]

१ [illegible]

१ [illegible]

[illegible] R ५९२/६

१३ [illegible]

[illegible]

INAM A COMMISSION

१४ [illegible]

[illegible]

१५ [illegible]

[illegible]

१६ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

signed before me at Poona on the 18th

November 1853

[illegible] Captain

Assist: Inam Commr



[illegible]

[illegible]

सहायक संचालक

पुणे पुरालेखागार, पुणे

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

कथा

[illegible]

पे

१ [illegible]

[illegible]

२ [illegible]

[illegible]

३ [illegible]

[illegible]

४ [illegible]

[illegible]


[illegible]

५ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


R
INAM
A
COMMISSION

१० [illegible]

[illegible]

११ [illegible]

[illegible]

[illegible]

१२ [illegible]

[illegible]

[illegible]

१३ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१४ [illegible]

[illegible]

R INAM A COMMISSION

[illegible]

१५ [illegible]

[illegible]

६ [illegible]

१६ [illegible]

[illegible]

[illegible]

१७ [illegible]

[illegible]

[illegible]

१८ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

Signed before me at Poona on the 28th June 1854

[illegible] Captain

Assistant Inam Commissioner

[illegible]

सहायक संचालक

पुणे पुरालेखागार, पुणे

[illegible]

[illegible]

[illegible]

R

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

Signed before me at Poona on the 18

November 1853

W. C. Baker Captain

Assistt. Inam Commr.


R
INAM COMMISSION
A